



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार ६ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०






# भारताला इंधन पुरवठा अखंडित सुरू राहील-राष्ट्राध्यक्ष पुतीन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासोबत हैदराबाद हाउसमध्ये बैठक घेतली. २३व्या भारत-रशिया शिखर परिषदेत सहभागी झाल्यानंतर दोन्ही देशांच्या नेत्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी राष्ट्राध्यक्ष पुतिन म्हणाले की, भारताच्या झपाट्याने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेसाठी रशिया सतत आणि अखंड इंधनपुरवठा करण्यास तयार आहे.

संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना राष्ट्राध्यक्ष पुतिन म्हणाले, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, माझे प्रिय मित्र पंतप्रधान मोदी आणि भारताच्या जनतेचे, रशियन प्रतिनिधिमंडळाचे ज्या उत्साहाने स्वागत केले त्याबद्दल धन्यवाद. त्यांनी पुढे सांगितले, आपण एससीओ बैठकीदरम्यान भेटलो होतो आणि आम्ही रशिया-भारत संवादाचे वैयक्तिकरित्या निरीक्षण करत आहोत. पुतिन म्हणाले की आजची चर्चा सकारात्मक आणि मैत्रीपूर्ण वातावरणात झाली. माझे आणि पंतप्रधान मोदी यांचे नियमितपणे दूरध्वनीवर संवाद होत असतात. भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले सर्व प्रकारचे इंधन अखंडितपणे पुरवण्यासाठी आम्ही तयार आहोत. रशिया भारताच्या सर्वात मोठ्या अणुउर्जा प्रकल्पाच्या निर्मितीतही मदत करत आहे. दोन्ही देश हळूहळू व्यवहारांच्या सेटलमेंटसाठी आपल्या राष्ट्रीय चलनांचा वापर वाढवत



आहेत. आम्ही वार्षिक द्विपक्षीय व्यापार १०० अब्ज डालर्सपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

पुतिन पुढे म्हणाले, पंतप्रधानांनी आम्हाला दोन्ही देशांच्या सरकारांनी लक्ष द्याव्या अशा आव्हानांची सूची दिली आहे आणि आम्ही त्यावर काम करू. यामुळे भारत आणि युरेशियन इकानामिक युनियनमध्ये फ्री ट्रेड ॲग्रीमेंट करण्यास मदत मिळेल. त्यांनी सांगितले की सध्या ९६% व्यवहार दोन्ही देशांच्या राष्ट्रीय चलनांत होत आहेत.उर्जा क्षेत्रातील आमची भागीदारी अत्यंत यशस्वी आहे. तेल, गॅस, कोळसा आणि भारताच्या उर्जा गरजांशी संबंधित सर्व पुरवठा स्थिर आहे.

पुतिन म्हणाले, आम्ही कुडनकुलम येथे भारताचा सर्वात मोठा अणुउर्जा प्रकल्प एक फ्लॅगशिप प्रोजेक्ट म्हणून उभारत आहोत. सहा रिअक्टर युनिट्सपैकी दोन आधीच ग्रीडला जोडले गेले आहेत आणि चार आणखी बांधकामाधीन आहेत. हा प्लांट पूर्ण क्षमतेने चालू झाल्यावर भारताच्या उर्जा गरजांमध्ये मोठे योगदान देईल आणि उद्योगांना व घरांना स्वस्त, (पान २ वर)

## पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना भेटवस्तू म्हणून दिली रशियन भाषेत लिहिलेली भगवद्‌गीता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना रशियन भाषेत लिहिलेली भगवद्‌गीताची प्रति भेटवस्तू म्हणून दिली. दोन्ही नेत्यांच्या भेटीदरम्यान दिलेली हि भेटवस्तू भारत-रशिया संबंधांना आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जोडणीचे नवे परिमाण देणारी ठरली आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की गीतेतील ज्ञान व संदेश जगभरातील कोट्यवधी लोकांना प्रेरणा देतात आणि तिची शिकवण प्रत्येक युगात मानवतेला योग्य दिशा दाखवत राहते.राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्या स्वागतासाठी पंतप्रधान मोदी विमानतळावर स्वतः गेले, याबाबत क्रेमलिनकडून निवेदन जारी करण्यात आले आहे. क्रेमलिनने म्हटले आहे की पंतप्रधान मोदी यांनी विमानाकडे जाउन पुतिन यांची भेट घेण्याचा निर्णय अनपेक्षित होता आणि रशियन अधिकाऱ्यांना याची पूर्वसूचना दिलेली नव्हती. युक्रेन युद्धानंतर ही पुतिन यांची पहिली भारतभेट आहे. राष्ट्राध्यक्ष



पुतिन यांचे स्वागत केल्यानंतर पीएम मोदी यांनी सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत लिहिले.माझे मित्र राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचे दिल्लीमध्ये स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे. आज संध्याकाळी आणि उद्याच्या आमच्या बैठकींबाबत मी आशावादी आहे. भारत आणि रशियाची मैत्री काळाच्या कसोटीवर खरी उतरली आहे; याचा आपल्या नागरिकांना अपार लाभ झाला आहे. (पान २ वर)

## लग्नाचे वय नसले तरी लिव्ह-इनमध्ये राहता येणार

### ◆ हायकोर्टाचा मोठा निर्णय ◆

**जयपूर /वृत्तसंस्था :** लग्नाचे वय पूर्ण झाले नसले तरी दोन प्रौढ व्यक्तींना परस्पर संमतीने लिव-इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचा पूर्ण



अधिकार आहे असा ऐतिहासिक निर्णय राजस्थान हायकोर्टाने दिला आहे. भारतात महिलांसाठी विवाहयोग्य वय १८ वर्षे आणि पुरुषांसाठी २१ वर्षे असले, तरी १८ वर्षांपासून व्यक्तीला कायद्यानुसार प्रौढ मानले जाते. न्यायमूर्ती अनुप ढांड यांनी हा निकाल दिला आहे. हा निर्णय कोटा येथील १८ वर्षीय तरुणी आणि १९ वर्षीय युवकाने दाखल केलेल्या संरक्षण याचिकेच्या संदर्भात देण्यात आला. दोघांनीही हायकोर्टात अर्ज करताना सांगितले की, त्यांनी परस्पर संमतीने लिव-इन रिलेशनशिप स्वीकारली आहे आणि त्यांच्या जीवाला धोका असल्याने पोलिस संरक्षणाची गरज आहे.

जोडप्याने २७ ऑक्टोबर २०२५ रोजी औपचारिक लिव्ह-इन करार केला होता. मात्र याला मुलीच्या कुटुंबीयांनी जोरदार विरोध केला आणि दोघांना ठार मारण्याची धमकीही दिली, (पान २ वर)

## स्था.स्व. संस्थांच्या प्रलंबित निवडणुका

# ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करणे बंधनकारक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रलंबित निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक आहे. कोणत्याही परिस्थितीत निवडणुका पुढे ढकलल्या जाउ नयेत, असे स्पष्ट निर्देश देत सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेवरील अनिश्चिततेला पूर्णविराम दिला. तसेच २ डिसेंबरला झालेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले. २१ तारखेपूर्वी मतमोजणी घेण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला.निवडणूक आयोगाने मतमोजणी २१ डिसेंबर रोजी घेणार असल्याचे जाहीर केल्यानंतर अनेक राजकीय पक्षांनी तीव्र आक्षेप व्यक्त केला. तसेच ३ डिसेंबर रोजीच मतमोजणी व्हावी, असा आग्रह धरला. या विरोधात नागपूर आणि छत्रपती




संभाजी नगर खंडपीठात याचिका दाखल झाल्या होत्या. दरम्यान आता सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या खंडपीठासमोर मतमोजमीच्या विषयासंदर्भात सुनावणी पार पाडली. यावेळी खंडपीठाने निवडणुकांचा जो कालावधी निश्चित केला आहे. त्याच्या आत म्हणजेच ३१ जानेवारीपूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी. कोणत्याही कारणास्तव निवडणुका पुढे ढकलण्याचा प्रयत्न होउ नये, असेही खंडपीठाने सांगितले. २ डिसेंबरला झालेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरलाच होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केले. २१ तारखेपूर्वी मतमोजणी घेण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. उच्च न्यायालयांमधील विविध याचिकांचा, प्रकरणांचा किंवा खंडपीठांच्या आदेशांचा परिणाम होउन निवडणुका पुढे ढकलल्या जाणार नाहीत, याची विशेष खबरदारी घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. नागपूर, औरंगाबाद खंडपीठ किंवा मुंबई उच्च न्यायालय असेल, त्यांच्या कोणत्याही आदेशाचा परिणाम निवडणुका लांबण्यावर होउ नये, असे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले.गेल्या काही वर्षांपासून कोरोना महामारी, आरक्षण यासह अनेक कारणांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या जात होत्या. यामुळे नागरिकांमध्ये तसेच लोकप्रतिनिधींमध्येही प्रचंड अस्वस्थता आणि (पान २ वर)










## सहकारी संस्थांच्या निवडणुकीला पुन्हा ब्रेक

### अतिवृष्टीच्या कारणानंतर दुसऱ्यांदा निवडणुका पुढे ढकलल्या शासकीय परिपत्रक प्रसिद्ध

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सहकाराच्या आखाड्यातील द्वंद पुन्हा थंडावले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होईपर्यंत निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने याविषयीचे शासकीय परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामुळे सहकार पंढरीत आता राजकीय बेलभांडारा उधळल्या जाणार




नसल्याचे स्पष्ट झाले आहे. तर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका मात्र वेळेतच होणार आहेत. राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने यापूर्वी घेतला होता. राज्यात ऑगस्ट महिन्यात पावसाने मोठे थैमान घातले होते. अतिवृष्टीमुळे आणि मुसळधार पावसामुळे राज्यातील २० हून अधिक जिल्हे प्रभावित झाले होते. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुकांना ब्रेक लागला होता. महाराष्ट्र सहकारी संस्था, समितीची निवडणूक, नियम २०१४ मधील नियम ४ अंतर्गत अ आणि ब वर्गातील सहकारी (पान २ वर)

## कर्नाटकात मासिक पाळीची सशुल्क रजा मंजूर

**बंगळूरू /वृत्तसंस्था :** कर्नाटक सरकारने सरकारी क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १८ ते ५२ वयोगटातील सरकारी महिला कर्मचाऱ्यांसाठी आता महिन्याला एक दिवस सशुल्क मासिक पाळीची रजा मंजूर करण्यात आली आहे. हा आदेश तात्काळ लागू करण्यात आला आहे. कर्नाटक सरकारच्या या निर्णयामुळे सरकारी महिला कर्मचाऱ्यांच्या कामाच्या ठिकाणी मोठे बदल होणार आहेत. १८ ते ५२ वयोगटातील सर्व सरकारी महिला कर्मचाऱ्यांना ही रजा मिळणार आहे. तसेच ही रजा सशुल्क असेल, म्हणजेच या दिवसाचा पगार कापला जाणार नाही. ही मासिक पाळीची रजा घेण्यासाठी कोणत्याही वैद्यकीय प्रमाणपत्राची गरज नसेल. नैमित्तिक रजा मंजूर करण्याचे अधिकार ज्या प्राधिकरणाकडे आहेत, त्यांच्याकडूनच ही रजा मंजूर केली जाईल. ही रजा इतर कोणत्याही रजेमध्ये जोडता येणार नाही. तिची नोंद स्वतंत्रपणे ठेवावी लागेल.

**खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठीही लागू-** हा निर्णय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी असला तरी, कर्नाटक सरकारने (पान २ वर)



जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# शहरात गंभीर गुन्ह्यांचा वाढता ग्राफ

## ●११ महिन्यात ३७ खून ● पोलिसांची ३६ प्रकरणांमध्ये उकल

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर पोलिस आयुक्तालयाने जानेवारी ते ३ डिसेंबर २०२५ या ११ महिन्यांचा गुन्हेगारी आढावा जाहीर केला असून, शहरातील गंभीर गुन्ह्यांमध्ये वाढ नोंदवली गेली आहे. विशेषत: खूनाच्या घटनांनी यंदा विक्रमी संख्या गाठली आहे. अहवालानुसार शहरात यावर्षी एकूण ३७ खून झाले असून, त्यापैकी वलगाव पोलिस ठाण्यातील एकमेव प्रकरण वगळता उर्वरित सर्व ३६ प्रकरणांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे. यामुळे तपास कार्यात शहर पोलिसांनी मजबूत कामगिरी दाखवली आहे, अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

गेल्या वर्षी म्हणजेच २०२४ मध्ये शहरात ३२ खून नोंदवले गेले होते. यंदा खूनाच्या गुन्ह्यांत तब्बल ५ प्रकरणांची वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे प्राणघातक हल्ल्यांमध्ये किरकोळी वाढ झाली असून, यावर्षी ५३ प्रकरणे, तर २०२४ मध्ये ५२ प्रकरणे नोंदवली गेली होती. शहरातील वाढत्या वस्ती, रस्त्यांवरील वाद, कौटुंबिक तणाव, तसेच सुक्ष्म कारणांवरून होणाऱ्या भांडणांमुळे गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. दुसरीकडे, काही गुन्ह्यांमध्ये घटही झाली आहे. दरोड्यांच्या प्रकरणांत लक्षणीय घट नोंदवली गेली असून, यावर्षी ९ दरोडे, तर मागील वर्षी १४ प्रकरणे नोंदली होती. पोलिस गस्त वाढवणे, विशेष तपास पथके, सीसीटीव्हीचे जाळे आणि त्वरित प्रतिसाद या उपाययोजनांमुळे दरोड्यांवर नियंत्रण मिळाल्याचे दिसते. शहरात गंभीर गुन्ह्यांची वाढ चिंताजनक असली तरी, बहुतेक प्रकरणांमध्ये तात्काळ तपास करून आरोपींना गजाआड करण्यात पोलिसांना यश आल्याने कायदा-सुव्यवस्था टिकवण्यात पोलिस यंत्रणेने प्रभावी कामगिरी केली आहे.

गुन्हेगारीची वार्षिक स्थिती (जानेवारी
- ३ डिसेंबर २०२५)
- हत्या : ३७
- प्राणघातक हल्ले : ५३
- दरोडे : ९
- जबरदस्ती/चोरी : ८९
- वाहनचोरी : ३४४
- विनयभंग : १६५
- मारामाऱ्या/झटापट : ५१३
- अपहरण : ११३
- फसवणूक : ३६
- इतर प्रकरणे : २३३१

**वाहनचोरीत किंचित घट :**शहरात वाहनचोरी हा कायम डोकेदुखी ठरलेला गुन्हा असून, यावर्षी ३४४ प्रकरणे, तर मागील वर्षी ३९३ प्रकरणे नोंदवली गेली. म्हणजेच वाहनचोरीत घट झाली असली तरी संख्या अद्यापही चिंताजनक आहे.

यावर्षी मारामाऱ्या आणि झटापट प्रकरणांची संख्या ५१३, तर मागील वर्षी ५६० होती. अपहरण प्रकरणांतही गेल्या वर्षीच्या १४८ च्या तुलनेत यंदा ११३ प्रकरणे झाली आहेत.

**गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी-** गुन्हे शाखेने यंदा विविध गंभीर गुन्ह्यांच्या तपासात भक्कम कामगिरी केली. विशेष म्हणजे निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली दरोडे, वाहनचोरी, लुटमार, जबरी चोरी, तसेच हत्येच्या अनेक प्रकरणांत आरोपींना अटक करण्यात यश आले. तंत्रज्ञानाचा वापर, सीसीटीव्ही विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे गुन्हे उकलण्याचा वेग वाढल्याचे अधिकाऱ्यांनी सांगीतले.

# ईव्हीएमच्या स्ट्राँग रूमचे थेट प्रक्षेपण करा

## शिवसेना व राष्ट्रवादी उमेदवारांची निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे मागणी



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** मतदानाच्या ई.व्ही.एम. स्ट्रॉग रूमचे एलईडी स्क्रिनवर थेट प्रक्षेपण करावे व राजकीय पक्षाचे प्रतिनिधीं व उमेदवार यांना सदर ठिकाणी पाहणी करण्याची परवानगी देण्यात यावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवारांनी प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात स्थानिक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

राज्यात २ डिसेंबर रोजी नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या असून याच वेळी नांदगाव नगरपंचायत ची निवडणूक सुद्धा पार पडली. ३ डिसेंबर रोजी सदर निवडणुकीचा निकाल घोषित करण्याचे निवडणूक आयोगाचे परिपत्रक होते. मात्र राज्यातील काही नगर परिषदेच्या आरक्षणामध्ये घोळ झाल्याने न्यायालयाच्या खंडपीठाने सदर निवडणुका पुढे ढकलल्या आणि राज्यातील उर्वरित ठिकाणच्या निवडणुका २ डिसेंबरला पार पडल्या. या निवडणुकीचे निकाल २१ डिसेंबर रोजी घोषित करण्याचा निर्णय आहे. त्यामुळे काही ठिकाणी ई.व्ही.एम. वर शंका व्यक्त केल्या जात असून वीस दिवस स्ट्रॉग रूमच्या सुरक्षीततेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. म्हणून सदर ठिकाणच्या स्ट्रॉग रूमच्या देखरेखीचे थेट लाईव्ह एलईडी स्क्रीनवर प्रक्षेपण करण्यात यावे व उमेदवार किंवा राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना पाहणी करण्याची परवानगी देण्यात यावी व सदर ठिकाणी सुरक्षा वाढविण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे शिवसेना राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे केली.

यावेळी प्रकाश मारोटकर, अमोल शिरभाते, निलेश इखार, प्राप्ती मारोटकर, अनिता भंडारे, कांताबाई लोमटे, जयश्री सुहागपुरे, वनिता काळपांडे, वासुदेव लोखंडे, शेख जमिर, शेख राहील, रवि ठाकूर, प्रकाश ब्राम्हणवाडे, शेख शारुख, शेख सलमान, सुमित लोमटे, शुभम रावेकर, अक्षय मुके ईत्यादी उपस्थित होते.

# मेड-टेक इनोव्हेशनसाठी 'रिसर्च-लिंक्ड इन्सेन्टिव्ह' लागू करा- खा.डॉ.अनिल बोंडे यांची मागणी

**नवी दिल्ली -** राज्यसभेत आज बोलताना महाराष्ट्रातील भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी देशातील मेड-टेक क्षेत्रामध्ये संशोधनाला चालना देण्यासाठी 'रिसर्च-लिंक्ड इन्सेन्टिव्ह' (RLI) धोरण तातडीने राबविण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली.




डॉ. बोंडे म्हणाले की, 'भारत आरोग्य क्षेत्राच्या परिवर्तनाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे. उच्च दर्जाच्या, परवडणाऱ्या वैद्यकीय तंत्रज्ञानाची गरज झपाट्याने वाढत आहे. उत्पादन-आधारित प्रोत्साहन योजना (PLI) मुळे उत्पादनास मदत झाली असली तरी भारत आजही ७० टक्क्यांहून अधिक उच्चस्तरीय वैद्यकीय उपकरणे आयात करतो. संशोधन, डिझाइन, क्लिनिकल व्हॅलिडेशन आणि पेटंट्सच्या क्षेत्रात मोठ्या उणिवा दिसून येतात.'

ते पुढे म्हणाले की, २०२३ मध्ये जाहीर केलेल्या 'राष्ट्रीय फार्मा-मेडटेक R&D धोरण'नुसार देशात नावीन्यपूर्ण संशोधन वाढवण्यासाठी लक्ष केंद्रित सहाय्याची गरज आहे. RLI मॉडेलद्वारे प्रोटोटाइपपासून ते नियामक मान्यतेपर्यंत संशोधनाच्या सर्व टप्प्यांना प्रोत्साहन मिळू शकते. यात तंत्रज्ञान सिद्धता पातळी (TRL) आधारित टप्प्याटप्प्याने अनुदान, भारतात सह-निर्मित क्लिनिकल ट्रायल्स आणि पेटंट रॉयल्टीवरील करसवलतीचा समावेश करता येईल.

डॉ. बोंडे यांनी सांगितले की, 'सेमीकंडक्टर, ईव्ही आणि फार्मा क्षेत्रात अशा R&D-आधारित प्रोत्साहन योजनांनी यश मिळवले आहे. अमेरिका, सिंगापूर यांसारख्या देशांमध्येही अशा धोरणांनी वेगाने प्रगती साधली आहे. भारतातील मेड-टेक बाजारपेठ २०२३ मधील १२ अब्ज डॉलर वरून २०३० पर्यंत ५० अब्ज डॉलरपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.'

शेवटी त्यांनी केंद्र सरकारला विनंती केली की, 'Innovate in India' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी मेड-टेक क्षेत्रात RLI लागू करून दीर्घकालीन मदत द्यावी.'

या मागणीला सभागृहात विशेष लक्ष वेधले गेले असून, सरकारकडून यावर सकारात्मक पावले उचलली जातील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# एचआयव्ही एड्स जाणीव जागृती कार्यक्रम उत्साहात



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** विदर्भयुथ वेल्फेअर सोसायटी अमरावती, द्वारा संचालित प्रा.राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत रेड रिबन क्लब च्या वतीने एच आय व्ही एड्स जाणीव जागृती कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. तालुका आरोग्य विभाग व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात्प्रसंगी एच आय व्ही एड्स संबंधी दक्षता ही सामूहिक शपथ घेण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रतिनिधी प्रदीप चव्हाण व सचिन वानखडे यांनी यात्प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एच आय व्ही एड्स अवेअरनेस जाणीव जागृतीच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी स्वतः दक्ष राहिले पाहिजे आणि आपल्या सहकारी मित्र-मैत्रिणींना सुद्धा दक्ष राहण्याबद्दल सांगितले पाहिजे असे आवाहन महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. श्रीकांत दांडगे यांनी अध्यक्षीय भाषणातून केले.

यात्प्रसंगी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश मेश्राम यांनी प्रास्ताविक केले तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.निलेश गोरे यांनी केले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.विवेक चौधरी, प्रा. डॉ. प्यारेलाल सूर्यवंशी, डॉ.गौतम सातदिवे, प्रा. अमर डांगे, प्रा.अंकुश कासदेकर,प्रा. राजेंद्र शंभरकर, प्रा. शितल मारोटकर, प्रा. निकिता गावंडे व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.एड्स जनजागृतीसप्ताह अंतर्गत रांगोळी स्पर्धा आणि जनजागृती रॅलीचे आयोजन महाविद्यालयातील रेड रिबन क्लबच्या वतीने करण्यात आले.

## पान १ व १० वरून

## भारताला इंधन पुरवठा अखंडित

स्वच्छ उर्जा मिळेल. आम्ही लहान माड्यूलर रिॲक्टर, तरंगते अणुऊर्जा केंद्र आणि वैद्यक व शेतीसारख्या अणु-तंत्रज्ञानाच्या गैर-उर्जाविषयक वापरावरही चर्चा करत आहोत.पुतिन यांनी सांगितले, भारतासोबत आम्ही नवीन आंतरराष्ट्रीय वाहतूक मार्ग तयार करत आहोत. यात नार्थ-साऊथ ट्रान्सपोर्ट कारिडार हा मोठा प्रकल्प आहे. याचा अर्थ असा की रशिया किंवा बेलारूस येथून माल थेट हिंद महासागर मार्गे पोहोचू शकेल. यामुळे व्यापार जलद, स्वस्त आणि सुलभ होईल.या दरम्यान पुतिन म्हणाले की, मागील जवळपास ५० वर्षांपासून रशिया भारतीय सेनेला शस्त्रसामग्री पुरवत आहे आणि तिला आधुनिकीकरणात मदत करत आहे मग ते लष्कर असो, विमानन असो किंवा नौदल. एकूणच, आपण आज केलेल्या चर्चेच्या परिणामांनी आम्ही पूर्णपणे समाधानी आहोत. मला पूर्ण विश्वास आहे की हा दौरा आणि केलेले करार भारत-रशिया रणनीतिक भागीदारी अधिक खोल करतील आणि दोन्ही देशांच्या नागरिकांना त्याचा लाभ मिळेल.पुतिन म्हणाले की गेल्या वर्षी भारत-रशिया द्विपक्षीय व्यापारात १२% वाढ झाली, जे स्वतःमध्ये नवा विक्रम आहे. विविध स्रोतांमध्ये आकडे थोडे फरकाने दिसतात, परंतु सरासरी हा व्यापार सुमारे ६४ अब्ज अमेरिकी डालर्स आहे.त्यांनी म्हटले की वंदाही व्यापाराचा स्तर तितकाच मजबूत राहील अशी अपेक्षा आहे. दोन्ही देश व्यापार १०० अब्ज डालरर्सपर्यंत नेण्यासाठी तयार आहेत. रशियातून भारतात होणा-या आयातीतील सुमारे ७८% हिस्सा कच्च्या तेलाचा आहे. इतर तेल आणि कोळसा यात धरला तर हा आकडा ८५% पर्यंत जातो. तर भारतातून रशियाला औषधे, फाइन केमिकल्स, वस्त्रे, चहा, काफी, तांदूळ, मसाले इत्यादींची निर्यात होते.

## पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना

भारत दौ-याच्या दुस-या दिवशी म्हणजे आज, शुक्रवारी व्लादिमीर पुतिन यांचे राष्ट्रपती भवनात औपचारिक स्वागत केले जाईल. त्यानंतर ते राजघाटावर जाऊन महात्मा गांधींना अभिवादन करतील. पुढे ते हैदराबाद हाऊस येथे द्विपक्षीय आणि प्रतिनिधिमंडळ स्तरावरील चर्चांत सहभागी होतील. प्रतिनिधिमंडळाच्या बैठकीत काही प्रमुख उद्योगपतीही सहभागी होण्याची शक्यता आहे. आज, शुक्रवारी पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष पुतिन भारत-रशिया बिझनेस फोरममध्ये सहभागी होतील. यानंतर राष्ट्रपतींच्या द्रौपदी मुर्मू यांच्या आमंत्रणानुसार पुतिन राष्ट्रपती भवनातील भोजमध्ये उपस्थित राहतील आणि त्यानंतर राष्ट्राध्यक्ष पुतिन मॉस्कोच्या दिशेने रवाना होतील.

## लग्नाचे वय नसले तरी

असा आरोप याचिकेत करण्यात आला होता. कोटा पोलिसांकडे लेखी तक्रार दिल्यानंतरही कोणतीही कारवाई न झाल्याचे जोडप्याने न्यायालयात सांगितले. राज्याच्या वतीने हजर असलेले सरकारी वकिल विवेक चौधरी यांनी असा दावा केला की, मुलगा २१ वर्षांचा नसल्याने तो कायदेशीररित्या विवाह करू शकत नाही आणि म्हणूनच त्याला लिव्ह-इनमध्ये राहण्याचा अधिकार देऊ नये. मात्र हायकोर्टाने हा युक्तिवाद धुडकावून लावला. न्यायालयाने स्पष्ट सांगितले की, संविधानाच्या कलम २१ अंतर्गत प्रत्येक नागरिकाला जीवन जगण्याचा आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा अधिकार मिळालेला आहे आणि कोणीही हा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही. या कलमाचा भंग म्हणजे थेट संविधानाचा भंग मानला जाईल.

न्यायमूर्ती ढांड यांनी नमूद केले की केवळ विवाहाचे वय पूर्ण झाले नाही म्हणून त्यांचे मूलभूत हक्क हिरावून घेता येणार नाहीत. तसेच लिव्ह-इन रिलेशनशिप भारतात बेकायदेशीर नाही आणि ती कोणत्याही प्रकारे गुन्हा ठरत नाही, हेही न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने पुढे आदेश दिला की भिलवाडा आणि जोधपूर (ग्रामीण) जिल्ह्यांच्या एसपींनी याचिकेत नमूद केलेल्या धमकीची खातरजमा करून आवश्यक असल्यास जोडप्याला संरक्षण द्यावे. हा निर्णय केवळ या जोडप्यासाठीच नव्हे तर स्वतंत्र निर्णय घेणा-या सर्व तरुण जोडप्यांसाठी महत्त्वाचा मानला जात आहे.

## ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण

संभ्रम निर्माण झाला होता. परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या आदेशामुळे आता ही भीती संपुष्टात आली आहे. या आदेशामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला स्पष्ट दिशा मिळाली असून, निवडणुका पुन्हा अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडणार नाहीत, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. निवडणूक आयोगाने दिलेली वेळमर्यादा काटेकोरपणे पाळावी, ऊच्च न्यायालयांनी निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि स्थानिक संस्थांच्या निवडणुका वेळेत पार पडाव्यात, या मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

**नगरपरिषद-नगरपंचायत निवडणुकीचे निकाल २१ डिसेंबरलाच जाहीर करा -** सर्वोच्च न्यायालयाने आज (ता.५) राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांच्या निकालांबाबत महत्त्वाचा निर्णय दिला. २ डिसेंबरला झालेल्या मतदानाचे निकाल २१ डिसेंबरलाच जाहीर करावे, असा स्पष्ट आदेश कोर्टाने दिला. नागपूर खंडपीठाच्या निकाल जाहीर करण्याच्या आदेशाला विरोध करणारी याचिका कोर्टाने फेटाळली आणि खंडपीठाचा निर्णय कायम ठेवला. तसेच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील वर्षी ३१ जानेवारीपूर्वी घेण्याचे निर्देशही पुन्हा दिले.

नागपूर खंडपीठाचा निर्णय कायम-नुकतेच नागपूर खंडपीठाने निवडणुकांचे निकाल २१ डिसेंबरला जाहीर करण्याचा आदेश दिला होता. मात्र या आदेशाविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका दाखल झाली होती. आज या याचिकेवर सुनावणी झाली आणि सुप्रीम कोर्टाने ती पूर्णपणे फेटाळून लावली. त्यामुळे नागपूर खंडपीठाचा निर्णय जशास तसा कायम राहिला. निकाल २१ डिसेंबरलाच-सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की २ डिसेंबर रोजी ज्या नगरपरिषद आणि नगरपंचायतींचे मतदान झाले, त्यांच्या सर्व निकालांचा जाहीर दिवस २१ डिसेंबरच असेल. काही ठिकाणी मतदान २० डिसेंबरला ढकलले असले तरी २ डिसेंबरला झालेल्या मतदानाचा निकाल मागे ढकलता येणार नाही, असे कोर्टाने सांगितले. याशिवाय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचा आदेश सुप्रीम कोर्टाने आधीच दिला होता. आजही न्यायालयाने ही अंतिम मुदत काटेकोरपणे पाळण्याचे निर्देश पुन्हा दिले. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाला आता जिल्हापरिषद आणि सर्व निवडणुकांचे नियोजन ३१ जानेवारीची अंतिम तारीख लक्षात ठेवून करावे लागणार आहे. एकूणच, नगरपरिषद-नगरपंचायत निकाल प्रक्रियेतील अनिश्चितता आजच्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे संपली असून २१ डिसेंबरलाच हे निकाल लागणार आहेत.

## सहकारी संस्थांच्या निवडणुकीला

संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. ३० सप्टेंबर २०२५ रोजीपर्यंत या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या. तर ज्या संस्थांच्या निवडणुका घेण्याचे हायकोर्ट, सुप्रीम कोर्टाने आदेश दिले होते. त्या सहकारी संस्थांच्या निवडणुका वगळून हे आदेश देण्यात आले होते. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींचा बिगुल वाजला आहे. नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुकांचा एक टप्पा पूर्ण झाला असून आता २० डिसेंबर रोजी दुसरा टप्पा होणार आहे. त्यानंतर २१ डिसेंबर रोजी निकाल लागेल. तर महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुका कधी होतील याविषयी राज्य निवडणूक आयोगाने कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. पण सध्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा हंगाम सुरू आहे. तोच दाखला देत सहकारी संस्थांच्या निवडणुकांना पुन्हा एकदा ब्रेक लागला आहे.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका सुरू आहे. तर महापालिका, जिल्हा परिषद निवडणुका वेग घातल्या आहेत. त्यामुळे ऊच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेशान्वये ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत, ते वगळून इतर सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. एकदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्यानंतर या निवडणुकांना मुहूर्त लागणार आहे.

## कर्नाटकात मासिक पाळीची

मागील महिन्यातच खासगी क्षेत्रात काम करणा-या महिलांसाठीही हा नियम लागू केला होता. कारखाने, दुकाने, व्यावसायिक आस्थापने, वृक्षारोपण अशा विविध उद्योगांमध्ये काम करणा-या कायमस्वरूपी, कंत्राटी आणि आउटसोर्सड महिला कर्मचा-यांसाठीही मासिक पाळीची पगारी रजा अनिवार्य करण्यात आली आहे.

***आरोग्य आणि समानतेसाठी मोठे पाऊल-*** मासिक पाळीदरम्यान महिलांना होणारा शारीरिक त्रास लक्षात घेऊन, सरकारने घेतलेला हा निर्णय महिला कर्मचा-यांच्या आरोग्यासाठी आणि कामाच्या ठिकाणी समानतेसाठी एक मोठे पाऊल उचलल्याचे मानले जात आहे. कर्नाटक हे असे पाऊल उचलणारे देशातील पहिले राज्य नसले तरी, सरकारी कर्मचा-यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरला आहे.

## शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर

गोकुलदास राऊत, शैलेंद्र दहातोंडे, राजेश सावरकर, प्रवीण कोल्हे, प्रशांत निमकर, नंदकिशोर पाटील, मनीष काळे, सरिता काठोळे, विनिता घुलक्षे, सुषमा वानखडे, भावना ठाकरे, आल्हाद तराळ, प्रेमसुख ठोंबरे, निलेश कांडलकर, पंकज दहिकर सह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## कुख्यात गुन्हेगार जेरबंद

मात्र सकाळी ७.३० वाजता गाडी गायब असल्याचे आढळले. परिसरात शोध घेतल्यावरही वाहन न मिळाल्याने फ्रेजरपुरा पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. तक्रार मिळताच पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणी आणि गोपनीय माहिती यांच्या आधारे संशयिताचा माग काढला. तपासादरम्यान सचिन शामराव वानखडे (वय ४२, फ्रेजरपुरा) हा संशयित हाती लागला. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली व त्यानंतर चोरीची ॲक्टीव्हा जप्त करण्यात आली. आरोपी पूर्वीही मालमत्तेच्या गुन्ह्यांमध्ये सक्रिय असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट, निलेश गावंडे, पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन, योगेश श्रीवास, तसेच कर्मचारी हरीश चौधरी, शशिकांत गवई, सुरज यादव, जयेश परिवाले, रोशन वऱ्हाडे यांचा सहभाग होता. फ्रेजरपुरा पोलिसांच्या तत्परतेमुळे चोरीचा गुन्हा उघडकीस आला आणि वाहन संबंधीत मालकाला परत मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

## बेंबळा शिवारखेडा रोडचे

व असदपूर या गावांना जोडणारा हा रोड असून या रोडने तिनही गावातील शेतकऱ्यांची शेती असून शेतीच्या व दैनंदिन कामासाठी या रोडने नागरिकांची रहदारी राहत असून जर तिनच दिवसात हा रोड उखडत असेल तर पावसाळ्याचे काय? असा प्रश्न आताच निर्माण झाला आहे.

या निकृष्ट व बोगस कामात संबंधित ठेकेदार, बांधकाम विभागाचे अधिकारी यांची मिलिभगत असल्याचे बोलल्या जात आहे.

## मनपा मार्केटमध्ये तीन

दुकानात तसेच डॉ. अनूप श्रीरामवार यांच्या दवाखान्यात मात्र चोरट्यांना काहीही सापडले नाही. तातेड यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे. दरम्यान, शहरात सातत्याने वाढणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे व्यापारी आणि नागरिकांमध्ये प्रचंड असुरक्षिततेची भावना पसरली असून पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## स्वच्छता कंत्राटदार कोणाक

मिळू लागले आहे.त्यामुळे अमरावती वासियांना तूर्तास तरी अस्वच्छतेचा सामना करावा लागणार आहे. कोट्यावधी रुपये कंपनीला देऊनही याचा फायदा नागरिकांना सध्या तरी दिसून येत नाही. कंपनीला लवकरात लवकर मुहूर्त मिळावा आणि कचरा संकलन नियम कामाला सुरू व्हावे अशी मागणी शहरवासीयांकडून होऊ लागलेली आहे.

## मनरेगा घोटाळ्याचा तपास

ही चौकशी महत्त्वाची ठरणार आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रणाली कसर हिला अटक करून तीन दिवसांची पोलिस कोठडी मिळविण्यात आल्यानंतर अनेक धक्कादायक खुलासे समोर आले. कोठडीत दिलेल्या जबाबात तिने दहा पेक्षा अधिक सहकार्य करणाऱ्यांची नावे घेतली आहेत. त्यानंतर सहआरोपी म्हणून बीडीओ सुनीता मसरकोल्हे यांना अटक केली असता, त्यांच्या घरी घेतलेल्या झडतीत ६० हजारांची रोकड जप्त करण्यात आली. दोघांच्या बयाणांमुळे तपासाचे धागेदोरे आणखी मजबूत झाले असून, निधी अपहाराचे जाळे अधिक मोठ्या प्रमाणात पसरल्याची खात्री तपास यंत्रणेला वाटू लागली आहे.

तपासाची कोंडी अधिक घट्ट होत असल्याने प्रकरण अजून काहींना गाठणार असल्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. विशेषतः मनरेगा विभागातील कार्यरत अधिकारी, काही पूर्वीचे कर्मचारी, तसेच ठेकेदार पथकांवर तपास यंत्रणेचे लक्ष केंद्रित आहे.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या

संयुक्त पूर्व परीक्षा २०२६: ही पूर्व परीक्षा ३१ मे २०२६ रोजी आयोजित केली जाईल. या परीक्षेचा निकाल अंदाजे ऑगस्ट २०२६ मध्ये अपेक्षित आहे. राज्य सेवा मुख्य परीक्षा २०२६: नागरी सेवा मुख्य परीक्षा ०३ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२६ या दरम्यान होईल. या मुख्य परीक्षेचा निकाल अंदाजे फेब्रुवारी २०२७ मध्ये अपेक्षित आहे.

महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६: पूर्व परीक्षा १४ जून २०२६ रोजी तर, मुख्य परीक्षा ०५ डिसेंबर २०२६ रोजी नियोजित आहे.

महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६: पूर्व परीक्षा १२ जुलै २०२६ रोजी तर, मुख्य परीक्षा १३ डिसेंबर २०२६ रोजी नियोजित आहे.

इतर महत्त्वाच्या मुख्य परीक्षा (२०२५ मध्ये पूर्व परीक्षा झालेल्या भरतीसाठी) पुढीलप्रमाणे आहे :

राज्य सेवा मुख्य परीक्षा - २०२५: २९ मार्च २०२६ पासून सुरू ते २३ एप्रिल २०२६ पर्यंत होईल. महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा-२०२५ : ०५ मे २०२६ पासून सुरू ते ०९ मे २०२६ पर्यंत होणार तर महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा व कृषि सेवा मुख्य परीक्षा- २०२५ : १६ मे २०२६ रोजी तर महाराष्ट्र कृषि सेवा मुख्य परीक्षा २०२५ -१६ मे २०२६ रोजी होणार आहे. उपरोक्त सर्व परीक्षांचे निकाल अंदाजे जुलै आणि ऑगस्ट २०२६ मध्ये जाहीर होणे अपेक्षित आहे.

## दोन महाविद्यालयीन

केली पण तिचा कोणताही ठाव ठिकाणा लागला नाही. यामुळे कुटुंबीयांनी तिच्या बेपत्ता होण्याची तक्रार पोलीस ठाण्यात दिली. शिरखेड पोलीस ठाण्याच्या क्षेत्रात राहणारी विद्यार्थिनी ३ डिसेंबर रोजी कॉलेजला गेली होती. ती परत नाही आली. तिला कॉलेज मध्ये तिच्या मैत्रिणी सोबत पाहण्यात आले होते. यानंतर ती कुणाला दिसली नाही. कुटुंबीयांनी तिच्या बद्दल सर्वांना विचारले पण काही माहिती नाही मिळाली. शेवटी तिच्या वडिलांनी पोलिस ठाण्यामध्ये तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## सेस कायद्या विरोधात

चिर शांतता होती. राज्यात बाजार समिती कायदा लागू आहे, त्या अनुषंगाने बाजार आवारात व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना विविध प्रकारचे कर, सेस बाजार समितीला द्यावे लागत आहेत. मात्र व्यापार खुला केल्याने बाजार समिती आवारा बाहेर व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा कर किंवा सेस भरावा लागत नाही. बाजार समितीत व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना बाजार समितीच्या नियमांचे पालन करत व्यापार करावा लागतो. खुला बाजार केल्यामुळे नियम पाळणाऱ्या बाजार समितीत व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांचे हाल होत आहेत. त्यामुळे बाजार समिती कायदा सर्वांसाठी समान असावा, जीएसटी शुल्काच्या ओझ्याखाली व्यापारी वर्ग दबला आहे. यामुळे त्यांना दिलासा द्यावा, या सह इतर मागण्यांसाठी हा बंद पुकारण्यात आला होता. त्यामुळे अमरावती बाजार समिती आज बंद राहिली.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ६ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय


paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## कारंजा शहरात बनावट नोटांसह एका इसमास अटक; पोलिसांची यशस्वी कारवाई

**■ प्रतिनिधी | कारंजा ■**

**दिनांक ४ डिसेंबर रोजी कारंजा शहर पोलिसांनी गुप्त माहितीनंतर केलेल्या कारवाईत ५०० रुपयांच्या एकूण ६९ बनावट नोटांसह एक इसमाला अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 'इम्मी' नावाने ओळखला जाणारा हा इसम शहरात फिरत असल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाली होती.**





गुप्त माहिती मिळताच ग्रे. पोउपनि महेश गणुजी नेवारे व पोलिस पथकाने शोधमोहीम राबवली. त्यात संशयित इसम चंदनवाडी ते सावरकर चौक परिसरात फिरताना आढळला. ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव हसन उर्फ इम्मी छट्टु निमसुरवाले (वय ३९, रा. गवळीपुरा, कारंजा) असे सांगितले.

दोन पंचांच्या उपस्थितीत त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ५०० च्या ६९ बनावट नोटा ०२ मोबाईल फोन असा मुद्देमाल आढळून आला. पंचनामा करून संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी पोस्टे कारंजा शहर येथे गु.र. नं. ७२४/२०२५ नोंद करून कलम १७९, १८० भा.न्या. संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती लता फड, व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. प्रदीप पाडवी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक दिनेशचंद्र शुक्ला, ग्रे. पोउपनि महेश नेवारे, पोउपनि वसंत ठाकरे, पोहवा गणेश जाधव, पोहवा मयुरेश तिवारी, पोहेकॉं अजय धनकर, पोहवा उमेशकुमार बिबेकर, पोका नितीन पाटील, पोका अनिस निमसुरवाले, पोकॉं अमित भगत, पोका मोहम्मद परसुवाले, मपोशि अश्विनी कानडे यांचा विशेष सहभाग होता. पुढील तपास सपोनि जयदीप पवार करीत आहेत.

## मंत्रोच्चाराच्या गजरात विमलहंस महाराज यांना आचार्यपदवी प्रदान

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

नंदिसूत्रच्या मंत्रोच्चाराच्या गजरात आचार्य विमलबोधी सुरिश्वरजी महाराज साहेब यांनी पंन्यास प्रवर श्री विमलहंस महाराज यांना शुक्रवार दि.५ डिसेंबर रोजी आचार्यपदवी प्रदान केली.विमलहंस विजयजी महाराज आता यापुढे श्री अंतरीक्षजी तीर्थ अभ्युदय प्रेरक परम पूज्य आचार्य देव श्रीमद्विजय विमलहंससूरीश्वरजी महाराजा म्हणून ओळखले जातील.शिरपूर जैनमध्ये पार पडलेल्या या ऐतिहासिक सोहळ्यात श्वेतांबर जैन समाजाचे पुरुष,महिला,युवक,युवती व बालकांसह हजारोंच्या संख्येने भाविक या दैदिप्यमान कार्यक्रमाचे साक्षीदार बनले.

आचार्य पदवीदान सोहळ्यानिमित्त वर्धमान तपोनिधि आचार्य भगवंत श्री विमलबोधीसूरीश्वरजी महाराज साहेब यांचे अन्य मुनिश्रींसह पुणे येथून १ डिसेंबर रोजी शिरपूर नगरीत आगमन झाले होते. शिरपूर जैन नगरीत पहिल्यांदाच पार पडलेला हा सोहळा ऐतिहासिक ठरला.भव्यदिव्य या महोत्सव प्रसंगी वर्धमान तपोनिधि आचार्य भगवंत विमलबोधीसूरीश्वरजी म.सा. यांच्यासह मुनीराज रत्न वल्लभ विजयजी म.सा.,पंन्यास प्रवर श्री परमहंस विजयजी आदींची उपस्थिती लाभली.

## हिवरखेड–चिचारी–चंदनपूर–धोंडा आखर रस्त्याचे काम युद्धस्तरावर सुरू

**■ प्रतिनिधी | हिवरखेड ■**

तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड, चिचारी, चंदनपूर आणि धोंडा आखर ही मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या इको–सेन्सिटिव्ह झोनमधील महत्त्वाची आदिवासी गावे. शिक्षण, आरोग्य, बाजारपेठ, वाहतूक आणि शासकीय सेवांपासून दशकभर तुटलेला हा भाग रस्त्याच्या अभावामुळे सतत अडचणीत होता. वन विभागाच्या मंजुऱ्या, पर्यावरणीय अटी, तांत्रिक अहवाल आणि राजकीय उदासीनतेमुळे हा रस्ता दहा वर्षांहून काळ प्रलंबित राहिला.

मात्र सातत्याने केलेल्या पाठपुराव्यानंतर अखेर रस्ता बांधकामाला हिरवा झेंडा मिळाला आहे. वन विभागाकडून परवानगी मिळाल्यानंतर प्रधानमंत्री ग्राम सडक योजना आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व्हे, मोजमाप, मार्किंग, भू–तांत्रिक परीक्षण व रस्ता साफसफाई यांसह प्रारंभिक कामे युद्धस्तरावर सुरू केली आहेत. उपलब्ध बांधकाम हंगामात रस्ता पूर्ण करून मार्च–एप्रिल २०२६ पर्यंत लोकांसाठी खुला करण्याचा विश्वास शासकीय अभियंत्यांनी दिला आहे.

### दशकभरापासून होता प्रलंबित : मेळघाटातील आदिवासी पट्ट्यासाठी दिलासादायक निर्णय

'मेळघाटातील शेतकरी आणि आदिवासी बांधवांच्या जीवनात बदल घडविणारा हा ऐतिहासिक मार्ग आहे. काही नेत्यांनी श्रेय मिळविण्यासाठी भूमिपूजन केले, मात्र प्रत्यक्ष काम सुरू करण्यात ते अपयशी ठरले. आम्ही सातत्याने पाठपुरावा केला आणि अनेक अधिकाऱ्यांनी, पत्रकारांनी व नागरिकांनी साथ दिली. आज रस्ता प्रत्यक्षात सुरू होत असल्याचा मला आत्मिक आनंद आहे.'

**रजनीश पोटे,** सामाजिक कार्यकर्ता, पुणे

.......................

'रस्त्यासाठी आम्ही वर्षानुवर्षे आवाज उठवीत होतो. पोटे यांच्या पुढाकारामुळे आज काम प्रत्यक्षात सुरू झाले आहे. रस्ता पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवास सुलभ होईल, रुग्णांना तातडीने दवाखान्यात पोहोचविणे शक्य होईल, शेतकऱ्यांची मालवाहतूक स्वस्त आणि जलद होईल. पुनर्वसित आदिवासी कुटुंबांचे जीवनमान निश्चितच उंचावेल.'

**धिरज संतोष बजाज,** सामाजिक कार्यकर्ता, हिवरखेड

**मुख्य अधिकाऱ्यांशी चर्चा – कामाचा टर्निंग पॉइंट :** रस्त्याचा मुद्दा स्थानिक नागरिक, विस्थापित कुटुंबे व सामाजिक कार्यकर्त्यांनी जोरदारपणे पुढे आणला. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते रजनीश पोटे यांनी मार्च २०२५ मध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे मुख्य अभियंता संभाजी माने यांची सविस्तर भेट घेऊन प्रकल्पाची सर्व तांत्रिक, आर्थिक व पर्यावरणीय माहिती मांडली. काँक्रीट रस्ता शक्य नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर डांबरी (BT) रस्त्याचा व्यावहारिक पर्याय निश्चित करण्यात आला. अमरावती, नागपूर आणि अकोट येथील वन अधिकाऱ्यांशी समन्वय साधून प्रस्ताव सादर करण्यात आला. ऑक्टोबरमध्ये इको–सेन्सिटिव्ह झोन मॉनिटरिंग कमिटीने प्रस्तावास मंजुरी देताच रस्त्याला प्रत्यक्ष गती मिळाली. ही बैठकच संपूर्ण प्रक्रियेतील निर्णायक क्षण ठरली.

## १० डिसेंबरला हिवाळी अधिवेशनावर पोलीस पाटीलांचा महामोर्चा

### प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील पोलीस पाटील एकत्र

**■ प्रतिनिधी | खेट्री ■**

राज्यातील पोलीस पाटीलांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी १० डिसेंबर रोजी नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनावर महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोसिएशनतर्फे महामोर्चा काढण्यात येणार आहे. हा मोर्चा यशवंत स्टेडियम येथून सुरू होईल.

राज्याचे अध्यक्ष नंदकिशोर हिवसे पाटील, राज्य कार्याध्यक्ष राहूल उके पाटील, उपाध्यक्ष प्रेमचंद राठोड पाटील, महासचिव सुजय देशमुख, राज्य समन्वयक अशोक गेडाम, संघटक मनोज हिवरकर, विदर्भ उपाध्यक्ष निलाकांत पुसदेकर, मराठवाडा अध्यक्ष गजानन मोरे, विभागीय अध्यक्ष विजय सरदार, प्रसिद्धी प्रमुख संतोष बोर्डे तसेच सर्व जिल्हाध्यक्ष यांच्या नेतृत्वात हा मोर्चा निघणार आहे.

पोलीस पाटीलांच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी अनेकदा निवेदने देण्यात आली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांची भेटही घेण्यात आली. परंतु मागण्या प्रलंबित असल्याने अमरावती येथील बैठकीत महामोर्चाचा निर्णय घेण्यात आला.राज्यभरातील सर्व पोलीस पाटील या मोर्चात सहभागी होणार असून या आंदोलनाला स्थानिक लोकप्रतिनिधींचाही पाठिंबा मिळत आहे. विजय सरदार, राजेंद्र चेनेकर आणि संतोष बोर्डे यांनी पोलीस पाटील बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.


**या आहेत मुख्य मागण्या :**

- मानधन २५ हजार रुपये करणे
- पोलीस पाटील अधिनियम १९६७ मध्ये आवश्यक दुरुस्ती
- थकीत प्रवास भत्ता व स्टेशनरी खर्च देणे
- पोलीस पाटील नुतनीकरण रद्द करणे
- वयोमर्यादा ६० वरून ६५ करणे
- वर्षातून दोन प्रशिक्षण कार्यशाळा
- कर्तव्यावर मृत्युमुखी पडल्यास वारसांना नियुक्ती
- रिक्त पदे भरती करणे
- प्रत्येक जिल्ह्यात पोलीस पाटील भवन
- वैद्यकीय सुविधा
- सेवानिवृत्ती नंतर १० लाख रुपये सहाय्य

## अभिवादन मोटासायकल रॅलीचे आयोजन

**कारंजा :** स्थानिक शहरात दरवर्षी प्रमाणे यंदाही विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथुन भव्य अभिवादन मोटरसाइकल रैलीचे आयोजन करण्यात आले आहे.

रैली सुरु होण्यापूर्वी चौकात अगोदर प्रतिमेचे पूजन व वंदन करण्यात येईल त्यानंतर रैलीची सुरुवात करून रैली ही अतिशय शांतबद्ध पद्धतीने बुद्धम शरणं गच्छामी च्या गजरात समस्त



महापुरुष यांना हारार्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातुन, प्रारंभ होऊन जयस्तंभ चौक, नेहरू चौक, मेन रोड, नगीना मस्जिद, महात्मा फुले चौक, रामासावजी चौक, जिजामाता चौक, पोहावेश मार्गे, बायपास झांसीराणी चौकातुन पुढे जाऊन नविन बस स्टैंड मार्गे सम्राट अशोक नगर येथे रैलीचा समारोप करण्यात येईल. या अभिवादन रैलीमधे कारंजा तालुक्यातील समस्त आंबेडकरी अनुयायी यांनी नीळे पंचशील झेंडे सोबत घेऊन बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन रैली समितिचे अध्यक्ष महादेव ठोंबरे, उपाध्यक्ष सचिन खांडेकर, सचिव रविभाऊ बनसोड, कोषाध्यक्ष किशोर उके, सदस्य प्रविण मडामे यांनी केले.

## महापरिनिर्वाणदिनी चिखली येथे आज विविध कार्यक्रम

**रिसोड :** भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील चिखली येथे ६ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.सकाळच्या सुमारास पंचशिल बुद्ध विहार, चिखली येथे सामुहिक बुद्ध वंदना, धम्म वंदना, संघ वंदना यांसह अन्य कार्यक्रम होणार आहेत. सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिर कार्यक्रमाला सुरूवात होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपचे माजी तालुकाध्यक्ष स्वप्नीलकुमार सरनाईक राहतील. रक्तदान शिबिराचे उद्घाटक म्हणून रिसोड पोलिस स्टेशनचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण राहतील. यावेळी चिखली, वनोजा, व्याड, घोटा, कवठा, पेडगाव, देऊळगाव, किनखेडा, चिंचाबापेन यांसह पंचक्रोशीतील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. सकाळी १० वाजतापासून रक्तदान शिबिराला प्रारंभ होणार आहे. रक्तसंकलनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय वाशिमच्या शासकीय रक्तपेढीची तज्ज्ञ चमू चिखलीला येणार आहे.

रक्तदानासाठी ५ डिसेंबरपर्यंत ६० जणांनी संमतीपत्र दिले आहेत. रक्तदान शिबिरात युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सम्राट मित्र मंडळासह युवक व गावकऱ्यांनी केले आहे.

## आज विदर्भ केसरी ब्रजलालजी बियाणी जयंती सोहळा

**अकोला :** ज्येष्ठ स्वतंत्रता सेनानी, भारतीय राज्य घटना समितीचे सदस्य विदर्भ केसरी ब्रजलाल बियाणी यांच्या जयंतीचा सोहळा आज शनिवार दि ६ डिसेंबर रोजी सकाळी ८-३० वाजता स्थानीय गांधी जवाहरलाल बाग मधील स्व भाईजीच्या पुतळा परिसरात आयोजित करण्यात आला आहे.माहेश्वरी समाज ट्रस्ट,अकोला जिल्हा मराठी पत्रकार संघ,विदर्भ चेंबर,जेष्ठ नागरिक संघ व राजस्थानी सेवा संघाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात उपस्थित राहणार आहेत.

## राज्यभर धुमाकूळ : 'थंडीचे हेडफोन'चा सोशल मीडियावर स्फोट!

**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

राज्यभर सध्या सोशल मीडियावर एका लोकप्रिय सिने तारकेने लहान मुलांचे थंडीचे हेडफोन लावून तयार केलेला व्हिडिओ झपाट्याने व्हायरल झाला आहे. या एका व्हिडिओने बाजारपेठ अक्षरशः हलवून सोडली असून घराघरात जितके सदस्य तितके मोबाईल असल्याने हा ट्रेंड क्षणात राज्यभर पोहोचला आहे.

ऑनलाईनवर सुरुवातीला ४५० ते ?५०० ला दिसणारे हे हेडफोन गावातील दुकानांमध्ये तुलनेने स्वस्त मिळू लागल्यानंतर मागणी झपाट्याने वाढली. मुलं, तरुणाई आणि महिलांमध्ये या हेडफोनची अशी क्रेझ निर्माण झाली की दुकानांमध्ये तुटवडा निर्माण झाला आहे.

**भाव आकाशाला भिडले!** दैनंदिन वापराचे फक्त ?१२०



चे हेडफोन आता थेट २५० ते ३०० पर्यंत विकले जात आहेत. तर लाईट असलेले आकर्षक हेडफोन सरळ ३५० ला मिळू लागले असून अनेक ठिकाणी याहूनही जास्त भाव आकारले जात आहेत.

**तुटवडा – काळाबाजार वाढला!** ज्यांच्याकडे अजूनही माल शिल्लक आहे ते व्यापारी चढ्या दराने विक्री करत आहेत. काही भागात तर हेडफोनचे रेट मिनिटागणिक वाढत आहेत, एवढी भन्नाट मागणी दिसत आहे.

**सोशल मीडियावर धुमाकूळ! :** लहान-मोठे सर्वजण हे हेडफोन लावून रील्स बनवत आहेत. याच्या ट्रेंडला साथ देत पालकांनीही मुला-मुलींचा हट्ट पुर्तीसाठी मोठ्या रकमेचा खर्च सुरू केला आहे.

**माल उपलब्ध नाही – नागरिक निराश! :** सध्या मार्केटमध्ये स्टॉकच उपलब्ध नसल्याने अनेक जण नाराज होऊन परत फिरत आहेत. काही दुकानांवर तर स्टॉक संपला च्या पाट्या लावल्या गेल्या आहेत.

**एका व्हिडिओने राज्यभरात मांडवळ – विक्रीत 'स्फोटक' वाढ!**

एका सिने तारकेच्या व्हिडिओने सुरू झालेला हा ट्रेंड आता राज्यातील बाजारपेठेचं गणित बदलत आहे. व्यापारी कमाई करून गब्बर झालेत, तर लोक मात्र हेडफोनसाठी दुकान-दुकान भटकत आहेत.

## जिल्ह्यात १३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोक न्यायालयाचे आयोजन

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

न्यायालयातील तडजोडीस पात्र प्रलंबित तसेच वाद दाखलपूर्व प्रकरणे दोन्ही पक्षकारांचे सहमत, आपसी तडजोडीने निकाली काढण्यात येणार आहे. त्यामुळे पक्षकार, अधिवक्ता तसेच नागरिकांनी १३ डिसेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये मोठ्या प्रमाणात प्रकरणे ठेवून निकाली काढावी, असे आवाहन अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम यांनी केले आहे.

न्यायालयात तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे आपसी सामंजस्यातून तडजोडीद्वारे निकाली काढण्यासाठी लोक अदालत हे प्रभावी माध्यम ठरले आहे. लोक अदालतीद्वारे अनेक पक्षकारांनी आपली प्रकरणे वेळेआधी निकाली काढली आहेत. त्यामुळे पक्षकारांना वेळ, खर्च आणि मानसिक त्रास



टाळता येतो. दोन्ही पक्षकारातील संबंध सलोख्याचे राहतात. तसेच लोक अदालतीमुळे न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले आहे. न्यायालयात दाखल असलेली सर्व तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे, दिवाणी दावे तसेचवाद दाखलपूर्व तडजोड पात्र प्रकरणे येत्या राष्ट्रीय लोकअदालतीत तडजोडीने निकाली काढण्यासाठी ठेवण्यात येणार आहे. जिल्हा मुख्यालयासह जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयामध्येही लोक अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

## खो-खो जिल्हा निवड चाचणी ७ डिसेंबरला



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

गडचिरोली येथे १३ ते १५ डिसेंबर २०२५ दरम्यान होणाऱ्या विदर्भ स्तरीय राज्य खो-खो अजिंक्यपद स्पर्धेसाठी वाशिम जिल्ह्याचा पुरुष व महिला संघ निवडण्यासाठी ७ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता न. प. महात्मा गांधी विद्यालयाच्या मैदानावर जिल्हा निवड चाचणी होणार आहे.

निवड चाचणीसाठी खेळाडूंनी मूळ आधार कार्ड, आधार कार्डची सत्यप्रत व अखिल भारतीय खो-खो फेडरेशन नोंदणी क्रमांकासह उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा खो-खो असोसिएशनचे सचिव गोविंदराव राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी प्रदीप अंभोरे (मो. ९२८४५१५८०६) यांच्याशी संपर्क साधावा.

## नांदेडच्या सक्षम ताटेच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्या



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

नांदेड येथील बौद्ध समाजाचा सक्षम गौतम ताटे या युवकाचे विजातीय समाजातील मुलीवर प्रेम होते.या प्रेमास मुलीच्या घरच्यांचा विरोध असल्याने मुलीच्या वडिलांनी व मुलांनी सक्षम गौतम ताटे या तरुण युवकांस दि.२७ नोव्हेंबर २५ रोजी गोळ्या झाडून व डोक्यावर फरशी मारून त्याची क्रुरपणे हत्या केली आहे.

म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे वतीने जिल्हाधिकारी यांचे मार्फत महाराष्ट्र शासनाकडे निवेदनाद्वारे सक्षम ताटेच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, सक्षमच्या कुटुंबाला व मुलगी आचल हीस पोलीस संरक्षण, घर, पन्नास लाख रुपयांची मदत आणि कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरी द्यावी.अशी मागणी केली आहे. निवेदनावर डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान,पिरीपाचे वाशीम जिल्हाध्यक्ष दौलतराव हिवराळे, समाजभूषण पुरस्कार प्राप्त प्रविण पट्टेबहादूर,अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालयाचे सचिव समाधान अवचार, कवी विलास भालेराव, अभिनेता अरविंद उचित,कवी ग.ना.कांबळे, निरंजन भगत, अक्षय सरकटे, अर्जून सरकटे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## नालीचा पाईप फुटल्याने अपघातांचा धोका वाढला

### विद्या कॉलनी परिसरातील प्रकार; नगरपरिषद लक्ष देणार का?

**■ प्रतिनिधी | अकोट ■**

अकोट शहरातील विद्या कॉलनी परिसरात गजानन मंदिराजवळ, सरकारी गोदामाकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यावर टाकण्यात आलेल्या सिमेंटच्या नाली पाईपमुळे गंभीर स्वरूपाचे अपघात होत आहेत. रस्त्याच्या मध्यभागी अर्धवट पद्धतीने बसविण्यात आलेल्या या पाईपवरून दररोज अनेक महिला, मुले आणि नागरिक दुचाकीने प्रवास करतात. पाईपच्या उंचवट्यामुळे सतत घसरणे, तोल जाणे आणि किरकोळ अपघातांच्या घटना घडत आहेत.

या धोकादायक परिस्थितीकडे वारंवार लक्ष वेधूनही संबंधित कर्मचाऱ्यांनी व नागरिकांनी केलेल्या विनंत्या दुर्लक्षित केल्या. पाईपच्या



काठावर माती अथवा मुरूम टाकून मार्ग समांतर करण्याची मागणी स्थानिकांनी वेळोवेळी केली. मात्र नाली बांधकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी उलट अपशब्दात प्रतिक्रिया दिल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

स्थिती गंभीर होत असल्याने एक स्थानिक वकील यांनी स्वतः पुढाकार घेत पावडे व टोपले घेऊन रस्त्यावर माती टाकून मार्ग समतल करण्याचे काम केले. ते काम करत असताना संबंधित कर्मचारी त्यांच्याकडे पाहत हसत असल्याचेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. ही जबाबदारी नगरपरिषद बांधकाम विभागाची असताना नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी एक वकील स्वतः काम करावे लागणे ही प्रशासनाची लाजिरवाणी बाब असल्याची भावना स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे. नागरिकांचे स्पष्ट मत आहे की, 'जर या ठिकाणी अपघातात एखाद्याचा जीव गेला असता, तर जबाबदार कोण—नगरपरिषद प्रशासन, मुख्याधिकारी की ठेकेदार?'विद्या कॉलनीतील नागरिकांनी तातडीने या रस्त्याची दुरुस्ती करून सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी अकोट नगरपरिषद बांधकाम विभागाकडे केली आहे. प्रशासनाने त्वरित कारवाई करून संभाव्य मोठ्या अपघाताला थांबवावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११ ■ शनिवार, ६ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# मनरेगा घोटाळ्याचा तपास निर्णायक टप्प्यात

## -'एपीओ'-'जेएओ'वरही कारवाईची शक्यता वाढली

## - ७० लाखांच्या निधी अपहार प्रकरणाने पंचायत समितीत खळबळ

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी पंचायत समितीत घडलेल्या मनरेगा निधी गिळंकृत प्रकरणाचा तपास आता महत्त्वाच्या वळणावर पोहोचला आहे. तब्बल ७० लाखांहून अधिकचा शासकीय निधी अपहार केल्याचे प्राथमिक तपासातून उघड होत असून, या प्रकरणात बडतर्फ एपीओ प्रणाली कसर व गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांच्या अटकेनंतर आता कार्यरत एपीओ आणि कनिष्ठ लेखा अधिकाऱ्यांवरही अटकेची टांगती तलवार निर्माण झाली आहे. तपासी पथकाने 'वेट, वॉच अँड अटॅक' या भूमिकेत तपासाचा वेग वाढविल्याने पंचायत समिती आणि मनरेगा विभागात प्रचंड खळबळ माजली आहे.

शुक्रवार, ५ डिसेंबर रोजी आर्वी पंचायत समितीतील विद्यमान सहाय्यक कार्यक्रम अधिकारी आणि कनिष्ठ लेखा अधिकारी दिगंबर चव्हाण यांना पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले. मनरेगाअंतर्गत विविध कामांची प्रक्रिया, निधीचे वितरण, बिलांचे परीक्षण, नोंदींचा प्रवाह तसेच कामांवरील प्रत्यक्ष खर्च याबाबत तपशीलवार माहिती दोघांकडून घेण्यात आली. तपास अधिकाऱ्यांच्या मते, निधी अपहार नेमका कोणत्या टप्प्यावर आणि कोणी केला, याचा सखोल अंदाज मिळवण्यासाठी ही चौकशी महत्त्वाची ठरणार आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रणाली कसर हिला अटक करून तीन दिवसांची पोलिस कोठडी मिळविण्यात आल्यानंतर अनेक धक्कादायक खुलासे समोर आले. कोठडीत दिलेल्या जबाबात तिने दहा पेक्षा अधिक सहकार्य करणाऱ्यांची नावे घेतली आहेत. त्यानंतर सहआरोपी म्हणून बीडीओ सुनीता मरसकोल्हे यांना अटक केली असता, त्यांच्या घरी घेतलेल्या झडतीत ६० हजारांची रोकड जप्त करण्यात आली. दोघांच्या बयाणांमुळे तपासाचे धागेदोरे आणखी मजबूत झाले असून, निधी अपहाराचे जाळे अधिक मोठ्या प्रमाणात पसरल्याची खात्री तपास यंत्रणेला वाटू लागली आहे.

तपासाची कोंडी अधिक घट्ट होत असल्याने प्रकरण अजून काहींना गाठणार असल्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. विशेषतः मनरेगा विभागातील कार्यरत अधिकारी, काही पूर्वीचे कर्मचारी, तसेच ठेकेदार पथकांवर तपास यंत्रणेचे लक्ष केंद्रीत आहे.

### मोबाईल कधी ऑन, कधी ऑफ संशयितांची धावपळ सुरू

'जनमाध्यम'ने वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर काही संशयितांची धडपड वाढली आहे. जिल्हा परिषद कार्यालयात घिरट्या घालत असलेल्या काही जणांनी तपासाबाबत माहिती मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले असून, त्यांचे मोबाईल कधी ऑन, कधी ऑफ होत असल्याचे पोलिसांना आढळले. तपासाची भीती वाढल्याची ही ठळक लक्षणे मानली जात आहेत.

### माळेगावात धाकधूक अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही फॉर्म्युला चर्चेत

माळेगाव (ठेका) येथील मनरेगा कामांमध्येही गोंधळ झाल्याची तक्रार आधीच नोंदली आहे. कामे प्रत्यक्षात कमी, तर बिलं मात्र पूर्ण दाखविण्याची पद्धत वापरून 'अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही' असा फंडा राबविण्यात आल्याचे आरोप असून, आता मुख्य आरोपींच्या अटकेनंतर तपास यंत्रणेचे लक्ष माळेगावाकडेही वळण्याची भीती स्थानिकांमध्ये वाढली आहे.

# गडकरींच्या हस्ते 'पूर्ती सुपर बाजार'चे भव्य उद्घाटन आज वर्ध्यात

**वर्धा जनमाध्यम :** नागपूरचा 'पूर्ती सुपर बाजार' आता वर्ध्यातही आपली शाखा सुरू करत आहे. आज शनिवार (६ डिसेंबर) रोजी सायंकाळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या अत्याधुनिक सुपर बाजारचे भव्य उद्घाटन होणार असून वर्ध्याच्या वाणिज्य क्षेत्रात एक नवे पर्व सुरू होणार आहे.




गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल २५ वर्षापूर्वी सुरू झालेल्या पूर्ती उपक्रमाने आजपर्यंत मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती व लघु-गृह उद्योगांना स्थिर बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे कार्य केले आहे. वन स्टॉप वन शॉप या संकल्पनेवर आधारित असलेल्या पूर्ती सुपर बाजारच्या माध्यमातून ग्राहकांना सर्व वस्तू एकाच छताखाली उपलब्ध होतात. त्याचबरोबर स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देणे हे पूर्तीचे प्रमुख ध्येय आहे.

वर्ध्यातील ही शाखा विदर्भाबाहेरील पहिली शाखा असल्याने व्यापारी व ग्राहक क्षेत्रात उत्सुकता आहे. तब्बल ६,८०० चौ. फुटांपेक्षा मोठ्या जागेत सजलेल्या या आधुनिक शाखेचे उद्घाटन युरीच मॉल, नागपूर रोड येथे होणार आहे.

उद्घाटन सोहळ्यास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, तसेच पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे.

नव्या सुपर बाजारमध्ये किराणा, क्रॉकरी, स्टेशनरी, कॉस्मेटिक्स, भेटवस्तू यांसह दैनंदिन जीवनातील आवश्यक वस्तूंची विशाल व विविध रेंज उपलब्ध राहणार आहे. याशिवाय तांदूळ महोत्सव, धान्य महोत्सव, आंबा महोत्सव, तसेच सणासुदीच्या काळात आकर्षक स्किम्स व सवलतीचे ऑफर्स देण्यात येणार आहेत.

या उद्घाटन कार्यक्रमासाठी वर्धेकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पूर्ती सुपर बाजारचे अध्यक्ष रविंद्र बोरटकर, सचिव राजीव हडप, दीपक सप्तर्षी, संदीप जाधव, संचालक केतकी कासखेडीकर आणि संचालक मंडळ यांनी केले आहे.


# इतवारात पोलिसांची धाडसी कारवाई; घरावर छापा टाकून ३.६२३ किलो गांजा जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहर पोलिसांनी इतवारा परिसरात अंमली पदार्थांविरोधात मोठी धडक कारवाई करत ३.६२३ किलो गांजा जप्त केला असून, एक आरोपीला अटक करण्यात आली आहे. ४ डिसेंबरला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे शहर पोलिसांनी ही कारवाई राबवून अंमली पदार्थविरोधी मोहिमेला आणखी गती दिली.

शहर पोलिस पथकाने इतवारा भागातील सुरज श्याम गौतम यांच्या निवासस्थानी अचानक छापा टाकला. झाडाझडतीदरम्यान घरात मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ साठवून ठेवण्यात आल्याचे आढळले. तपासाअंती घरातून ३ किलो ६२३ ग्रॅम गांजा हस्तगत करण्यात आला. जप्त केलेल्या गांजाची किंमत सदर बाजारभावानुसार ७३ हजार ५०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, गांजाची तस्करी नेमकी कुठून येते आणि कोणाशी संपर्कातून ही पुरवठा साखळी चालते याबाबत तपास अधिक गतीने सुरू आहे.

कारवाईत पोलीस उपनिरीक्षक शरद गायकवाड, गजेंद्र धर्मे, शैलेश चाफलेकर, अभिजीत वाघमारे, विजय पंचटिके, महेंद्र पाटील, रंजीत भुरसे, नितीन इटकरे, अश्पाक शेख, मीना माहिंदे व अक्षया सावळकर यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.



इतवारा परिसरातील ही कारवाई शहरात वाढत्या अंमली पदार्थांच्या हालचालींवर प्रभावी लगाम असल्याचे पोलिसांचा दावा आहे. यामुळे परिसरातील नागरिकांमध्येही समाधान व्यक्त होत असून, अशा कारवाया सातत्याने व्हाव्यात अशी मागणी होत आहे.

# १५ मागण्यांसाठी शिक्षकांचा एल्गार; सामूहिक रजा घेऊन शाळाबंद आंदोलन

**वर्धा जनमाध्यम :** राज्य शासनाच्या शिक्षण धोरणाविरोधात आणि १५ प्रमुख मागण्यांसाठी ५ डिसेंबरला जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांनी सामूहिक रजा घेत शाळाबंद आंदोलनाचा रणभेरी फुंकला. जिल्हा व तालुकास्तरावर मोठ्या संख्येने शिक्षक रस्त्यावर उतरले आणि जबाबदार प्रशासनाला निवेदने सादर करून आपला रोष नोंदविला.



आंदोलनातील सर्वाधिक चर्चेत असलेली मागणी म्हणजे टीईटीची सक्ती रद्द करण्याची. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले की, प्राथमिक शिक्षकांवर टीईटीची जबरदस्ती अन्यायकारक असून राज्य शासनाने शिक्षकांच्या संरक्षणार्थ भूमिका घेणे अत्यावश्यक आहे. आरटीईच्या कलम २३ मधील नियमांचे पुनर्विलोकन करून एनसीटीईच्या अधिसूचनेत सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवावा, अशी ठाम मागणी करण्यात आली.

टीईटीच्या अटीमुळे थांबविलेल्या सर्व पदोन्नती प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची शिक्षकांची मागणी होती. त्याचबरोबर १९८२ व १९८४ च्या नियमांनुसार जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करावी, संचमान्यता शासन निर्णय १५ मार्च २०२४ रद्द करावा, तसेच कमी पटसंख्येमुळे सुरू केलेल्या शाळा बंद/समायोजन धोरणाला पूर्णविराम द्यावा, अशी भूमिका शिक्षकांनी घेतली.

पूर्णवेळ नियमित शिक्षक भरती, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बंद भरती तात्काळ सुरू करणे, सर्व विषयांच्या पदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणीचा लाभ, बीएलओसह शिक्षकांवर पडणारी शैक्षणिकेतर कामांची सक्ती बंद करणे, ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेतील शिक्षकांसाठी मुख्यालयी निवासस्थाने बांधणे, नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांसाठी स्वतंत्र वेतन पथक, आश्रमशाळांमधील कंत्राटी शिक्षक भरती रद्द करणे अशा विविध प्रश्?नांवरही शिक्षकांनी तीव्र नाराजी दर्शवली.

खासगी अनुदानित शाळांच्या वेतनेतर अनुदानाची बंदी तातडीने उठवावी, अन्यथा शाळांचे व्यवस्थापनच कोलमडेल, असा इशारा शिक्षकांनी दिला. शिक्षक सेवेशी संबंधित समस्या तसेच शाळांमधील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रालय स्तरावर त्रैमासिक बैठक अनिवार्यपणे घेण्याची मागणीही जोरदारपणे करण्यात आली. वर्धा येथे जिल्हाधिकारी कार्यालयात मोठ्या संख्येने शिक्षक जमले. आंदोलनकर्त्यांनी आपले निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी जाधवर यांच्याकडे सुपूर्द केले. तर तालुक्यांमध्ये तहसीलदारांना निवेदने देण्यात आली.

आंदोलनात विजय कोंबे, लोमेश वऱ्हाडे, अजय भोयर, सतीश जगताप, प्रमोद खोडे, अजय वानखेडे, अरुण झोटिंग, गौतम पाटील, प्रमोद मुरार, रविंद्र राठोड, छत्रपती फाटे, अजय बोबडे, अतुल उडदे, पराग शेगोकर, सुधीर सगणे, प्रदीप गोमासे, हेमंत पारसडे, प्रशांत निंभोरकर, मिलिंद सालोडकर, मारोती सयाम यांसह मोठ्या संख्येने शिक्षक सहभागी झाले.

या आंदोलनामुळे जिल्ह्यातील अनेक शाळा दिवसभर बंद राहिल्या असून, शिक्षण विभागाच्या निर्णयाविरोधात शिक्षकांचा उद्रेक स्पष्टपणे जाणवत होता.

## शांताबाई खैरकर यांचे निधन

**वर्धा -** वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष किशोर खैरकर यांच्या मातोश्री शांताबाई खैरकर (वय ८८, रा. महादेवपुरा) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात दोन मुलं, तीन मुली, स्नुषा,नातू, नातवंडे, जावई असा मोठा आप्तपरिवार आहे. अंत्यसंस्कार आज दिनांक ६ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता वर्धा येथील स्मशानभूमीत करण्यात येईल.



## अर्चना जाधव यांचे निधन

**वर्धा :** समता नगर परिसरातील रहिवासी अर्चना हेमंत जाधव (वय ५४) यांचे शुक्रवार दिनांक ५ डिसेंबर रोजी सकाळी १०,३० निधन झाले, त्यांच्या पक्षात मोठा परिवार आहे, त्यांच्यावर स्थानिक स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले त्या तपोभूमी आंबोडा येथील उपासक हेमंत जाधव यांच्या पत्नी होत.



## गिरजाबाई देवगडे यांचे निधन

**वर्धा :** धुनिवाले चौक फुलझेले लेआउट येथील रहिवासी गिरजाबाई देवगडे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी शुक्रवारी पहाटे चार वाजता निधन झाले, त्यांच्या पश्चात चार मुलं, एक मुलगी,स्नुषा,जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे, त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले,



# देवळी निवडणुकीत भाजपची खोटी आरडाओरड कॅव्हेट नव्हे तडस यांच्या अपिल मुळेच संपूर्ण प्रक्रिया ठप्प : सुरेश वैद्यांचा स्फोटक आरोप

**देवळी जनमाध्यम :** देवळी नगरपालिकेच्या निवडणुकीला अचानक ब्रेक बसल्यानंतर भाजपने नेहमीचा आरोपांचा धुरळा उडवत काँग्रेसवर बोटे उचलली; पण या साऱ्या राजकीय आरडाओरडीचा फुगा फुटवत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुरेश वैद्य यांनी शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत भाजपची पोलखोल केली. निवडणूक कॅव्हेट'मुळे अडली, हा भाजपचा ओरडा कोऱ्या भांड्यासारखा आहे. प्रत्यक्षात निवडणूक तडस यांच्या अपिलामुळेच स्थगित झाली, असा घणाघात त्यांनी केला.



वैद्य म्हणाले, २ डिसेंबरला देवळीकर मतदानासाठी सज्ज होते. पण नगराध्यक्षपदाच्या आमच्या उमेदवाराविरोधात पंकज तडस यांनी दाखल केलेल्या आक्षेपाची सुनावणी नियोजित वेळेत पूर्ण न झाल्याने निवडणूक आयोगाला मतदान पुढे ढकलण्याचा निर्णय घ्यावा लागला. निवडणूक आयोगाचा नियम एकच आक्षेप प्रलंबित असेल तर मतदान पुढे ढकला! आणि तेच झाले. आता नव्या कार्यक्रमानुसार २० डिसेंबरला मतदान होणार आहे.

भाजपकडून काँग्रेस उमेदवाराच्या कॅव्हेटचा आधार घेत ही निवडणूक काँग्रेसने अडवली असे आरोप होत असताना, वैद्य यांनी त्याचा प्रतिवाद करताना म्हटले कॅव्हेट म्हणजे फक्त एक कायदेशीर सूचना, निर्णय देण्याआधी प्रतिवादीचे म्हणणे ऐकाष्ठ एवढंच निवडणूक थांबविण्याचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. भाजपचे माजी खासदारही या मूलभूत गोष्टी न समजल्यामुळे माझ्यावर निराधार, बालिश आणि हास्यास्पद आरोप करत आहेत.

सुरेश वैद्य यांनी तडस यांच्या कारवाईचा संपूर्ण तपशील समोर ठेवत सांगितले.


तडस यांनी आमच्या उमेदवाराविरुद्ध आक्षेप दाखल केला. तो निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी धुडकावला. त्यानंतर त्यांनी जिल्हा सत्र न्यायालयात अपिल दाखल केले. तेथेसुद्धा अपिल फेटाळले गेले. पण न्यायालयाचा आदेश २२ नोव्हेंबरनंतर आला. त्यामुळेच निवडणूक आयोगाने स्थगितीची कार्यवाही केली.

पत्रपरिषदेत वैद्य यांनी भाजपवर आणखी टीका करताना म्हटले,

देवळीकरांची दिशाभूल करण्याचा भाजपचा उद्योग सुरु आहे. निवडणुकीत जनतेचा रोष टाळण्यासाठी खोट्या बातम्या पसरविल्या जात आहेत. पण देवळीकर जागे आहेत. सत्य उघड होताच भाजपची हवा निघून गेली आहे.

पत्रपरिषदेला माजी नगराध्यक्ष जब्बार भाई तवर, अजय देशमुख, कृष्णकांत शेंडे, स्वप्निल कांमडी, स्वप्निल भगत, दिनेश पाटील आदींची उपस्थिती होती.

देवळीतील निवडणूक स्थगितीच्या प्रकरणामुळे राजकीय वातावरण तापले असून, पुढील दिवसांत आणखी आआहे-प्रत्यारोपांचे वादळ उठण्याची शक्यता आहे.

# कुंभमेळ्यासाठी 1800 झाडांच्या तोडीवर संसदेत गदारोळ

## नाशिकमध्ये पर्यायी जागा असताना तपोवनची निवड का? खा.राजाभाऊ वाजेंचा केंद्राला सवाल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** यंदाच्या कुंभमेळ्यासाठी नाशिकच्या तपोवन परिसरातील अंदाजे १८०० झाडांच्या कत्तलीच्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या संतापाची दखल आता थेट देशाच्या संसदेत घेतली जात आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नाशिकचे खासदार राजाभाउ वाजे यांनी आज लोकसभेत शून्य प्रहरात तपोवन झाडतोडीचा मुद्दा जोरदारपणे मांडला. याआधी त्यांनी मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांना पत्र लिहून झाडतोड तात्काळ थांबवण्याची मागणी केली होती. तसेच, ३ डिसेंबर रोजी त्यांनी तपोवन परिसराला भेट देउन प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला होता. त्यामुळे, कुंभमेळ्यासाठीच्या वृक्षतोडीला विरोध वाढत असल्याचे दिसून येत आहे. लोकसभेत बोलताना खासदार वाजे म्हणाले की तपोवन परिसर केवळ हिरवाईचा पट्टा नसून प्रभू श्रीरामांच्या वास्तव्याने पावन झालेला धार्मिक वारसा, जैवविविधतेचे केन्द्र आणि नाशिकचे फुफ्फुस आहे. हिंदू धर्म निसर्गपूजनाची शिकवण देतो. अशा पवित्र भूमीत हजारो झाडे तोडणे म्हणजे श्रद्धा, पर्यावरण आणि सांस्कृतिक वारसा तिन्हीवर कु-हाड, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. तपोवनात अनेक पक्षी, प्राणी, व





**वृक्षतोडीवरुन दोन्ही शिवसेनेचं एकमत; शिंदेंची सेना तपोवनात, ठाकरेंच्या खासदाराचा आवाज दिल्लीच्या संसद भवनात**

दुर्मिळ जैववैविध्य आढळत असून या परिसंस्थेचा विनाश नाशिककरांच्या भावनांना वेदना देणारा असल्याचे ते म्हणाले. खासदार वाजे यांच्या पुढाकाराने तपोवन प्रश्न राज्याबाहेर जाउन देशाच्या सभागृहातही प्रतिध्वनीत झाला आहे. नाशिककरांचा संताप आणि आंदोलनाची ऊर्मी केंद्र सरकारने लक्षात घेतली पाहिजे, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. संसदेतल्या प्रभावी भाषणाने स्पष्ट संकेत मिळाले की तपोवन बचावासाठीचा लढा आता निर्णायक टप्प्यात आहे. नाशिककरांचा वैताग, जनभावना, धार्मिक महत्त्व आणि पर्यावरणीय धोका या सर्वांचा संगम असलेला हा मुद्दा आता सरकारकडून निर्णायक प्रतिसादाची वाट पाहत आहे.

**पर्यायी जागा असताना तपोवनच का?**

संसदेत मांडलेल्या भाषणात खासदार वाजे यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. नाशिकमध्ये साधुग्रामासाठी अनेक पर्यायी जागा उपलब्ध असताना तपोवनच निवडण्यात का आले? पर्यावरण परिणाम अहवाल, तज्ज्ञांचे मत, सार्वजनिक चर्चा या सर्वांना पूर्णपणे बायपास करून निर्णय रेटण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले. तपोवनचा नाश करून हरित कुंभ कसा होणार? असा प्रश्न त्यांनी उभा केला.३ डिसेंबर रोजी तपोवन भेटीदरम्यान खासदार वाजे यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. नागरिक, तपोवन बचाव समिती व पर्यावरणतज्ज्ञांकडून माहिती घेतल्यानंतर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यावेळी बोलताना ते म्हणाले की, तपोवन या नावातच सर्व काही आहे. वन नाहीसे झाले तर तपोवन फक्त सिमेंटचे जंगल उरेल. नाशिकचे फुफ्फुस कायमचे हरवेल. एक्झिबिशन सेंटरसाठीही त्याच परिसरात निविदा निघाल्याने नाशिककरांचा संशय अधिकच वाढल्याचे त्यांनी सांगितले. तपोवन भेटीप्रसंगी झाडतोडीच्या मुद्द्यासोबतच वाजे यांनी गोदावरी प्रदूषणाचाही विषय उपस्थित केला. झाड तोडण्यासाठी प्रशासन एवढे सज्ज असते पण गोदावरी प्रदूषण थांबवण्यासाठी जी गती हवी ती कुठे आहे? असा त्यांनी सवाल केला. कुंभमेळ्यापूर्वी एसटीपी प्रकल्प पूर्ण होईल की नाही याची शंका त्यांनी व्यक्त केली.

# पुतिन यांच्या स्नेहभोजनला राहुल गांधी, खरगेंना निमंत्रण नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची भेट घेण्यापासून विरोधी पक्षाच्या नेत्यांना परावृत्त केले जात आहे, असा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरूवारी केला होता. आज (शुक्रवार, ५ डिसेंबर) व्लादिमीर पुतिन यांच्यासाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले असून अनेक मान्यवरांना निमंत्रित केले जाणार आहे. या स्नेहभोजनासाठी राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांना निमंत्रित करण्यात आलेले नाही, अशी बातमी इंडिया टुडेने सूत्रांच्या हवाल्याने दिली आहे. मात्र काँग्रेसच्या दुस-या एका नेत्याला बोलविण्यात आल्याची शक्यता वर्तवली आहे. राष्ट्रपतींच्या निवासस्थानी पुतिन यांच्यासाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या सोहळ्याला अनेकांना निमंत्रित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना निमंत्रित केले नसले तरी खासदार शशी थरूर यांना मात्र बोलविण्यात आल्याची माहिती इंडिया टुडेने आपल्या वृत्तात दिली आहे.





**शशी थरूर यांची सरकारशी गट्टी, स्वपक्षाशी मात्र दुरावा-** काँग्रेसचे खासदार शशी थरूर हे मागच्या सहा महिन्यांपासून स्वपक्षापासून दुरावले आहेत. केंद्राने ऑपरेशन सिंदूर राबविल्यानंतर त्याची महती विदेशात जाउन सांगण्याच्या शिष्टमंडळात शशी थरूर यांच्या समावेशाला काँग्रेसने विरोध केला होता. मात्र तरीही थरूर या शिष्टमंडळाचे प्रमुख झाले. त्यानंतर त्यांची आणि सरकारची जवळीक वाढत गेल्याची अनेक उदाहरणे वेळोवेळी दिसली. दरम्यान थरूर यांनी निमंत्रण मिळाल्यास स्नेहभोजनाला अवश्य उपस्थित राहणार, असे माध्यमांशी बोलताना सांगितले. तसेच या सोहळ्यासाठी विरोधी पक्षनेते आणि पक्षाचे अध्यक्ष यांना का निमंत्रित करण्यात आले नाही? याची आपल्याला कल्पना नाही, असेही ते म्हणाले.तत्पूर्वी राहुल गांधी यांनी गुरूवारी संसदेच्या आवारात माध्यमांशी बोलत असताना केंद्र सरकारवर आरोप केला होता. ते म्हणाले, सामान्यतः या सरकारचे धोरण आहे, साधारणपणे परंपरेनुसार परदेशातून जे कोणी येतात त्यांची विरोधी पक्षनेत्याची बैठक होते. वाजपेयी यांच्या काळात होत होते, मनमोहन सिंह यांच्या काळात होत होते. ही एक परंपरा राहिली आहे. पण आजकाल असे होते की, परदेशी पाहुणे येतात, किंवा मी जेव्हा कुठे बाहेर जातो, तेव्हा सरकार त्यांना सुचवते की विरोधी पक्षनेत्याला भेटू नये. राहुल गांधी यांनी केलेले आरोप आज परराष्ट्र मंत्रालयाने फेटाळून लावले होते. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, ९ जून २०२४ रोजी राहुल गांधी लोकसभेत विरोधी पक्षनेते झाल्यापासून आतापर्यंत ते बांगलादेशच्या तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांच्यासह किमान चार राष्ट्रप्रमुखांना आतापर्यंत भेटले आहेत. सूत्रांनी असेही स्पष्ट केले की, सरकारबाहेरील कुणालाही भेटायचे की नाही, याचा निर्णय परराष्ट्र मंत्रालय नाही तर सदर शिष्टमंडळ घेत असते.

# राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी महात्मा गांधींना अर्पण केली श्रद्धांजली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी शुक्रवारी सकाळी राजघाटावर पोहोचून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना श्रद्धांजली अर्पण केली. पुष्पांजली अर्पण केल्यानंतर त्यांनी व्हिजिटर बुकमध्ये रशियन भाषेत एक संदेश लिहिला, ज्याने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले. पुतिन यांच्या या संदेशाचा अधिकृत हिंदी अनुवाद जारी करण्यात आला असून त्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी प्रतिक्रिया उमटली आहे. आपल्या भारत दौ-यादरम्यान पुतिन यांनी महात्मा गांधींना भारताचे महान तत्त्वज्ञ आणि मानवतावादी म्हणून वर्णन केले. त्यांनी लिहिले की गांधींनी या ग्रहावर शांततेसाठी अमूल्य योगदान दिले. आणि



स्वातंत्र्य, परोपकार व सद्गुणांविषयीचे त्यांचे विचार आजही त्यांच्या काळाइतकेच महत्त्वाचे आहेत.आपल्या संदेशात पुतिन यांनी हेही नमूद केले की महात्मा गांधी यांनी नवीन, अधिक न्याय्य आणि बहुध्रुवीय जगाची कल्पना मांडली होतीअसे जग जे वर्चस्वापासून मुक्तअसेल आणि ज्यात राष्ट्रे समानता, परस्पर आदर आणि सहकार्याच्या तत्त्वांवर पुढे जातील. पुतिन म्हणाले की आजच्या जागतिक परिस्थितीत ही दृष्टी प्रत्यक्षात आकार घेताना दिसत आहे. रशियन राष्ट्राध्यक्षांनी लेव निकोलेविच पाश्कोव यांना गांधींनी लिहिलेल्या पत्रांचा उल्लेख करत सांगितले की गांधींनी भविष्याच्या जगाबाबत अत्यंत सखोल विचार मांडले होते आणि त्याचे प्रतिबिंब आज भारत-रशिया यांच्या संयुक्त प्रयत्नांत दिसते. पुतिन यांच्या मते, दोन्ही देश आंतरराष्ट्रीय मंचावर मिळून त्याच मूल्यांची आणि तत्त्वांची जपणूक करत आहेत, ज्यांची कल्पना स्वतः गांधी यांनी केली होती. राजघाटावरील पुतिन यांचा हा चिंतनशील संदेश भारत-रशिया संबंधांना नवी मजबुती देताना दिसतो आणि महात्मा गांधींची जागतिक प्रासंगिकता पुन्हा एकदा अधोरेखित करतो.

# रशियन नागरिकांना मिळणार 30 दिवसांचा मोफत व्हिसा - पंतप्रधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी बैठकीनंतर हैदराबादमध्ये संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या प्रसंगी पंतप्रधान मोदी यांनी घोषणा केली की रशियन नागरिकांसाठी ३० दिवसांचे मोफत ई-टुरिस्ट व्हिसा आणि ३० दिवसांचे ग्रुप टुरिस्ट व्हिसा सुरू केले जातील. दोन्ही नेत्यांनी २०३० पर्यंत आर्थिक सहकार्य वाढवणे आणि व्यापार-गुंतवणूक मजबूत करणे यावर सहमती दर्शवली.पंतप्रधान मोदी म्हणाले की भारत आणि रशिया यांच्यात नेहमीच आपुलकी आणि आत्म-सन्मानाचे नाते राहिले आहे. अलीकडेच रशियात भारताचे दोन नवीन वाणिज्य दूतावास सुरू झाले आहेत. यामुळे दोन्ही देशांच्या नागरिकांमधील संपर्क अधिक सोयीस्कर होईल आणि परस्परांची जवळीकही वाढेल. लवकरच आम्ही रशियन नागरिकांसाठी ३० दिवसांचे निःशुल्क ई-टुरिस्ट व्हिसा आणि ३० दिवसांचे ग्रुप टुरिस्ट व्हिसा सुरू करणार आहोत. आम्ही एकत्रितपणे व्यावसायिक शिक्षण, स्किलिंग आणि प्रशिक्षणावरही काम करू. दोन्ही देशांतील शास्त्रज्ञ आणि खेळाडू यांचा आदान-प्रदान वाढेल. मोदी म्हणाले, भारत-रशियाची मैत्री ध्रुव तारा-यासारखी स्थिर राहिली आहे. आम्ही काळाच्या कसोटीवर नेहमी खरे उतरलो आहोत. आज



आम्ही या भक्कम पायावर सहकार्याच्या सर्व पैलूंवर चर्चा केली. २०३० पर्यंतच्या आर्थिक सहकार्य कार्यक्रमावर आम्ही सहमती दर्शवली आहे. यामुळे व्यापार आणि गुंतवणूक संतुलित व टिकाउ स्वरूपात वाढेल आणि सहकार्याची नवी क्षितिजे उघडतील. भारत-रशिया ट्रेडिंग फोरममध्ये सहभागी होण्याची संधीही मिळेल, ज्यामुळे आमचे व्यावसायिक संबंध अधिक मजबूत होतील. निर्यात, सह-निर्मिती आणि सह-नवोन्मेष यासाठीही नवीन दारे उघडतील. ते पुढे म्हणाले, आपले सहकार्य अन्नसुरक्षा आणि शेतकरी कल्याणासाठीही महत्त्वाचे आहे. दोन्ही देश एकत्रितपणे युरिया उत्पादनावर काम करत आहेत. भारत-रशिया यांच्यातील कनेक्टिव्हिटी वाढवणे हे आमचे प्रमुख प्राधान्य आहे. उर्जा सुरक्षा ही भारत-रशिया भागीदारीची एक मजबूत आणि महत्त्वाची कडी राहिली आहे, आणि आम्ही या विन-विन सहकार्याला पुढेही चालू ठेवू. महत्त्वाच्या खनिजांवरील सहकार्यही तितकेच आवश्यक असून स्वच्छ उर्जा आणि उच्च-तंत्रज्ञान उत्पादन क्षेत्रात आपली भागीदारी आणखी बळकट होईल.मोदी म्हणाले की युक्रेन विषयक मुद्द्यावर भारताने नेहमी शांततेचेच समर्थन केले आहे. या समस्येच्या कायमस्वरूपी समाधानासाठी केलेल्या सर्व प्रयत्नांचे आम्ही स्वागत करतो. भारत आपले योगदान देण्यासाठी नेहमी तयार आहे. दहशतवादाविरोधातील लढाईत भारत आणि रशिया नेहमी खांद्याला खांदा लावून उभे राहिले आहेत. भारताचा ठाम विश्वास आहे की दहशतवाद हा मानवतेच्या मूल्यांवर थेट प्रहार आहे आणि त्याविरुद्ध जागतिक एकता हेच आपले सर्वात मोठे बळ आहे.

# महायुती सरकारची वर्षपूर्ती, जनतेच्या पदरी निराशाच, कामाची श्वेतपत्रिका काढावी-वडेट्टीवार

**मुंबई/प्रतिनिधी :**महायुती सरकारला सत्तेत येउन एक वर्ष आज पूर्ण झाले. या एक वर्षात सरकार आपली पाठ थोपटून घेत आहेत, पंचतारांकित हॉटेल मध्ये बसून सरकार आपली उपलब्धी सांगत असले तरी जनतेच्या पदरी मात्र



निराशाच आली आहे, त्यामुळे या सरकारने अधिवेशनात आपल्या कामाची श्वेतपत्रिका काढावी अशी टीका काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.महायुती सरकार आल्यानंतर शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत, शेतक-यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही. बियाणे खत मिळत नाही. मराठवाड्यात पूर आला यातून शेतकरी उध्वस्त झाला आहे. कुपोषित बालकांची संख्या वाढली.राज्यातील रस्त्यांची चाळण झाली आहे.महिलांवर अत्याचार वाढले आहे. बिल्डर आणि मंत्री संगनमताने राज्यातील कोट्यवधीच्या जमिनी बळकावल्या जात आहे. लाडक्या उद्योगपतींना लाभ मिळतो पण सामान्य जनतेला मात्र संघर्ष करावा लागत आहे म्हणून या सरकारने एक वर्षात केलेल्या कामाची श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.चंद्रपूर येथील बरांज कोळसा खाणीत पूर्णतःहा नियमांचे उल्लंघन करून अवैध कोळशाचे उत्खनन करण्यात येत आहे. हा लाखोंचा कोळसा खुल्या बाजारात विकला जात आहे. पर्यावरण विभागाने या खाणीला २०२३ ला मंजुरी देताना ज्या अटी व शर्ती घातल्या होत्या,त्यांचा भंग केला जात आहे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन अजूनही करण्यात आलेले नाही. पर्यावरण मंत्र्यांपासून वन अधिकारी यात सहभागी आहेत. याविरोधात विधानसभेत याविरोधात आम्ही प्रश्न उपस्थित करणार असे विधिमंडळ नेते वडेट्टीवार म्हणाले.महायुती सरकार सत्तेत आले पण विधान सभा असो की विधान परिषद या सभागृहात विरोधी पक्षनेत्याची नियुक्ती करण्यात आलेली नाही. हे सरकार लोकशाही आणि संविधानाला मानत नाही.लोकशाहीत विरोधी पक्ष महत्वाचा असतो पण सरकारला विरोधक नको, विरोध नको म्हणून ही पद रिक्त ठेवण्यात आल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. नागपूर इथे हिवाळी अधिवेशनपेक्षा अर्थसंकल्पीय अधिवेशन घेतले पाहिजे अशीही मागणी यावेळी वडेट्टीवार यांनी केली.

# अनाथ मुलांना आरक्षण देण्याचा निर्णय मनाला गहिवर आणणारा

**मुंबई/प्रतिनिधी :** अनाथ मुलांना आरक्षण देण्याचा निर्णय हा माझ्या जीवनातील सर्वात समाधान देणारा निर्णय आहे. संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या संधीची समानता या तत्त्वाच्या प्रेरणेने राज्य शासनाने १ टक्का अनाथ आरक्षणाचा निर्णय घेतला आहे, या निर्णयामुळे ८६२ अनाथ युवक-युवती स्वावलंबी होउन समाजासाठी कार्यरत असल्याचा अभिमान वाटतो, या वर्षपूर्तीची सुरुवात सुंदर कार्यक्रमाने झाली असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाचा लाभ घेउन शासकीय सेवेत रुजू झालेल्या अनाथ मुलांशी संवाद साधला. कार्यक्रमास विधानपरिषद आमदार श्रीकांत भारतीय व लाभार्थी अनाथ युवक युवती उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आज मलाही मुख्यमंत्री पदाची शपथ घेउन वर्ष झाला. या वर्षपूर्तीची सुरुवातप्रसंगी सुंदर कार्यक्रमाने झाली. निःशब्द भाव खूप बोलणारा असतो, तसा भाव आज माझ्या मनात आहे. शासनात अनेक निर्णय घेतले जातात, अनेक कामे केली जातात, पण काही निर्णय मनाला गहिवर देतात. तसाच अनाथ मुलांना आरक्षण देण्याचा निर्णय आहे.संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संधीची समानता हे तत्व आपल्या संविधानात समाविष्ट केले. पण ही समानता केवळ सामाजिक आरक्षणातून मर्यादित राहता कामा नये. अनाथ, दिव्यांग आणि इतर वंचित घटकांनाही संधी मिळायला हवी. त्या विचारातूनच १ टक्के अनाथ आरक्षणाचा निर्णय झाला. या निर्णयामुळे अनेकांच्या आयुष्यात खरा बदल घडला आहे, असेही मुख्यमंत्री



- संघर्षातून पुढे आलेल्या युवकांनी समाजाचे 'रोल मॉडेल' व्हावे
- 862 अनाथ युवक-युवती स्वावलंबी-मुख्यमंत्री
- फडणवीसांनी अनाथ युवक युवतींशी वर्षा निवासस्थानी साधला संवाद

श्री. फडणवीस यांनी सांगितले.

**संघर्षातून पुढे आलेल्या युवकांनी समाजाचे 'रोल माडेल' व्हावे-**आपण जे काही साध्य करतो, ते समाजाने निर्माण केलेल्या व्यवस्थेमुळे शक्य होते. शाळा, संस्था, शासनव्यवस्था, उद्योग हे सर्व समाजाच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. त्यामुळे या समाजाला परत काहीतरी देणे, हा प्रत्येकाचा धर्म आहे. संघर्षातून पुढे आलेले हे युवक समाजात रोल माडेल बनावेत, अशी अपेक्षाही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी व्यक्त केली. जिथे पोहोचलात तिथे थांबू नका. संघर्षातून मिळवलेले यश हे पुढे समाजासाठी अविरत कार्य करण्याची प्रेरणा ठरावी. स्थैर्य मिळाल्यानंतरही समाजासाठी काहीतरी देण्याची भावना मनात कायम ठेवावी,असेही त्यांनी यावेळी सांगितले.माणसाचे कार्यच त्याला अमरत्व देतं. कार्यातूनच माणूस जिवंत राहतो. म्हणून तुमचं कार्यच तुमची ओळख बनवा, असे सांगून कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व अनाथ युवकांचा गौरव केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमात विनायक विश्वकर्मा या युवकाने मुख्यमंत्री यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करत एक भावस्पर्शी कविता सादर केली.आज घ्यायला नाही सर, काही द्यायला आलोय,तुम्ही आरक्षण दिलं, दारिद्र्यातून बाहेर आलोयतुम्ही मुख्यमंत्री महाराष्ट्राचे, पण आम्ही तुम्हाला देवा भाउच म्हणणार या ओळींनी भावनिक वातावरण निर्माण झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्या युवकाचे कौतुक करतांना सांगितले की, या कवितेतून उमटणारी कृतज्ञता हीच या निर्णयाची खरी पावती आहे. समाजासाठी देण्याची भावना जर प्रत्येकामध्ये निर्माण झाली, तर तेच खरे परिवर्तन आहे.या संवादात उपस्थित युवकांनीही आपल्या अनुभवांची मांडणी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शासनाचे आभार व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, या आरक्षणामुळे त्यांना शिक्षण, रोजगार आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे. आज आम्ही इतर अनाथ मुलांसाठी प्रेरणा आहोत.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस निरीक्षक अभय तेली व आभार प्रदर्शन जाणीव वृद्ध आश्रमाचे संचालक मनोज पांचाळ यांनी केले.

# उर्जा क्षेत्रात 'एआय' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पर्यावरणपूरक शाश्वत विकासाची सुरूवात-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यात सौर उर्जेसह नवीनीकृत उर्जा स्त्रोतांच्या 'डिजिटल ट्वीन' पद्धतीच्या माध्यमातून वीज वितरण व्यवस्था मजबूत करण्यात येणार आहे. महावितरणमध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहभागातून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय )आधारित डिजिटायझेशन उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे 'एआय' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील उर्जा क्षेत्रात पर्यावरणपूरक शाश्वत आर्थिक विकासाची सुरूवात होत असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) 'द राकफेलर फाउंडेशन-आरएफ', 'ग्लोबल एनर्जी अलायन्स फार पीपल अँड प्लॅनेट-जीईएपीपी' आणि उर्जा विभाग यांच्या सहकार्यातून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय) आधारित डिजिटायझेशन उपक्रम राबविणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमेरिकेतील राकफेलर फाउंडेशनचे



अध्यक्ष डॉ. राजीव शाह यांची यावर्षी जानेवारीमध्ये यासंदर्भात चर्चा झाली. यामध्ये वीज वितरण प्रणालीमध्ये डिजिटल ट्वीन वापर करण्याची अतिशय नाविन्यपूर्ण संकल्पना पुढे आली. उर्जा विभागही मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे असून त्यांनी महाराष्ट्रातील उर्जा क्षेत्राच्या दृष्टीने हा क्रांतिकारी निर्णय घेतला.

'आरएफ आणि जीईएपीपीसारख्या संस्थांच्या सहकार्यातून अत्याधुनिक एआय आधारित जागतिक दर्जाचा प्लॅटफार्म हा देशातील इतर वीज कंपन्यांसाठी आदर्श ठरेल, वीज वितरण क्षेत्रातील कंपन्यासाठी हा एक आदर्श मानदंड असेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे. राकफेलरचे अध्यक्ष डा. शाह यांच्या प्रतिसादाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे. ग्राहक सेवा उन्नत करण्याकरिता आणि कालांतराने महावितरणला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता एआय-आधारित निर्णय-सहाय्यक साधने अत्यंत उपयुक्त आहेत. महावितरण कंपनीसाठी विकसित होणा-या उपाययोजना वीज वितरण क्षेत्रातील दीर्घकालीन, शाश्वत

- महावितरणमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय )आधारित डिजिटायझेशन
- अमेरिकेच्या 'द रॉकफेलर फाउंडेशन', 'ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट' व उर्जा विभाग यांच्या सहकार्यातून उपक्रम

आणि परिणामकारक सहाय्यभूत असतील, असा दृढ विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. वीज वितरणमध्ये 'डिजिटल ट्वीन' पद्धती विकसित करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. नाविन्यपूर्ण एआय -आधारित उपक्रमातून शाश्वत पर्यावरणपूरक उर्जेचा वापर वाढण्यासाठी ग्रामीण भागात मोठे बदल होतील.

**डिजिटायझेशन उपक्रम :** **महाराष्ट्रातील वाटचाल-**महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील शेतकरी आणि वीज ग्राहक यांना या नवीन डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक विश्वसनीय व विजेची सहज उपलब्धता मिळणार आहे. जागतिक स्तरावरील ए आय तंत्रज्ञान व उर्जा क्षेत्रातील थेट भागीदारीच्या मदतीने, महाराष्ट्रात प्रगत डिजिटल प्रणाली लागू होइल. ज्यामुळे वीज प्रवाहाची अचूकता, क्षेत्रीय कामकाज, आणि उर्जा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होणार आहे.

या उपक्रमामध्ये, वीज नेटवर्कचे डिजिटल मॉडेल तयार केले जात आहे जेणेकरून वीज प्रवाहाचे विश्लेषण, ग्रीडची ऑप्टिमायझेशन, वीज आउटेज नियोजन, नवीनीकृत उर्जा स्त्रोतांचे (आरई) अधिक चांगले समायोजन होईल. विद्युत वाहिन्यांच्या देखभालीसाठी अधिक जागरूक नियोजन तसेच शेतक-यांसाठी सौर ऊर्जा वापर यासाठी ही कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली काम करेल. ही डिजिटल प्रणाली महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (एमएसईडीसीएल) मध्ये लागू केली जात आहे, ज्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या तांत्रिक किचकट अडचणी दूर होण्याची ही सुरवात आहे.

**हरित उर्जा प्रणालीकडे स्वयंपूर्ण कार्यक्षम वाटचाल संधी-** उर्जा क्षेत्रावर हे बदल मोठे परिणाम करणार आहे, असे उर्जा विभागाने म्हटले आहे. या डिजिटल रूपांतरणामुळे प्रकल्प व्यवस्थापनात जलद निर्णय घेता येतात. यामुळे ग्रीडच्या कार्यक्षमतेत वाढ झाली असून, सौर उर्जा अधिक प्रमाणात उपयोगात आली आहे. या हरित उर्जा वापराने प्रदूषणात मोठी घट होणार आहे. या नव्या प्रणालीमुळे विद्युत वितरणामध्ये कमीत कमी एक टक्का जरी वीज गळती घटली तरी वर्षाला सुमारे १०००-१५०० कोटी रुपयांची बचत होउन नुकसानीत मोठी घट होणार आहे.

**राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व**

उपक्रमात जागतिक सहभागामुळे याप्रकारच्या डिजिटल उपाययोजना, विशेषत? भारतासारख्या वेगाने विकसित होणा-या देशांत, वीजविषयक स्थिरता, अखंड उपलब्धता व ग्रामीण भागांत विद्युत सेवांची गुणवत्ता सुधारण्यात महत्त्वाचा बदल ठरू शकतो. भारतात वीज वितरण व्यवस्थेत एआय डिजिटल प्रणाली वापराचा महत्त्वपूर्ण प्रयत्न होत असून, आधुनिक भारताला शाश्वत स्वयंपूर्ण, पर्यावरणपूरक कार्यक्षम उर्जा प्रणालीची गरज आहे. या उपक्रमामुळे यात योगदान देण्याची संधी महाराष्ट्राला प्राप्त झाली आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## पुतिन भेट

पुतिन यांच्या भारत भेटीची आज जागतिक पातळीवर चर्चा होत असली तरी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत २३व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी भारतात आले आहेत. रशिया-युक्रेन युद्धानंतर राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचा हा पहिला दौरा आहे. राष्ट्राध्यक्ष पुतिन भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांसाठी भारताच्या राष्ट्रपती मेजवानीचे आयोजन करतील. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यापूर्वी २०२१ मध्ये भारत दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी २१व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेला उपस्थिती लावली होती.कोणत्याही बलाढ्य राष्ट्राचे प्रमुख आपल्या देशामध्ये भेटीस आल्यावर त्यांच्या कार्याची, खासगी आयुष्याची, मालमत्तेची, राहणीमानाची प्रसिध्दी माध्यमांमध्ये चर्चा होणे स्वाभाविकच असते. कोणीही राष्ट्राध्यक्ष अथवा त्या त्या देशांचे पंतप्रधान भारत भेटीवर आल्यास आपल्या देशासोबत त्यांचे विविध क्षेत्रांतील गुंतवणुकीचे करार होतात, उद्योगधंद्याची, शस्त्रांची देवाणघेवाण, खरेदीविक्री होते. पण, अन्य देशाचे राष्ट्राध्यक्ष व पंतप्रधान येणे व रशियाचे राष्ट्रपती आपल्या देशात येणे यात फरक आहे.स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताचे आणि रशियाचे मित्रत्वाचे संबंध आहेत. सुबत्तेच्या तसेच पडझडीच्या काळातही दोन्ही देशांच्या मैत्रीमध्ये खंड पडलेला नाही. शेजारील राष्ट्र पाकिस्तान सातत्याने आपल्याला त्रास देत असताना, आपल्या कुरापती काढत असताना, आपल्या देशात दहशतवादी कारवायांना खतपाणी घालत असताना अमेरिकेने सातत्याने पाकिस्तानची पाठराखण केली आहे. त्यावेळी रशियाने आपल्यामागे उभे राहत खऱ्या मित्राची भूमिका जागतिक पातळीवर निभावली आहे. भारत-रशिया मैत्रीमुळेच अमेरिकेचा पूर्वीपासूनच तिळपापड झाला आहे. त्यातूनच अमेरिकेने आपल्यावर वाढीव आयात शुल्काचा(टॅरिफ) भुर्दंड लादलेला आहे. खनिज तेलाची खरेदी हे तर केवळ निमित्त आहे. भारतातील कंपन्या रशियाकडून तेलखरेदी करत असल्याच्या प्रकाराला अमेरिकेचा आक्षेप आहे. त्याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प वेळोवेळी आकांडतांडवही करत भारतविरोधी संताप व्यक्त करत आहेत. आपल्या देशात आलेल्या परदेशातील पंतप्रधान, राजे, राष्ट्रपती, राष्ट्राध्यक्ष यांच्या सुरक्षेची जबाबदारी आपली असते. पण जागतिक पातळीवर वाढत चाललेली स्पर्धा, त्यातून निर्माण झालेली राजकीय वैर, भूभाग संपादनांची महत्त्वाकांक्षा, हद्दविस्तार करण्याची कार्यप्रणाली यातून राष्ट्रपती, पंतप्रधान यांच्या जीवाला धोका वाढलेला असतो. त्यामुळे अमेरिका, रशियासारख्या राष्ट्रांचे प्रमुख स्वत:सोबत आपली सुरक्षाही घेऊन फिरत असतात. त्यांचा आपल्या सुरक्षा व्यवस्थेवर विश्वास असतो. या दौऱ्यादरम्यान पुतिन त्यांच्या अधिकृत कारमधून प्रवास करत आहेत. रशियाची राष्ट्राध्यक्षांसाठी असलेली अधिकृत सरकारी कार 'ऑरस सेनेट लिमोझिन' आहे. ही कार शस्त्रभेदी गोळ्या आणि ग्रेनेड हल्ल्यांना तोंड देऊ शकते. यात पंक्चर झाल्यावरही चालणारे टायर, आपत्कालीन दरवाजे आणि रशियाच्या फेडरल प्रोटेक्टिव्ह सर्व्हिसच्या मानकांनुसार बनवलेली सुरक्षा आहे. पुतिन यांच्या दौऱ्यावर अमेरिकेसह, युरोप, चीन आणि पाकिस्तान या देशांचे लक्ष आहे. कारण रशिया आणि भारतामध्ये जे करार होतील, त्याचे दूरगामी परिणाम या देशांवर होऊ शकतात. म्हणून पुतिन यांचा भारत दौरा महत्त्वाचा आहे. दोन्ही देशांमध्ये क्रूड ऑइल करार, संरक्षण आणि मुक्त व्यापार करारावर (एफटीए) यासह विविध विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. पुतिन यांच्या या दौऱ्यात सर्वाधिक लक्ष संरक्षण करारावर असेल. दोन्ही देशांच्या नौदलांसाठी एकत्रितपणे युद्धनौका योजनांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.पाकिस्तानच्या अलीकडच्या काळात वाढत चाललेल्या कुरापती पाहता, पुतिन यांच्या दौऱ्यातील संरक्षण चर्चा हा सर्वाधिक लक्ष लागलेला भाग असेल, अशी अपेक्षा आहे. भारत अतिरिक्त एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीसह अनेक प्रलंबित खरेदी प्रक्रिया पुढे नेण्यास उत्सुक आहे. नागरी अणुऊर्जा हा आणखी एक विषय आहे, ज्यावर चर्चेची शक्यता आहे. पुतिन यांच्या या भेटीत दोन्ही देश एक नवीन पेमेंट प्रणाली तयार करण्यावर सहमत होऊ शकतात, ज्यामुळे व्यापार अखंडितपणे सुरू राहील. ऐतिहासिकदृष्ट्या, भारत हा रशियाच्या शस्त्रास्त्रांचा सर्वात मोठा खरेदीदार आहे आणि सुखोई-३० विमाने भारतीय हवाई दलाचा भाग आहे. या शिखर परिषदेत संरक्षण मंत्र्यांच्या महत्त्वपूर्ण हार्डवेअर खरेदीबाबतच्या चर्चांचा समावेश आहे. रशियाकडून ५ लाख ८५ हजार कोटी आयात, तर भारताची केवळ ४५ हजार कोटींची निर्यात आहे, या व्यापार असंतुलनामुळे औषधे आणि कृषी उत्पादनांच्या निर्यातीला चालना देण्याची गरज अधिक आहे. रशियाकडून तेल खरेदीमुळे भारतीय वस्तूंवर अमेरिकेने २५-५०३ पर्यंत शुल्क लादले आहे. यामुळे भारत-अमेरिकेदरम्यान भू-राजकीय तणाव वाढला आहे. त्यामुळे नवीन करारांवर सावधगिरी बाळगण्याची शक्यता आहे. नागरी अणुऊर्जा आणि युरेशियन मुक्त व्यापार चर्चा यांसारख्या इतर मुद्द्यांवरही लक्ष केंद्रित केले जाईल. क्षेपणास्त्र घटक आणि लढाऊ विमानांच्या अपग्रेडेशनच्या संयुक्त उत्पादनावर लक्ष केंद्रित केले जाईल, ज्यामुळे भारताच्या आत्मनिर्भरतेच्या मोहिमेला बळ मिळेल. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड विमानांचे उत्पादन करते, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड इलेक्ट्रॉनिक्समध्ये आणि भारत डायनॅमिक्स लिमिटेड क्षेपणास्त्र निर्मितीमध्ये आघाडीवर आहे. या क्षेत्रात प्रगती झाल्यास बहुवर्षीय करारांची शक्यता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे गुंतवणूकदारांचे लक्ष निकालापूर्वीच या कंपन्यांकडे लागून आहे. भारत-रशिया मित्र राष्ट्र असली तरी एकमेकांना त्यांनी आजवर व्यापाराच्या माध्यमातून मदत केली आहे. या दौऱ्यात संरक्षण सहकार्यासोबतच व्यापार आणि ऊर्जा सुरक्षा यावर भर दिला जाईल. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसंदर्भातील घोषणांमुळे संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांच्या शेअर्समध्ये तेजी दिसू शकते, अशी बाजार तज्ज्ञांना अपेक्षा आहे. या भेटीमुळे उभय राष्ट्रांमधील संबंध वृद्धिंगत होतील, व्यापार वाढेल, भारत-रशियाविरोधी राष्ट्रांना या भेटीतून चपराक बसेल, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.



# धोरणात्मक चक्रव्यूहात साखर उद्योग!

**साखरेच्या किमान विक्री किमतीचा प्रलंबित प्रश्न, इथेनॉल धोरणातील बदल आणि या सर्व घटकांचा महाराष्ट्राच्या या महत्त्वाच्या क्षेत्राच्या भविष्यावर होणारा परिणाम यावर आपण सविस्तर चर्चा करणार आहोत.**

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेला साखर उद्योग राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. हा उद्योग सुमारे ५ कोटी ऊस उत्पादक शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबांचे जीवनमान उंचावतो. या उद्योगामुळेच ग्रामीण भागात आर्थिक स्थैर्य आणि समृद्धी टिकून आहे. मात्र, एक कटू विरोधाभास असा आहे की, जो उद्योग कोट्यवधी लोकांच्या जीवनात गोडवा आणतो, तोच आज एका अशा धोरणात्मक चक्रव्यूहात अडकला आहे, जो कारखान्यांनाच नव्हे, तर कोट्यवधी शेतकरी आणि बँकिंग क्षेत्रालाही खाईत लोटू शकतो. वाढता उत्पादन खर्च आणि स्थिर राहिलेले साखरेचे दर यांमुळे कारखान्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

विशेषतः साखर उद्योगाच्या सध्याच्या आर्थिक संकटाचे मूळ समजून घेण्यासाठी दोन महत्त्वाच्या संकल्पना जाणून घेणे आवश्यक आहे. 'उचित आणि मोबदला किंमत' (FRP) आणि 'किमान विक्री किंमत' (MSP). सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास FRP म्हणजे साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांकडून ऊस खरेदी करण्यासाठी कायद्याने द्यावी लागणारी किमान किंमत, तर MSP म्हणजे कारखान्यांना त्यांची तयार साखर विकता येणारी किमान किंमत.

सध्याचा संघर्ष याच दोन किमतींमधील असंतुलनामुळे निर्माण झाला आहे. एकीकडे केंद्र सरकारने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी FRP मध्ये सातत्याने वाढ केली आहे.२०१९ मध्ये प्रति टन २,७५० रुपये असलेली FRP वाढून ३,४०० रुपये झाली आणि आता ती ३,५५० रुपये प्रस्तावित आहे. मात्र, दुसरीकडे साखरेची MSP २०१९ पासून प्रतिक्विंटल ३,१०० रुपयांवर (म्हणजेच ३१ रुपये प्रतिकिलो) स्थिर आहे.

याचा थेट परिणाम कारखान्यांच्या ताळेबंदावर झाला आहे. सध्या साखरेचा उत्पादन खर्च प्रतिकिलो ४१ ते ४३ रुपयांपर्यंत पोहोचला आहे, पण कारखान्यांना त्यापेक्षा खूप कमी दराने साखर विकावी लागत आहे, ज्यामुळे प्रतिकिलो सुमारे १० रुपयांचे नुकसान होत आहे. या सततच्या तोट्यामुळे राज्यातील अनेक कारखान्यांवर २५० ते ३०० कोटींचे कर्ज साचले आहे.

इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे महासंचालक दीपक बल्लाणी यांनी उद्योगाची ही बिकट परिस्थिती स्पष्टपणे मांडली आहे – 'आर्थिक व्यवहार्यतेची समस्या समोर येणारच आहे. हा एक पूर्णपणे नियंत्रित उद्योग आहे, जिथे सरकार कच्च्या मालाची किंमत आणि अंतिम उत्पादनाची किंमत दोन्ही ठरवते. जर उसाची किंमत वाढत राहिली, पण अंतिम उत्पादनाच्या किमती बदलल्या नाहीत तर कारखान्यांनी व्यवस्थापन कसे करावे? इथेच मूळ समस्या आहे.'

### इथेनॉल : आशेचा किरण ते चिंतेचे कारण

काही वर्षांपूर्वी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण करण्याच्या सरकारच्या (EBP) कार्यक्रमाकडे साखर उद्योगासाठी एक मोठा आशेचा किरण म्हणून पाहिले जात होते. या धोरणामुळे कारखान्यांना अतिरिक्त महसुलाचा मार्ग खुला झाला आणि २०१८ पासून डिस्टिलरी क्षमतेमध्ये तब्बल ४० हजार कोटींहून अधिक गुंतवणूक झाली. मात्र, आता हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. सरकारच्या धोरणांमध्ये अनपेक्षितपणे बदल झाल्याने धान्यापासून (विशेषतः मका) बनवलेल्या इथेनॉलला अधिक पसंती दिली जात आहे. परिणामी पेट्रोल मिश्रणातील धान्याधारित इथेनॉलचा वाटा वाढून जवळपास ७२ टक्के झाला आहे, तर उसावर आधारित इथेनॉलचा वाटा केवळ २७ टक्क्यांपर्यंत घसरला आहे.

यासोबतच दुसरी मोठी समस्या म्हणजे गेल्या तीन वर्षांपासून उसाच्या FRP मध्ये सुमारे १७ टक्के वाढ होऊनही उसापासून बनवलेल्या इथेनॉलच्या खरेदी दरात कोणतीही वाढ झालेली नाही. त्यामुळे साखर कारखान्यांसाठी इथेनॉलचे उत्पादन आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य बनले आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, बँकांकडून कर्ज घेऊन उभारलेली ४० हजार कोटींची गुंतवणूक आता अनुत्पादक मालमत्ता (NPAs) बनण्याचा धोका निर्माण झाला आहे, ज्यामुळे बँकिंग क्षेत्राची चिंता वाढली आहे. उद्योजक विवेक सरावगी यांच्या मते, ही परिस्थिती 'एखाद्या उद्योगाच्या पायाखालची जमीन काढून घेण्यासारखी' आहे. इथेनॉलमधील ही निराशाजनक परिस्थिती उद्योगाच्या एका मोठ्या संधीला सुरुंग लावत आहे, जी देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी एक मोठी ताकद ठरू शकली असती.

### 'रोड मॅप'ची गरज

साखर उद्योगासमोरील एक मोठे आव्हान म्हणजे दीर्घकालीन आणि स्थिर धोरणांचा अभाव. सध्या उद्योग प्रत्येक हंगामासाठी जाहीर होणाऱ्या तात्पुरत्या धोरणांवर अवलंबून आहे, ज्यामुळे अनिश्चिततेचे वातावरण निर्माण होते आणि गुंतवणुकीवर परिणाम होतो.या समस्येवर तोडगा काढण्यासाठी नॅशनल को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज फेडरेशनसारख्या उद्योग संघटनांनी केंद्र सरकारला एक तपशीलवार 'रोड मॅप' सादर केला आहे. या रोड मॅपमधील आणि उद्योगातील तज्ज्ञांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत :

साखरेची MSP सुधारा: सध्याची ३१ रुपये प्रतिकिलो असलेली किमान विक्री किंमत वाढवून ती उत्पादन खर्चाशी सुसंगत म्हणजेच ४१ ते ४३ रुपये प्रतिकिलो करावी.

FRP आणि MSP जोडा: उसाच्या FRP मध्ये जेव्हा जेव्हा वाढ होईल, तेव्हा साखरेच्या MSP मध्येही त्यानुसार आपोआप वाढ होईल, अशी एक थेट यंत्रणा तयार करावी.

इथेनॉलच्या दरात वाढ करा: वाढत्या ऊस दराच्या प्रमाणात उसापासून बनवलेल्या इथेनॉलच्या खरेदी दरातही वाढ करावी.

१० वर्षांचे धोरण तयार करा: वार्षिक धोरणांऐवजी उद्योगाला किमान १० वर्षांसाठी एक स्थिर आणि दीर्घकालीन धोरणात्मक चौकट द्यावी, ज्यामुळे उद्योगात स्थैर्य येईल आणि गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल. मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारने या रोड मॅपचा अभ्यास सुरू केला आहे, ज्यामुळे भविष्यात सकारात्मक सुधारणा होण्याची एक आशा निर्माण झाली आहे.

### एफआरपी-एमएसपी असंतुलन

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ असलेला साखर उद्योग आज एका निर्णायक वळणावर उभा आहे. उसाच्या वाढत्या किमती (FRP) आणि साखरेच्या स्थिर राहिलेल्या किमती (MSP) यातील गंभीर असंतुलनामुळे कारखान्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. इथेनॉल धोरणातील अनपेक्षित बदलांनी या संकटात आणखी भर घातली आहे.

या आव्हानांच्या पलीकडे देशाच्या GDP मध्ये तीन टक्के योगदान देण्याची या उद्योगाची सुप्त क्षमता आहे, जी योग्य धोरणांच्या प्रतीक्षेत आहे. अशा परिस्थितीत एकच प्रश्न उरतो तो म्हणजे शेतकरी, कारखानदार आणि बँका यांच्या भवितव्याचा प्रश्न असताना सरकार या उद्योगाला केवळ 'गोड' आश्वासन देणार की धोरणात्मक 'कडू' डोस देऊन त्याला पुन्हा नवसंजीवनी देणार?

### एक सुप्त शक्ती

सध्याच्या आर्थिक संकटाच्या पलीकडे पाहिल्यास तज्ज्ञांच्या मते भारतीय साखर उद्योगात प्रचंड आर्थिक क्षमता दडलेली आहे. धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास तो अर्थव्यवस्थेसाठी एक प्रमुख विकास इंजिन बनू शकतो. महाराष्ट्राच्या साखर आयुक्तांच्या मते, साखर उद्योग आणि त्याच्याशी संलग्न असलेल्या उपउत्पादन क्षेत्रांमध्ये देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात तीन टक्क्यांपर्यंत योगदान देण्याची क्षमता आहे. साखर उद्योगाकडे केवळ संकटातून बाहेर काढण्यापुरते मर्यादित न पाहता धोरणात्मक अडथळे दूर केल्यास राज्याच्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती देणारी एक सुवर्णसंधी म्हणून पाहिले पाहिजे. सध्या ही वाढीची संधी केवळ धोरणात्मक त्रुटींमुळे वाया जात आहे.

**विक्रांत पाटील**

## सनबर्न फेस्टिव्हल

भारतीय संस्कृतीत,पाश्चात्य संस्कृतीने किती घट्ट पाय रोवले आहेत, याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे डिसेंबर मध्ये मुंबईत होऊ घातलेला 'सनबर्न फेस्टिव्हल'. या फेस्टिव्हलला यावर्षी मुंबईमध्ये आयोजित करण्यास महाराष्ट्र सरकारने परवानगी दिली आहे. २००७ मध्ये प्रथमच गोव्यात या फेस्टिव्हलने शिरकाव केला.२०१६ मध्ये पुणे आणि आता मुंबईत डिसेंबरमध्ये हा फेस्टिव्हल होऊ घातला आहे.या कार्यक्रमात हजारोंचा सहभाग असतो. हजारो विदेशी पर्यटक भारतात येतात. त्यामुळे अत्यंत कमी अवधीत राज्याच्या तिजोरीत कोट्यावधी रुपयांची भर पडते.म्हणजे यात अर्थकारण आहे म्हणूनच ही उठाठेव. परंतु या फेस्टिव्हलमुळे समाजात मद्य, अमली पदार्थ आणि अश्लीलता यांची विषवल्ली इथे रूजते आणि फोफावते आहे हे सरकारला कळू नये याचे आश्चर्य वाटते!आधीच पुणे आणि मुंबईत अमली पदार्थांचे साठे सापडत आहेत. त्याकडे दुर्लक्ष करून पुन्हा तरुण पिढीला अशा फेस्टिव्हलच्या निमित्ताने नशाखोर बनवण्याचे काम सरकार करतय असे वाटते. इकडे लाडक्या बहिणी म्हणून गोंजारायचे आणि मद्य आणि अमली पदार्थांमध्ये त्यांच्या नवऱ्यांना आणि मुलांना गुंतवायचे. असे दुहेरी धोरण सध्या दिसते आहे. हे सर्व केवळ राज्य चालवण्यासाठी, आर्थिक गणिते मांडण्यासाठी योग्य वाटत असले, तरी त्यासाठी आपण तरुण पिढीचे भविष्य अंध:कारात लोटत आहोत, हे वेळीच कळले पाहिजे. अन्यथा..

**माधवी पत्की**
नागपूर

## सनबर्न फेस्टिवल मुंबईत नको...

मुंबई सारख्या औद्योगिक राजधानी असलेल्या ठिकाणी सनबर्न फेस्टिवल असणे, ही मुंबईला अमेरिकेच्या लास वेगास सारखे करण्याचा प्रयत्न तर नाही ना? असा यक्ष प्रश्न सर्वसामान्य जनतेच्या मनात आहे. २००७ सालापासून हा फेस्टिवल मुख्यत्वेकरून गोवा येथे आयोजित करण्यात आलेला आहे. यावर्षी तो शिवडी मुंबई येथे आहे. यात विदेशी गाणी, पॉप संगीत यावर नाचणारी तरुण मुले असतात. त्यानंतर त्यातील काही मुले ही नशा म्हणून दारू आणि अमली पदार्थ याचे सेवन करतात. आपली काही तरुण मुले अयोग्य मार्गावर लागली आहेत आणि या सारखे होणाऱ्या कार्यक्रमामुळ्ये त्याला खतपाणी घातले जाईल अशी भीती वाटते.अशा कार्यक्रमातून सरकारला खूप महसूल मिळत असेल पण खरच या कार्यक्रमाची मुंबईत गरज आहे का? हा विचार झाला पाहिजे. नको असे कार्यक्रम मुंबईत...परदेशी संकृतीचे अंधानुकरण थांबवले पाहिजे हा कार्यक्रम आणि असे सर्व कार्यक्रम यांना भारतात बंदी केली पाहिजे. असे झाले नाही तर आपणही लास वेगास सारखे चुकीच्या पद्धतीने प्रसिद्ध होऊ आणि यातून आपल्या संस्कृतीचा नाश अटळ आहे.

**आल्हाद माळगांवकर**

## डिजिटल मनोरंजन आणि परिणाम

आजच्या आधुनिक युगात सामाजिक माध्यमे आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. शिक्षण, रोजगार, व्यवसाय, मनोरंजन अशा प्रत्येक क्षेत्रात या माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. मनोरंजनाच्या क्षेत्राचा विचार करता YouTube आणि Netflix हे दोन्ही लोकप्रिय प्लॅटफॉर्म आहेत. मात्र, आजची वस्तुस्थिती अशी आहे की लहान मुलेही या माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर वापर करताना दिसतात. मुले नेमके कोणते व्हिडिओ पाहत आहेत, याकडे पालकांचे लक्ष नसल्यास या माध्यमांवर उपलब्ध असलेले हिंसक, अश्लील आणि अनैतिक दृश्यांचे व्हिडिओ पाहण्याची दाट शक्यता असते. याचा परिणाम मुलांच्या कोवळ्या मानसिकतेवर होतो. त्यामुळे मुले हट्टी, चिडचिडी व काही वेळा हिंसक स्वभावाचीही बनतात. या स्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पालकांनी जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांच्या स्क्रीन टाइमवर लक्ष ठेवणे, योग्य कंटेंटची निवड करून देणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे गरजेचे आहे. तसेच शासनानेही याबाबत कडक नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.यासंदर्भात नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने YouTube आणि Netflix वरील अश्लील सामग्री पाहण्यासाठी आधार कार्ड आवश्यक असावे, अशी महत्त्वाची शिफारस केली आहे. त्यामुळे लहान मुलांना चुकीच्या कंटेंटपासून दूर ठेवणे शक्य होईल. सर्वोच्च न्यायालयाने उचललेल्या या कठोर पावलामुळे मुलांबरोबरच तरुणांमध्येही पसरणाऱ्या चुकीच्या मानसिकतेवर निश्चितच आळा बसेल, अशी अपेक्षा आहे.

**प्रिया बागडदेव**

## इंडिगो एअर लाइन्सचा गोंधळ...

भारतातील सर्वात मोठ्या विमान कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडिगो एअरलाइन्सच्या देशभरातील सुमारे दोनशेहून अधिक देशांतर्गत विमानांची उड्डाणे रद्द झाल्यामुळे मोठा गोंधळ आणि प्रवाशांची गैरसोय झाली.या गोंधळाचे मुख्य कारण नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने लागू केलेले कठोर फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन्स नियम आहेत, ज्याला 'उड्डाण कर्तव्य वेळ मर्यादा' असेही म्हणतात. हे नियम वैमानिक आणि क्रू सदस्यांच्या थकव्याला आळा घालण्यासाठी आणि उड्डाणे सुरक्षित ठेवण्यासाठी निश्चित केलेले आहेत.नवीन नियमांनुसार,वैमानिकांच्या ड्युटीचे तास आणि विश्रांतीचे नियम अधिक कठोर झाल्यामुळे,एकाच वेळी उपलब्ध असलेल्या क्रू सदस्यांची संख्या अचानक कमी झाली. इंडिगो व्यवस्थापनाने या बदलांसाठी पुरेसे नियोजन न केल्यामुळे, म्हणजेच वेळेत अतिरिक्त पायलटची भरती न केल्यामुळे किंवा कामाचे योग्य वेळापत्रक न केल्यामुळे, त्यांना मोठ्या संख्येने उड्डाणे रद्द करावी लागली.ही नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असल्याने, सरकारने या नियमांमध्ये बदल करण्यापूर्वी आणि त्यांची अंमलबजावणी करण्याची अंतिम मुदत देण्यापूर्वी एअरलाईन्सना तयारीसाठी पुरेसा वेळ दिला होता, असे बोलले जाते परंतु अंमलबजावणीच्या वेळी इंडिगो व्यवस्थापनाचे झालेले अपयश स्पष्टपणे दिसून आले.विदेशी नेत्यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांचे लक्ष भारतावर असल्याने, अशा काळात घडणाऱ्या गोंधळाला मोठे महत्त्व मिळते. त्यामुळे, सरकार आणि राष्ट्रीय तपास यंत्रणांनी केवळ सामान्य प्रशासन किंवा तांत्रिक समस्या म्हणून न पाहता, या घटनांची राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. देशाला बदनाम करणाऱ्या किंवा अस्थिरता निर्माण करणाऱ्या कोणत्याही शक्तीला ताकदीने मोडून काढणे हे केंद्र सरकारची प्राथमिकता असावी.

**अविनाश देशपांडे**

## 'हलाल प्रमाणपत्रा'ला हद्दपार करा

दिल्लीत संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. पुण्यातील भाजपच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी देशात अवैधरित्या चालणाऱ्या हलाल प्रमाणपत्र सक्तीवर अधिवेशनात नुकताच आवाज उठवला. प्रमाणपत्राची व्याप्ती आणि प्रक्रिया यांवर त्यांनी गंभीर आक्षेप नोंदवले. हलाल शब्द केवळ मांसापुरता मर्यादित राहिला नसून रसायने, प्लास्टिक, सिमेंट, दूध, साखर, तेल आणि आता तर औषधे यांनाही अवैधरित्या हलाल प्रमाणपत्र घेणे सर्वत्र बंधनकारक करण्यात आले आहे. हलाल हा एक पंथाचा धार्मिक विषय असून तो केवळ मांसापुरता मर्यादित असायला हवा आणि त्याबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र सरकारने द्यायला हवे. हलाल प्रमाणपत्राचा विषय मागील तीन चार वर्षांपासून देशभरात मोठ्या प्रमाणात गाजतो आहे. जागतिक पातळीवर अनधिकृतपणे समांतर अर्थव्यवस्था उभारणाऱ्या हलाल प्रमाणपत्राने भारतातही आपले हातपाय घट्ट रोवले आहेत. या प्रमाणपत्राचे धोके ओळखून उत्तर प्रदेशमध्ये योगी सरकारने हलाल प्रमाणपत्रावर बंदी घातली आहे. अशाच प्रकारे महाराष्ट्रातही हलाल प्रमाण पत्राच्या नोंदीवर आणि हलाल प्रमाणित उत्पादनांवर बंदी आणावी यासाठी हिंदुत्ववादी आणि राष्ट्रप्रेमी संघटना मागील काही काळापासून सरकारचा पाठपुरावा करत आहेत, सरकार दरबारी निवेदने देत आहेत, सनदशीर मार्गाने आंदोलने करत आहेत.

जागतिक पातळीवर काही मुस्लिम संघटना अनधिकृतपणे हलाल सर्टिफिकेशनची योजना राबवत आहेत. त्यांच्या शाखा आज भारतभर निर्माण झाल्या आहेत. एखाद्या कंपनीला आपले उत्पादन आखाती देशांत किंवा मुस्लिबहुल भागात विकायचे असेल, तर अशा कंपन्यांना हलाल सर्टिफिकेशन करणे या संघटनांकडून अनिवार्य करण्यात आले आहे. या संघटना व्यापारी कंपन्यांकडून लक्षावधी रुपये घेऊन त्यांना हलाल प्रमाणपत्र देतात. या प्रमाणपत्रासोबत उत्पादनावर छापण्यासाठी लोगो देण्यात येतो. मुस्लिमबहुल भागात तेथील नागरिक हा लोगो पाहूनच उत्पादने खरेदी करतात, असे यांच्याकडून सांगण्यात येते. एकदा हलाल प्रमाणपत्र घेतल्यावर दरवर्षी ने नूतनीकरण करण्यासाठी पुन्हा हजारो रुपये या संघटना व्यापाऱ्यांकडून वसूल करतात. या सर्व प्रक्रियेत त्या देशातील सरकारला कोणताही लाभ होत नाही. सरकार दरबारी या सर्व व्यापाराची कोणतीही अधिकृत नोंद नसते. या योजनेतून गोळा करण्यात आलेल्या पैशातून आज हलाल इकॉनॉमी जागतिक पातळीवरील एक बलाढ्य इकॉनॉमी झाली आहे. या योजनेतून मिळणारा पैसा जगभरात पकडल्या गेलेल्या आतंकवाद्यांना न्यायालयीन साहाय्य पुरवण्यासाठी वापरला जातो हे आता सप्रमाण सिद्ध झाले आहे.

महाराष्ट्रासह देशभरात 'हलाल इंडिया', 'हलाल सर्टिफिकेशन सर्व्हिसेस इंडिया', 'जमियत उलेमा-ए-हिंद', 'जमियत उलेमा-ए-महाराष्ट्र' आदी अनेक संस्थांकडून बेकायदेशीरपणे हलाल प्रमाणपत्रांचे वाटप करून अब्जावधी रुपये गोळा करण्यात येत आहेत. स्वत: केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनीही खाजगी संस्थांना अवैधरित्या प्रमाणपत्र वाटप करून पैसे गोळा करण्याचा अधिकार नाही, असे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. हलाल इकोनॉमीला सहकार्य म्हणजे आतंकवादाला समर्थन हे समीकरण लक्षात घेऊन हलाल प्रमाणपत्र घेणाऱ्या कंपन्यांवर, उपहारगृहांवर आणि वस्तूंवर नागरिकांनी बहिष्कार घालायला पाहिजे. वस्तू विकत घेताना त्यावर हलाल चिन्ह आहे का पडताळावे, हॉटेल, रेस्टोरंटमध्ये जाताना बोर्डावर, मेन्यूकार्डावर हलालचे चिन्ह आहे का तपासावे.

**जगन घाणेकर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# एस.टी. बसला मालवाहू ट्रकची धडक; तिघांचा मृत्यू

## सहाजण गंभीर, मृतकांच्या नातेवाईकांना प्रत्येकी १० लाखांची मदत जाहीर – जखमींना तातडीची आर्थिक मदत

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : चंद्रपूरहून यवतमाळकडे येणाऱ्या वणी आगाराच्या एमएच 40 वाय 5782 क्रमांकाच्या एसटी बसला, विरुद्ध दिशेने येणाऱ्या एमएच 28 बीबी 5827 ट्रकने ओव्हरटेकच्या प्रयत्नात धडक दिल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत तिघांचा जागीच मृत्यू, तर सहा प्रवासी गंभीर जखमी झाले. इतर तिघांना किरकोळ जखमा झाल्या असून प्राथमिक उपचारांनंतर त्यांना घरी सोडण्यात आले.

अपघात बोटोनी ते जळका मार्गावर रात्री अंदाजे 7.45 वाजता झाला. धडक इतकी जबर होती की बसचे तीन लाखांपेक्षा अधिक नुकसान झाल्याचे प्रशासनाने सांगितले. घटनास्थळी पाहणी करून पंचनामा करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. विभागीय नियंत्रक अमृतराव कच्छवे यांनी दिलेल्या माहितीनुसार, एसटी महामंडळाने मृतकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी 10 लाखांची मदत जाहीर केली, तर जखमींना 500 ते 1000 रुपयांपर्यंत तातडीची मदत देऊन उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. यापैकी दोन मृतकांच्या परिवारांना 10-10 हजार रुपये तातडीने देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे पुढील प्रमाणे आहे. नवनाथ शिवाजी काचे, मुक्काम अकलूंगा, ता. लातूर, भीमराव यशवंत मरस्कोल्ले, रा. मंगी, ता. केळापूर, जि. यवतमाळ, प्रसाद अरविंद चिंचोळकर, रा. मेटीखेडा गंभीर जखमीचे नाव पुढील प्रमाणे आहे.

श्रीमती विमल भीमराव मरस्कोल्ले (60) रा. मंगी, ता. केळापूर, जि. यवतमाळ प्रगती शंकर ठाकरे रा. वांजरा, ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर अमोल दिलीप तिवसे (36) रा. पालोती, ता. कळंब, जि. यवतमाळ शुभम देवानंद ठोमरे (29) रा. मारेगाव, ता. दारव्हा, जि. यवतमाळ भीमराव लक्ष्मण मडावी (32) रा. बोटोनी, ता. मारेगाव अशोक चांगीलाल कुबडे रा. दिग्रस, जि. यवतमाळ तसेच बस चालक नरेंद्र लक्ष्मण मडावी व वाहक सचिन दौलतराव झुलपे यांना देखील दुखापत झाली. वणी आगाराचे आगार व्यवस्थापक विवेक बनसोड यांनी घटनेनंतर तातडीने घटनास्थळी धाव घेऊन रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली.

काही जखमींना ग्रामीण रुग्णालय, तर गंभीर जखमींना वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे दाखल करण्यात आले.

## यवतमाळ बसस्थानकात बसणार आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे

नव्याने उभारलेल्या यवतमाळ बसस्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी असते. याच गजबजलेल्या परिसराचा फायदा घेऊन दागिने, रोख रक्कम व मौल्यवान वस्तू चोरी जाण्याच्या अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. तांत्रिक सुविधांचा अभाव असल्याने चोरांचा माग काढणे अवघड होत आहे. या पार्श्वभूमीवर बसस्थानक परिसरात आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतला असून लवकरच कामाला सुरुवात केली जाणार असल्याची माहिती विभागीय नियंत्रक अमृतराव कच्छवे यांनी दिली. यामुळे चोरी रोखण्यास मदत होणार असून संशयितांवर लक्ष ठेवणे सुलभ होणार आहे.

# अभाविपचे ७१ वे राष्ट्रीय अधिवेशन देहरादूनमध्ये संपन्न

## शिक्षण, घुसखोरी, समाजपरिवर्तन यांसह पाच ठराव मंजूर



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) चे ७१ वे राष्ट्रीय अधिवेशन उत्तराखंडमधील देहरादून येथील परेड ग्राउंडवर उभारलेल्या 'भगवान बिरसा मुंडा नगर'मध्ये २८ ते ३० नोव्हेंबर दरम्यान यशस्वीरीत्या पार पडले.

देशभरातील सर्व राज्यांतून तब्बल १२४८ प्रतिनिधींनी हजेरी लावलेल्या या अधिवेशनात संघटनात्मक, शैक्षणिक, सामाजिक आणि सुरक्षा विषयक मुद्यांवर सखोल चर्चा झाल्याची माहिती राष्ट्रीय मंत्री, प्रांत मंत्री पायल किनाके यांनी पत्रकार परिषदेत सांगीतले. यावेळी जिल्हा संयोजक आदर्श राऊत, नगरमंत्री कुणाल काळे, मिडिया संयोजक आवेश पुराणिक आदी उपस्थित होते. पुढे बोलताना किनाके म्हणाले कि अधिवेशनात पाच प्रमुख ठराव मंजूर झाले. यात सर्व शैक्षणिक संस्थांना पुरेशा निधीसह एकात्मिक संरचनेखाली आणण्यात यावी. बांगलादेशी घुसखोरी राष्ट्रीय सुरक्षेस गंभीर धोका, मानवनिर्मित नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी समाजाच्या संयुक्त सहभागाचा प्रस्ताव, विभाजनकारी शक्तींविरुद्ध संघटित समाजच प्रभावी उपाय, 'समाजपरिवर्तनाचे वाहक बनूया' हा राष्ट्रीय कार्यकारिणीत मंजूर निर्णय घेण्यात आला. तीन ऐतिहासिक यात्रांचे भव्य आगमन अधिवेशनात राणी अब्बक्का कलश यात्रा, भगवान बिरसा मुंडा संदेश यात्रा आणि गुरु तेग बहादुरजी जल-कलश प्रतिष्ठापन या तीन महत्त्वपूर्ण यात्रांचे आगमन विशेष आकर्षण ठरले. या यात्रांमुळे देशाच्या स्वातंत्र्य, संस्कृती, जनजाती इतिहास व बलिदान परंपरेची प्रेरणादायी उजळणी झाली. राष्ट्रीय महामंत्री डॉ. वीरेंद्रसिंह सोलंकी यांनी ७६,९८,४४८ सदस्यसंख्येसह वार्षिक प्रतिवेदन सादर केले. यंदा अभाविपच्या सदस्यसंख्येने सर्व विक्रम मोडले.

### गडचिरोली येथे होणार अधिवेशन

अभाविपच्या राष्ट्रीय मंत्री पायल किनाके यांनी सांगितले की, विदर्भ प्रांताचे ५४वे प्रांत अधिवेशन ९ ते ११ जानेवारी २०२६ रोजी गडचिरोली येथे होणार आहे. सुमारे ५०० विद्यार्थी सहभागी होणार असून १२ जानेवारी स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विदर्भातील सर्व महाविद्यालयांत व्याख्यानमाला व युवा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

## • वेचक

### महागावमध्ये महिलेवर विनयभंग आणि दरोड्याचा प्रयत्न; दागिन्यांसह आरोपी फरार

महागाव – येथील वाकोडी शिवारात आज (दि. ०४/१२/२०२५) सकाळी ९ वाजताच्या सुमारास एका महिलेला एकटी पाहून दोन आरोपींनी तिच्यावर जबरदस्तीने हल्ला करत विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे, तर आरोपींनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून पोबारा केला आहे. या धक्कादायक घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पीडित महिला या वाकोडी येथील रहिवासी असून, आज सकाळी ९ वाजताच्या दरम्यान त्या त्यांच्या शेतातील गोठ्यात गाय आणि जनावरांना चारापाणी करत होत्या. याचवेळी, शेजारी शेत असलेले आरोपी तुकाराम कोंडबा डोरले (वय अंदाजे ४५) याने पाठीमागून येऊन त्यांना पकडले. त्याने पीडितेच्या कमरेत हात घालून अश्लील स्पर्श करत, "आज एकटी सापडलीस, आज तुला सोडणार नाही," असे धमकावले. पीडितेने जिवाच्या आकांताने त्याला विरोध करत, "तुम्ही माझ्या भावासारखे आहात, असे कसे बोलू शकता?" असे म्हणत त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न केला. दागिने हिसकावून पळ काढला : या झटापटीदरम्यान, आरोपीचा मुलगा विकास तुकाराम डोरले (वय अंदाजे २५) हा अचानक घटनास्थळी आला. त्याने पीडित महिलेला ढकलून देत, त्यांच्या गळ्यातील १ तोळ्याची सोन्याची एकदानी आणि ५ ग्रॅमचे सोन्याचे मनिमंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून घेतले. महिलेने आरडाओरड सुरू केल्यामुळे दोन्ही आरोपींनी घटनास्थळावरून तत्काळ पळ काढला. या घटनेनंतर घाबरलेल्या पीडितेने धावतपळत घरी येऊन सर्व प्रकार पतीला सांगितला. त्यानंतर पतीसोबत त्यांनी महागाव पोलिस ठाणे गाठले आणि दोन्ही आरोपी विरुद्ध तक्रार दाखल केली आहे. त्यांनी आरोपींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करून, चोरीला गेलेले दागिने परत मिळवून देण्याची मागणी केली आहे. पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी तुकाराम कोंडबा डोरले याने माझ्याशी छेडछाड करून विनयभंग केला आणि विकास तुकाराम डोरले याने जबरदस्तीने दागिने हिसकावले." असे नमूद केले आहे. महागाव पोलिसांनी या गंभीर घटनेची नोंद घेतली असून, आरोपी तुकाराम कोंडबा डोरले आणि विकास तुकाराम डोरले यांच्याविरुद्ध योग्य तो कायदेशीर तपास सुरू केला आहे. आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल, अशी माहिती पोलिस स्टेशन महागाव यांनी दिली.



### जारी केलेल्या वेळापत्रकानुसार लोड शूटिंग बंद करा व शेतकऱ्याला दिवसा 12 तास लाईन द्या भारतीय किसान संघाची मागणी

ढाणकी – उपकार्यकारी अभियंता मार्फत कृषी वाहिनी थ्री फेज उपलब्दता १ डिसेंबर पासून वेळापत्रक जाहीर केले आहे. महाराष्ट्रा मध्ये कुठेच लोड सेटिंग नाही. तसेच माननीय मुख्यमंत्री यांनी सुद्धा शेतकऱ्याला दिवसा १२ तास वीज देऊ म्हणून जाहीर केले आहे. आपण दिलेल्या वेळापत्रकानुसार सोशल मीडियावर तसे वेळापत्रक सुद्धा आलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यात असंतोष निर्माण झाला आहे. शेतात सध्या रब्बीची पेरणी झालेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची सिंचन करण्यासाठीची धावपळ सुरू आहे. मात्र लोड सीटिंग मुळे सिंचन करणे अवघड होईल. तसेच रात्री अपरात्री हिंसक अशा प्राणयांचा सुद्धा वावर होऊ शकते तसेच सरपटणारे प्राणी साप, विंचू, किडा यामुळे सुद्धा शेतकऱ्यांच्या जीवाला धोका होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. महाराष्ट्र मध्ये कुठेच लोड सेटिंग नसताना शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळ का? त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा 12 तास लाईट द्या अन्यथा भारतीय किसान संघातर्फे मोठे आंदोलन उभे केले जाईल. अशा मागणीचे निवेदन उपकार्यकारी अभियंता यांना भारतीय किसान संघामार्फत देण्यात आले. यावेळी भारतीय किसान संघाचे पुसद जिल्हा कोषाध्यक्ष नितीन येरावार, भारतीय किसान संघ तालुकाध्यक्ष गोपाल सिंह गौर, भारतीय किसान संघ तालुका महामंत्री दिगंबर शिरडकर, बाळू शहापुरे, बक्काजी रावते व भारतीय किसान संघाचे सदस्य उपस्थित होते.

# वणी घरफोडी प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ – वणी शहरातील सराफा व्यापारी यांच्या घरावर धाड घालून करण्यात आलेल्या दरोड्याचा थरार अखेर उघडकीस आला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी तांत्रिक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे संशयित आरोपींना गाठत एकूण 13,22,835/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात मोठे यश मिळविले आहे.

29 नोव्हेंबर 2025 रोजी मध्यरात्री 2 वाजता संत गाडगे बाबा चौक, वणी येथील ज्वेलर्स व्यावसायिक श्री. संजय निळकंठ कोंडावार (वय 74) यांच्या घरी चार अज्ञात आरोपींनी सेक्युरीटी गार्ड व व्यापाऱ्याला चाकूचा धाक दाखवून मारहाण करत सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण 12,85,000/- चा ऐवज लंपास केला होता. याप्रकरणी पोलीस स्टेशन वणी येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्थानिक गुन्हे शाखेला गुन्हा उघडकीस आणण्यासाठी विशेष सूचना दिल्या. त्यानुसार विविध पथके तयार करून गोपनीय बातमीदारांच्या सहाय्याने शोधमोहीम सुरू करण्यात आली. तपासदरम्यान सागर बजरंग धोंगडे (रा. गोधणी कोठा, मुलकी, यवतमाळ) याच्यावर संशय बळावला व उमरसरा रोडवरील शिवभोजन केंद्राजवळून त्याला ताब्यात घेत कौशल्यपूर्ण चौकशी केली असता त्याने गुन्ह्यातील सहभागाची कबुली दिली.

तपासात उघडकीस आले की आरोपीने वैशाली संजय वाघमारे (रा. न्यू नरसाळा, नागपूर) हिच्या मदतीने एकूण सहा जणांच्या टोळीसह ही घरफोडी केली. पोलिसांनी धोंगडे यांच्या ताब्यातून रोख 65,835/-, 11,87,000/- किमतीचे सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल व दोन मोबाईल फोन असा 13,22,835/-चा मुद्देमाल जप्त केला. यानंतर पोलिसांनी वैशाली संजय वाघमारे (45 वर्षे) व ऋतिक लीलाधर गेडाम (21 वर्षे), रा. विठ्ठलवाडी, यवतमाळ यांना अटक केली असून इतर चार आरोपींचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. सतिश चवरे, सपोनि. दत्ता पेंडकर, पोउपनि. धनराज हाके यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखा व वणी पोलिस पथकाने संयुक्तपणे केली. कारवाईत सुनिल खंडागळे, सुधीर पांडे, निलेश निमकर, रजनीकांत मडावी, सलमान शेख यांच्यासह अनेक अधिकाऱ्यांचा सहभाग उल्लेखनीय ठरला. पोलीस तपासामुळे गुन्हा उघडकीस येऊन मोठ्या रकमेचा ऐवज परत मिळाल्याने व्यापारी वर्गात दिलासा निर्माण झाला आहे. उर्वरित आरोपींचा शोध जलद गतीने सुरू असून लवकरच त्यांनाही ताब्यात घेतले जाण्याची शक्यता आहे.

# ज्यांच्यासाठी लढलो त्यांनीच पाठ फिरवली : भाजप नेत्याची खंत

## २१ डिसेंबरला निकाल नऊ वर्षा नंतरचे राजकारण उलथवून टाकणारे समीकरण

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - उमरखेड नगरपरिषद निवडणुकीसाठी 2 डिसेंबर रोजी झालेल्या मतदानानंतर आता सर्वांच्या नजरा 21 डिसेंबरच्या निकालावर खिळल्या आहेत. अनेक नेते, कार्यकर्त्यांच्या राजकीय स्वप्नांचे भविष्य ईव्हीएम मध्ये सीलबंद आहे, प्रतिस्पर्धक राजकीय गटांनी अनपेक्षित हालचाली करत शहरातील राजकारणात नवीन क्षितिजे उघडल्याचे चित्र दिसत आहे.

भाजपमध्ये अनेक वर्षे कार्यरत राहून काँग्रेसच्या बालेकिल्ल्याला भगवा फडकविणाऱ्या आणि अनेकांचे राजकीय भविष्य घडविणाऱ्या नितीन भुतडा यांनी या निवडणुकीत आलेला अनुभव कडू असल्याचे स्पष्ट केले. अधिकृतरित्या माध्यमांसमोर न बोलता, झालेल्या अनौपचारिक चर्चेत त्यांच्यातील भावनिक वेदना प्रकर्षाने जाणवल्या. पत्नीला उमेदवारी देणे हा पक्षपात नव्हता. जर कुणाला उमेदवारी हवी होती तर संघटनेच्या पद्धतीनुसार मागणी करणे योग्य होते. मात्र तसं न करता मतातून नाराजी व्यक्त करणे म्हणजे प्रत्यक्षात माझ्याविरोधात भूमिका घेण्यासारखेच आहे," असे भुतडा यांनी केलेले वक्तव्य त्यांच्या अंतर्मनातील खंत दर्शविते. नऊ वर्षांच्या समीकरणांवर पूर्णविराम दिला असून या निवडणुकीत उमरखेडच्या राजकारणात एक आगळावेगळा कल दिसून आला. 2016 च्या निवडणुकीत भाजपाला खांद्याला खांदा लावून साथ देणारे काही माजी पदाधिकारी आणि नेते यंदा मात्र भुतडा यांच्या विरोधात एकत्र येताना पाहायला मिळाले. शहरातील विविध गट, वेगवेगळ्या राजकीय ध्रुवीकरणात असूनही 'एक व्यक्तीविरोधात' सर्व गटांची जोडणी झाल्याचे चित्र राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे. या निवडणुकीतील लक्षवेधी बाब म्हणजे अल्पसंख्याक मतदारांमध्ये भुतडा यांच्याबाबत सकारात्मक कल दिसल्याचे राजकीय सूत्रांनी सांगितले. मुस्लिम मतदारांनी मतदानाच्या दिवशी दाखविलेल्या सहभागातून त्यांच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त झाले असून निकालात त्यांचा निर्णायक प्रभाव पडण्याची शक्यता राजकीय तज्ञांनी वर्तविली आहे. नितीन भुतडा यांच्या निवेदनातून 'ज्यांच्यासाठी लढलो, त्यांनीच पाठ फिरवली' ही भावना स्पष्टपणे उमटते. अनेक वर्ष कार्यकर्त्यांना उभे करणारे नेते आज स्वतःच्या उमेदवारीच्या वेळी एकाकी पडल्याचे चित्र अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण करते. निकाल काहीही असो या निवडणुकीने उमरखेडच्या राजकारणात विश्वास, मैत्री, पराभव-जय आणि कटु वास्तवांचे मिश्र स्वरूप जनतेसमोर आणले आहे. 21 डिसेंबरला होणारा निकाल फक्त नगरपरिषद साठीच नाही, तर येथील भविष्यातील राजकीय समीकरणांच्या नव्या अध्यायासाठी निर्णायक ठरणार आहे.

# शासकीय मालमत्तेची चोरी आणि बेकायदेशीर विक्री प्रकरण

## उपविभागीय अभियंत्यावर कठोर चौकशीची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



दिग्रस - येथील सा.बां. विभागातील उपविभागीय अभियंता अनिल राठोड यांनी शासकीय मालमत्ता चोरून कर्मचाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीर विक्री केल्याचा धक्कादायक व अत्यंत गंभीर प्रकार उघडकीस आल्याने जनतेत आणि सामाजिक संस्थांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे सविस्तर तक्रार नोंदवण्यात आली आहे.

27 नोव्हेंबर 2025 रोजी दुपारी 2.30 ते 3.00 वाजताच्या सुमारास शासकीय विश्रामगृहाच्या मागील बाजूस असलेले जुने कुलर्स, रिकाम्या टाक्या, डांबराचे डबे व इतर साहित्य कोणतीही शासकीय परवानगी न घेता गुप्तपणे बाहेर काढून विक्री करण्यात आल्याचे प्रत्यक्ष व्हिडिओ चित्रीकरण व छायाचित्रांतून स्पष्टपणे दिसून आले आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांनी पदाचा व अधिकाराचा उघडपणे गैरवापर करून शासनाची आर्थिक हानी व सार्वजनिक निधीची लूट केली असून हा प्रकार भ्रष्टाचाराच्या श्रेणीत मोडणारा आहे.

तसेच अशाप्रकारचे प्रकार यापूर्वी देखील झाले असल्याची दाट शंका व्यक्त करण्यात आली आहे. शासकीय मालमत्ता चोरून बेकायदेशीर विक्री, प्रत्यक्ष व्हिडिओ व फोटो पुरावे, कोणतीही अधिकृत परवानगी नसताना गुप्तपणे विक्री व्यवहार, शासनाला मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका, पदाचा व अधिकाराचा उघड गैरवापर, अनेक वेळा असेच प्रकार घडल्याची शक्यता, संबंधितांवर कठोर चौकशी व कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. उपविभागीय अभियंता अनिल राठोड व सहभागी कर्मचाऱ्यांची तात्काळ चौकशी, कठोर गुन्हेगारी व विभागीय कारवाई, चोरी गेलेल्या शासकीय मालमत्तेची संपूर्ण किंमत शासनाकडे वसूल करणे, भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी विभागीय नियंत्रण कडक करणे ही तक्रार अधिक्षक अभियंता, सा.बां. यवतमाळ, सा.बां. विभाग अभियंता कार्यालय, पुसद, तहसिलदार, तहसिल कार्यालय दिग्रस यांच्याकडे दिपक गुलाब जाधव, जिल्हाध्यक्ष, अपंग जनता दल, सिध्दार्थ साहेबराव जमदाडे माजी ग्रा.पं. सदस्य, इसापुर व अयाज काजी अध्यक्ष, आधार बहुउद्देशीय संस्था, लाख रायाजी यांनी प्रतिलिपीसह सादर करण्यात आली आहे.

# वेणी (बु.) येथे विद्युत शॉर्ट सर्किटमुळे उसाला आग

## अपंग शेतकऱ्याचे दहा लाखांचे नुकसान

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव : तालुक्यातील मौजे वेणी (बु.) येथे विद्युत तारेच्या शॉर्ट सर्किटमुळे शेतातील उसाच्या पिकाला अचानक आग लागून मोठे नुकसान झाल्याची घटना ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता घडली. अपंग शेतकरी माणिकराव नागोराव पुंडे यांच्या सर्वे नंबर १०४ मधील सुमारे १ हेक्टर ५८ आर (४ एकर) शेतातील उसाचे पीक पूर्णपणे जळून खाक झाले.

या आगीत ऊस पिकासह शेती उपयोगी साहित्य, स्प्रिंकलर प्रणालीतील आठ तोट्यांसह इतर साधनांचेही नुकसान झाले असून सुमारे १० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. शेतातून जाणारी विद्युत तार तुटून स्पार्किंग झाल्याने आग लागल्याचे स्थानिकांनी सांगितले. याबाबत शेतकऱ्यांनी वारंवार फोन करूनदेखील वेणी (बु.) येथील लाईनमनांनी योग्यवेळी विद्युत दुरुस्ती न केल्यानेच हे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच तलाठ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला असून कृषी विभागालाही अहवाल सादर करण्यात आला आहे. दरम्यान, संबंधित शेतकरी हा अपंग असून शेती हा कुटुंबाचा एकमेव उदरनिर्वाहाचा व्यवसाय आहे.

झालेल्या नुकसानीबाबत त्यांनी विद्युत विभागाचे अभियंता, ठाणेदार, तहसीलदार तसेच कृषी विभागाकडे नुकसान भरपाईसाठी लेखी अर्ज सादर केला आहे. घटनेने परिसरात चिंता व्यक्त केली जात असून शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी होत आहे.

# सहा महिने होऊनही शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी गणवेशापासून वंचित!

## विद्यार्थ्यांची कटिंग, पेन, पेन्सिल चे पैसे अद्यापही मिळेना

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - तालुक्यातील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थी पहिले सत्र संपले असुनही गणवेशापासून वंचित राहत असून शिष्यवृत्तीचा अर्ज करून देखील त्यांना अद्यापही शिष्यवृत्ती मिळाली नाही. गरिबांचे विद्यार्थी शासकीय योजनेपासून वंचित राहत असल्याने पालकांमध्ये शासनाप्रती तीव्र संतापाची लाट पसरली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की तालुक्यातील एकूण आठ आश्रम शाळा असून त्या शासकीय शाळेमध्ये २ हजार ७६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शासकीय शाळेमधील विद्यार्थ्यांना गणवेश व शिष्यवृत्तीची रक्कम नाशिकच्या आयुक्तालयामार्फत प्रदान केल्या जाते. परंतु आयुक्तच हलगर्जीपणाकरीत असल्याची बाब या निमित्ताने समोर आली आहे. त्या सर्व विद्यार्थ्यांना दिवाळी संपूनही गणवेश वाटप झाले नाहीत.

सोबतच शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या पालकांच्या संयुक्त खात्यामध्ये जमा झाली नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शासकीय शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक शाळेचे मुख्याध्यापक व पिओकडे वारंवार विचारपूस करीत असून त्यांना चाल ढकलची उत्तरे मिळत आहेत. तालुक्यातील विद्यार्थ्यांकडे शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. सध्या विद्यार्थ्यांचे पालक ऊस तोडणीला गेले आहेत. त्यामुळे शासनातर्फे गरिबावर अन्याय होत असल्यामुळे उन्हाळ्याची सुट्टी जाहीर झाल्यावर त्यांना शासकीय मदत मिळणार का असा आरोप पालकांकडून लावल्या जात आहे.


### विद्यार्थ्यांना गणवेश व शिष्यवृत्ती लवकरच मिळणार.

एचएम व पिओ स्तरावरून पाठपुरावा सुरू आहे. येत्या १५ ते २० डिसेंबर पर्यंत शिष्यवृत्तीची रक्कम पालकाच्या संयुक्त खात्यामध्ये जमा होणार आहे. गणवेशाबाबत जे टेंडर झाले होते ते कोर्ट मॅटर झाल्यामुळे विलंब झाला आहे. येत्या पंधरा दिवसात विद्यार्थ्यांना गणवेश वाटप होणार आहे. ती प्रक्रिया प्रकल्प स्तरावर असती तर लगेच वाटप केले असते. परंतु नाशिकच्या आयुक्तालयास्तरावरून सर्व प्रक्रिया पार पडते. त्यामुळे विलंब लागत आहे. **– अरूण चव्हाण, पिओ, पुसद.**

### नियोजन शून्य कारभार सुरू

आमच्या पाल्यांना आतापर्यंत शिष्यवृत्ती मिळाली नाही. गणवेश मिळाला नाही. संबंधितांना वेळेचे बंधन नाही. किचनमध्ये शासनाने नेमून दीलेल्या मेनू मिळत नाही. विद्यार्थ्यांना मटकीवर भागवतात. फळ सुद्धा मिळत नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांनी शासकीय शाळेवर लक्ष द्यावे. अधिकाऱ्यांनी चौकशी करून आमच्यावर होत असलेल्या अन्याय दूर करावा.
**– गजानन बुरकुले, पालक, नानंद (खु.)**

# राज्य नाट्य स्पर्धेत 'कलारसिक'चा ऐतिहासिक विजय



### राज्य नाट्य स्पर्धेत 'कलारसिक'चा ऐतिहासिक विजय, चार पारितोषिकांसह निर्मितीचे तृतीय पारितोषिक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ – ६४ व्या महाराष्ट्र राज्य मराठी नाट्य स्पर्धेत यवतमाळच्या अग्रगण्य नाट्यसंस्था 'कलारसिक'ने यंदा पुन्हा चमकदार कामगिरी करत चार पारितोषिकांसह निर्मितीचा तृतीय क्रमांक पटकावला. चंद्रपूर केंद्रावर सादर करण्यात आलेल्या 'फेस टू फेस' या दोन अंकी रहस्यमय नाटकाला निर्मिती, दिग्दर्शन, वेशभूषा व अभिनय अशा चार विभागांत गौरव मिळाला.

या नाटकाचे निर्माते प्रशांत बनगीनवार यांना निर्मितीचे तृतीय, तर दिग्दर्शक म्हणून पहिल्याच वर्षी स्पर्धेत उतरलेल्या ऋषिकेश निवल यांना दिग्दर्शनाचे तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. वेशभूषेसाठी अश्विनी निवल यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. तसेच कलाकार डॉ. अनिरुद्धजित नरखेडकर आणि डॉ. प्रणाली वायकर यांना अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. चंद्रपूर येथे २५ नोव्हेंबर रोजी झालेल्या या स्पर्धेत एकूण १४ नाट्यसंस्थांचा सहभाग होता. त्यापैकी सर्वाधिक पुरस्कार पटकावत 'कलारसिक'ने यवतमाळच्या रंगभूमीचे वर्चस्व पुन्हा सिद्ध केले. संस्थेचे अध्यक्ष बनगीनवार यांनी या यशाचे श्रेय संपूर्ण टीमला देत सातत्य व परंपरा कायम राखण्याचा निर्धार व्यक्त केला. दिग्दर्शक ऋषिकेश निवल यांनी आगामी बालनाट्य स्पर्धेसाठी तयारी सुरू असल्याची माहिती देत यवतमाळमधील तरुणांना 'कलारसिक'च्या माध्यमातून नाट्यक्षेत्रात सहभागी होण्याचे आवाहन केले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



वैभव नारखेडे · मोहिनी मोहोड · ज्योती नांदलवार

### डॉ.पी.एम.जावंधिया यांच्या मार्गदर्शनाखाली तीन संशोधकांना पीएच.डी.

**अमरावती**-पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली तीन संशोधकांनी आपल्या-आपल्या संशोधन विषयांमध्ये पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे संस्थेची संशोधनपरंपरा अधिक भक्कम झाली आहे. डॉ. जावंधिया यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झालेल्या संशोधन प्रकल्पांमध्ये पुढील विषयांचा समावेश आहे. वैभव नारखेडे यांनी बिल्डिंग अँन एफिशियंट मेकॅनिझम फॉर एप्लीकेशन इन व्हिडिओ सुर्वेहीलन्स युजिंग आर्टिफिशियल इंटेलिजन्स, तसेच मोहिनी मोहोड यांनी डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ मशीन लर्निंग अल्गोरिथम्स फॉर स्ट्रेस डिटेक्शन युजिंग मल्टी मॉडेल सायकॉलॉजिकल डाटा, आणि ज्योती नांदलवार यांनी डिझाईन अँड इम्प्लिमेंटेशन ऑफ अ सिस्टम टु डिटेक्ट गायनॅकॉलॉजिकल कॅन्सर युसिंग आर्टिफिशल इंटेलिजन्स या संशोधनांद्वारे तिन्ही संशोधकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, आरोग्यसेवा आणि अभियांत्रिकी क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या यशामागे डॉ. जावंधिया यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले.

### शिक्षक मतदार संघाची प्रारूप यादीवरील हरकतींसाठी १८ डिसेंबरपर्यंत मुदत

**अमरावती**-अमरावती विभाग शिक्षक विधानपरिषद मतदारसंघाच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्याच्या कार्यक्रमाअंतर्गत१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित प्रारूप मतदार यादी ३ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासह उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांच्या कार्यालयात ही यादी नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध असून, यामध्ये सध्या ८ हजार १०४ मतदारांची (पुरुष: ५ हजार ११३ आणि महिला: २ हजार ९९१) नोंदणी झाली आहे.या प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती सादर करण्यासाठी ३ ते १८ डिसेंबर २०२५ पर्यंतचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सर्व संबंधितांनी आपली नावे तपासावीत आणि यादीत काही दुरुस्ती असल्यास किंवा नवीन नोंदणीसाठी संबंधित उपविभागीय अधिकारी तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी अथवा तहसीलदार तथा पदनिर्देशित अधिकारी यांच्याकडे निर्धारित वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. प्राप्त झालेले दावे व हरकती निकाली काढून १२ जानेवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### खापरे हत्या प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवा

**अंजनगाव बारी**- येथील सावता मैदानात रेल्वेमध्ये फुटाणे विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या ऋषी खापरेची हत्या करण्यात आली होती. जिहादी मानसिकता असणाऱ्या आरोपींनी त्याला ठार मारले, असा आरोप यावेळी करण्यात आला. सर्व स्तरातून हिंदू समुदायाकडून तीव्र विरोध केला जात आहे. त्याच धर्तीवर, संपूर्ण हिंदू समाज आणि सर्व हिंदुत्ववादी संघटना हिंदूसूर्य प्रतिष्ठान, बडनेरा च्यावतीने, अमरावतीचे आयुक्त अरविंद चावरिया यांना संपूर्ण माहिती दिली आणि न्याय मिळवून देण्यासाठी हा खटला जलदगती न्यायालयात चालवण्याची विनंती केली.

# ९५१ लाडक्या बहिणीची मतदानाकडे पाठ



**अमरावती/का.प्र.**
राज्य विधानसभा निवडणुकीपूर्वी, भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) सरकारने मध्य प्रदेश सरकारच्या धर्तीवर लाडकी बहिण योजना लागू केली. लाडकी बहिण योजनेअंतर्गत दरमहा १,५०० रुपये जमा करून राज्य सरकारने विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळवले. राज्य सरकार सत्तेत आल्यानंतर, योजनेतील कपातीमुळे हजारो लाडकी बहिण योजनेतून वगळण्यात आले.याबाबत मोर्शी नगरपरिषद निवडणुकीच महिलांचा रोष दिसून आला असून ९५१ लाडकया बहिणीनी मतदानच केले नाही.

२ डिसेंबर रोजी, नगरपालिका निवडणुकीत १२ प्रभागांसाठी २४ नगरसेवक आणि एका महापौरपदाच्या निवडणुका झाल्या. निवडणुकीत २४ नगरपरिषद सदस्यांसाठी १२७ उमेदवारांसाठी ३२,८७४ मतदार मतदान करणार होते. त्यापैकी १६,४७२ पुरुष मतदार होते आणि १६,४७२ महिला मतदार होते. मतदान संपेपर्यंत ११,२८७ पुरुष मतदारांनी मतदान केले होते, तर १०,३३६ महिला मतदारांनी मतदान केले होते. मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर महिला मतदारांची संख्या १६,४७२ असूनही, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी फक्त १०,३३६ महिला मतदारांनी मतदान केले, जे पुरुष मतदारांच्या संख्येपेक्षा ९५१ कमी होते. लाडकी बहिणींनी कमी मतदान केल्यामुळे, या निवडणुकीत कोण विजयी होईल हे काळच सांगेल.

## वाहनांनी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन
# नंबर प्लेट लावण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर

**अमरावती/ का.प्र.**
केंद्रीय मोटार वाहन नियमान्वये महाराष्ट्र शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. वाहनांना नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविणे आवश्यक असून सर्वोच्च न्यायालयाने तसे निर्देश दिले आहे.

जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांना, शासकीय, निमशासकीय कार्यालये, बँका यांनी त्यांच्या दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे आवश्यक असून दि. ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी बसवून घेण्यात यावी. एचएसआरपी नंबरप्लेट नसलेली वाहने किंवा बनावट एचएसआरपी असलेली वाहनांवर भविष्यात दंडात्मक कारवाई तसेच वाहनांबाबत परिवहन कार्यालयातील कामकाज थांबविण्यात येईल, असे आवाहन




प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी केले आहे.

## जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात दर गुरुवारी केली जाणार गर्भवती महिलांची तपासणी
### जनमाध्यम बातमीची दखल

**अचलपूर/वार्ताहर**
अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय येथे तालुक्यासह मेळघाट,अंजनगाव, दर्यापूर व चांदूरबाजार तसेच आदी ग्रामीण भागातील गर्भवती महिलांची तपासणी व प्रसूती साठी प्रचंड गर्दी असते.गेल्या ३० ऑक्टोबर चां गुरवारी सकाळी ८ वाजता सुरु होणारी गर्भवती महिलांची स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर मंडळीकडून होणारी तपासणी ची ओ.पी.डी दुपारी १२ वाजुनही सुरु न झाल्याने एकच गोंधळ उडाल्याचे वृत्त १ नोव्हेंबर रोजी दैनिक जनमाध्यम मध्ये प्रकाशित झाले होते.यासंदर्भात अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे तसेच अमरावती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ दिलीप सौंदले यांनी




सुद्धा दखल घेतली यामुळे आता या केबिनमध्ये लसीकरण,कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, गर्भवती महिलांची तापसणी आदी सुविधा उपलब्ध आहे. यामुळे गर्भवती महिलांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे.

या रुग्णालयात पहिल्या मजल्यावर स्वतंत्र केबिनची निर्मिती करण्यात आली आहे . याचा मोठा फायदा तपासणी साठी येणाऱ्या गर्भवती महिलांना होणार आहे .विशेष म्हणजे दर गुरवारी १५० पेक्षा जास्त गर्भवती महिला तपासणी साठी नोंदणी करतात.

त्यांना बसण्याची व्यवस्था ही करण्यात आली आहे. यामुळे दर गुरुवारी ग्रामीण भागासह,मेळघाटातील गरोदर महिलांना तपासणीसाठी सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यावेळी स्त्रिरोग तज्ञ डॉक्टर मंडळी कडून तपासणी केली जाते. जिल्हा शल्ययचिकित्सक डॉ.दिलीप सौंदले यांनी मार्गी लावल्याने नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहे.

## एचआयव्ही जनजागृती रॅलीमध्ये हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग

**अमरावती/का.प्र.**
दरवर्षी १ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त अमरावती शहरात एड्स जनजागृती रॅली'चे आयोजन करण्यात आले. 'अडथळयावर मात करू, एकजुटीने एड्सला लढा देऊ, नवपरिवर्तन घडवू' या घोषवाक्यासह शहरातील अडीच हजाराहून अधिक विद्यार्थी आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

जिल्हा सामान्य रुग्णालयातून या रॅलीला महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा संचानालयाचे संचालक डॉ. विनोद कंदेवाड यांनी हिरवी झेंडी दाखवली.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. कंदेवाड यांनी जिल्ह्याने एचआयव्ही संक्रमणाचा टक्का कमी केल्याबद्दल कौतुक केले.



सर्वसमावेशक जनजागृतीने एचआयव्हीच्या जनजागृती कार्यक्रमास मदत होईल आणि आपण निर्मूलनाचे उद्दीष्ट साध्य करू शकतो, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.जिल्हा सामान्य रुग्णालयातून निघालेली ही रॅली रेल्वे कॉटन मार्केट, राजकमल, श्याम चौक मार्गे पुन्हा इर्विन चौकातून जिल्हा सामान्य रुग्णालयात समारोपित झाली. रॅलीत वैद्यकीय, नर्सिंग, समाजकार्य, कृषी आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता.

तसेच, अति जोखमीच्या गटांसाठी कार्यरत असलेल्या सामाजिक संस्थांचे माहिती रथ यात समाविष्ठ होता, ज्यातून समुपदेशन आणि सुविधांची माहिती देण्यात आली. या यशस्वी आयोजनात अकोला परिमंडळ आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाकचौरे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नंदकिशोर राऊत, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

## प्रा.गजानन भारसाकळे यांच्या संशोधनकार्याला कॉफी राईट

**दर्यापूर/वार्ताहर**
गोसेवेच्या पारंपारिक कार्यात मग्न होऊन दर्यापूर तालुक्यातील माहुली (धांडे) येथील गाडगेबाबा गोरक्षण संस्था स्थळावर कार्य करणारे संस्थेचे संस्थापक संचालक प्रा. गजानन रामकृष्ण भारसाकळे यांच्या नावावर अभिनव व समाजोपयोगी संशोधन कार्याची नोंद झाली आहे.प्रा भारसाकळे यांनी अभिमानास्पद आणि दुर्मिळ अशी उल्लेखनीय कामागिरी साध्य केली असून भारत सरकारच्या कॉफीराईट कार्यालयाकडून एकाच वेळी तीन कॉपीटाइट्स मिळविणारे ते एकमेव शिक्षक ठरले आहेत.

त्यांच्या संशोधनात मंदिरातील पुष्पकचरा व गोमूत्र/गोमयाच्या वापरातून जैवविघटनक्षम खडू व नैसर्गिक रांगोळी रंग निर्मिती,गोमयाचा



उपयोग जैवऊर्जा निर्मिती व शाश्वत ग्रामीण विकासासाठी एकत्रितपणे करण्याची पद्धत,जैवऊर्जा वाढ व सेंद्रिय खते निर्मितीद्वारे ग्रामीण विकासाला चालना देणारी शाश्वत प्रक्रिया या तीन संशोधनांचा समावेश आहे.त्यांचे संशोधन पर्यावरणपूरक विकास, ग्रामीण भागातील स्वावलंबन आणि 'वेस्ट टू वेल्थ' संकल्पनेला चालना देणारे आहे. भारत सरकारकडून तीन कॉपीराइट्स मिळवणे अत्यंत कठीण असतांना प्रा. भारसाकळे यांनी एकाचवेळी हे यश संपादन करून संशोधन कार्यासाठी एक अद्वितीय उदाहरण सुद्धा सिद्ध केलेले आहे.त्यांची ही कामगिरी



कौतुकापलीकडीलअसून भारत कृषक समाजाचो संस्थापक अध्यक्ष कृषीरत्न तथा शिक्षण महार्षि डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचा गौरव वाढवणारी आणि शैक्षणिक जगतासाठी प्रेरणादायी ठरणारी आहे.प्रा भारसाकळे हे बाभूळगांव-अकोला येथील अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयात सिव्हील इंजिनिअरिंग विभागाचे प्राध्यापक असून आपल्या अभियांत्रिकी ज्ञानाचा व गोरक्षण स्थळावरील गोसेवेचा सुरेख संगम साधून हे या यशाबद्दल चौफेर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रामगीर महाराज पुण्यतिथी महोत्सव

**अंजनगाव बारी**-श्री समर्थ रामगिर महाराज देवस्थान येथे श्री समर्थ रामगिर महाराज पुण्यतिथी महोत्सव ६ ते १३ डिसेंबर पर्यंत आयोजित करण्यात येणार आहे. ६ रोजी सकाळी ६ ते ८ काकडा आरती, वारकरी भजन मंडळ व अ.भा. गुरुदेव या मंडळ,सकाळी १० ते १२ व दुपारी २ ते ५ 'श्रीमद भागवत कथा' प्रवचन प्रवचनकार मुकुंद महाराज खाडे, मु. पो. शिरजगांव मोझरी यांच्या हस्ते होणार आहे. सायंकाळी ७ ते ८ सामुदायिक प्रार्थना अ.भा. गुरुदेव सेवा मंडळ, अंजनगाव बारी करणार असून दररोज 'हरिपाठ' वारकरी भजन मंडळ व अ.भा.गुरुदेव सेवा मंडळ, अंजनगाव बारी करणार आहे. ७ रात्री ९ ते १२ खंजरी भजन' खटेश्वर भजन मंडळ ,अंजनगांव बारी तसेच ८ रोजीही अच्युत भजनी मंडळ,खंजेरी भजन आयोजित करणार आहे.९ रोजी सकाळी ५ ते ६ 'मार्गशीर्ष कृष्ण पंचमी तिर्थस्थापना' रामगीर महाराजांचा अभिषेक हस्ते मठाधिपती प्रसन्नगीरी गुरु कैलासगीर महाराज यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यानंतर रात्री ९ ते १२ लहानुजी महाराज भजनी मंडळ, शिवशक्ती नगर, अमरावती भजन१० रात्री ९ ते १२ मोतीशेष भजनी मंडळ, अंजनगाव बारी तसेच ११ रात्री ९ ते १२ गुरुदेव सेवा मंडळ,भजन आयोजन करण्यात येणार आहे. १२ सकाळी ९ ते १२ श्रीमद भागवत कथा सांगता' तसेच लगेचच दुपारी १२ ते २ महाप्रसाद' वाईवाले यांच्या हस्ते उद्धवराव सितारामजी करणार



आहे. त्यानंतर दुपारी २ ते ५ ग्रंथाची शोभायात्रा व गावातील भव्य पालखी मिरवणूक निघेल. रात्री ९ ते १० श्री समर्थ रामगिर महाराज चरित्र वाचन पुंडालीक तुळशीराम न्यायखोरे अजनगांव बारी यांच्या हस्ते होणार असून रात्री १० ते १२ पर्यंत महिला भजन मंडळ, अंजनगाव बारी 'भजन' ऐकायला मिळणार आहे.१३ रोजी सकाळी ७ ते ८ ग्रामस्वच्छता,प्रभात फेरी त्यानंतर सकाळी १० ते १ वाजेपर्यंत गोपालकाला किर्तन, किर्तनकार ह.भ.प. धनश्याम महाराज तायवाडे मु.पो.अंदोरी यांच्या हस्ते होणार आहे तसेच दुपारी १ ते ५ महाप्रसाद आयोजन करण्यात येणार आहे. रात्री ८ ते १० वाजेपर्यंत 'भक्ती संगीत' लोकजागर कार्यक्रम सादर करते प्रमोद पोकळे ( दुरदर्शन व आकाशवाणी कलावंत ) श्री गुरुदेव सेवा मंडळ बडनेरा व सहकारी करणार आहे.तसेच मध्यरात्री चंद्र आगमनानंतर फुटणारी 'दहिहंडी किर्तन' किर्तनकार ह.भ.प.तुळशिराम महाराज सावरकर, काकड शिवणी, ता.कारंजा, जि.वाशिम यांच्या हस्ते होणार आहे.

# झेनिथ हॉस्पिटलमध्ये मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध

**अमरावती/का.प्र.**
झेनिथ हॉस्पिटल, अमरावती येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CM Relief Fund) अंतर्गत अनेक गरजू रुग्णांना उच्च दर्जाचे उपचार सहज उपलब्ध होत आहेत. या निधीमुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सुविधा मिळत आहेत. अलीकडेच झेनिथ हॉस्पिटलमध्ये या निधीच्या सहाय्याने दोन कॉम्प्लेक्स एंजिओप्लास्टी यशस्वीरीत्या पार पडल्या. अशा प्रकारच्या जटिल प्रक्रियांसाठी अनेक महागडी आणि अत्याधुनिक यंत्रणा आवश्यक असतात. ज्यात प्रमुख इंट्राव्हॅस्क्युलर अल्ट्रासाऊंड (IVUS),रोटाब्लेशन तंत्रज्ञान आहेत.


इंट्राव्हॅस्क्युलर अल्ट्रासाऊंड (IVUS) ही एक आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पद्धत असून रक्तवाहिन्यांच्या आतील भागाचे उच्च-resolution प्रतिमांकन करते. यामुळे ब्लॉकेजची गंभीरता, धमन्यांची जाडी, प्लाकची रचना आणि उपचाराची अचूक योजना करण्यास मदत होते. रोटाब्लेशन तंत्रज्ञान हे विशेषतः कॅल्सिफाईड किंवा कठीण ब्लॉकेजमध्ये वापरले जाते. अतिशय वेगाने फिरणाऱ्या मायक्रो-डायमंड ड्रिलच्या साहाय्याने कठीण कॅल्शियम थर भेदून रक्तवाहिन्या पुन्हा उघडण्यास मदत होते, ज्यामुळे स्टेंट दीर्घकाळ टिकावा आणि पुनरावृत्तीची शक्यता कमी व्हावी.

रुग्णालयात विधवा महिलांसाठी,माजी सैनिकांसाठी कार्यरत सैनिकांसाठी OPD सेवांवर विशेष सवलती उपलब्ध आहेत. याशिवाय झेनिथ हॉस्पिटल:बहुतांश विमा कंपन्यांशी संलग्न आहे.महाराष्ट्र पोलीस योजना,ECHS (Ex-servicemen Health Scheme) अंतर्गतही मान्यताप्राप्त असून अशा लाभार्थींना कॅशलेस उपचार सुविधा पुरवली जाते.

झेनिथ हॉस्पिटल हे अमरावतीतील एकमेव पूर्णतः NABH-De?क्रेडिटेड मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल असून रुग्णांसाठी सुरक्षित, शास्त्रीय आणि उच्च गुणवत्ता उपचार देण्यास कटिबद्ध आहे. रुग्णालयात सर्व प्रकारच्या आधुनिक हृदयविकार उपचारांची सुविधा उपलब्ध असून त्यात कार्डियाक एंजिओप्लास्टी, TAVR (Transcatheter Aortic Valve Replacement),बालरुग्णांतील congenital defects mee"er device closure,इमर्जन्सी व प्रगत इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजी यांचा समावेश आहे. झेनिथ हॉस्पिटलचे इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. नीरज राघानी हे शहरातील कार्यासोबतच श्री. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातही (PDMMC) गरीब आणि बालरुग्णांसाठी congenital heart disease device closure सेवा नि:शुल्क किंवा कमी खर्चात पुरवत आहेत, जे समाजसेवेचा महत्त्वाचा भाग आहे.या उपक्रमामुळे अत्याधुनिक वैद्यकीय उपचार आता अधिक सुलभ झाले असून, योग्य उपचार प्रत्येक गरजू रुग्णापर्यंत पोहोचवण्याच्या दिशेने झेनिथ हॉस्पिटलने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.

# विद्यापीठाला राष्ट्रीय एकात्मता शिबिराकरीता महाराष्ट्र, गोवा राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान

**अमरावती/का.प्र.**
भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयामार्फत दि. २५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत एस.एस.जैन सुबोध पी.जी कॉलेज, रामबाग सर्कल, जयपूर, राजस्थान येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय 'राष्ट्रीय एकात्मता शिबीर' होत आहे. राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृध्दींगत व्हावी, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभक्तीचे संस्कार रुजविल्या जावे, या हेतुने सदर शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन देशभरातील ११ राज्यांचे स्वयंसेवक सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे या शिबीराकरिता महाराष्ट्र व गोवा राज्याचे प्रतिनिधित्व करण्याचा



बहुमान एकमेव संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला प्राप्त झाला आहे.

चमूंमध्ये प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेराचा रोहन वानखडे, जी, एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांवचा हिमांशू राठी, गुलाब नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसदचा एकनाथ काळे, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचा कृष्णा घरडीनकर, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावतीचा कुणाल इंगळे, श्री. वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणीची प्रियंका म्हस्के, श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोटची विजया अस्वार, श्री. शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखलीची वैभवी मोरगंजे, श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिमची वैष्णवी पानझडे व तक्षशिला इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, दारापुरची संस्कृती खरडे यांचा समावेश आहे. कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. निलेश कडू यांच्या मार्गदर्शनात श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या रासेयो महिला कार्यक्रम अधिकरी डॉ. हर्षाली वानखडे दहा विद्यार्थ्यांची चमू घेऊन चमू व्यवस्थापक म्हणून महाराष्ट्र व गोव्याचे प्रतिनिधित्व करण्याकरीता जयपूरला रवाना होणार आहे.

## आंतर विद्यापीठ हॉकी स्पर्धेकरिता संघ घोषित

**अमरावती**-सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथे २६ ते ३० डिसेंबर, २०२५ दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हॉकी (महिला) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूंमध्ये कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबची हर्षदा चव्हाण, खुशी ठवकर, सोनल केरम व साक्षी राऊत, श्रीमती नानकीबाई वाधवाणी महाविद्यालय, यवतमाळची रियानी गाडेकर, आचल अवधुत, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळची गायत्री पुरी, सुहानी चाणेकर, सानिका भारणे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची भैरवी मोहुर्ले, मोनिका गेडाम, अनुपम सुरीन, प्रग्या सुनवार, तृषा मुल्लेवार व वृषाली हिंगे, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची गायत्री अंभोरे, राजश्री शाहु विज्ञान महाविद्यालय, चांदुररेल्वेची प्रतिक्षा पाटणे, सानिया सदफ, भक्ती सूर्यवंशी व कल्याणी कलावते, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीची भक्ती चिकटे, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोलाची सलोनी अग्रवाल व श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीची तन्वी भगत हिचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे दि. १४ ते २३ डिसेंबर दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# बलात्काराविरुद्ध जातीय संघटनांचे मोर्चे



काही वर्षांपूर्वी एखाद्या महिला मुलीवर बलात्कार झाला की समाजातील सर्व लोक एकत्र येऊन एका सुरात अशा घटनांविरुद्ध निषेध मोर्चा काढत असत. पण अलीकडे असे निदर्शनास येत आहे की, ज्या महिला मुलीवर बलात्कार होतो फक्त तिच्याच जातीचे लोक आणि त्यांच्या जातीय संघटना अशा घटनांविरुद्ध मोर्चे काढताना दिसतात. दुसऱ्या जातीचे मुकदर्शक होऊन हे मोर्चे बघत बसतात. आपल्या जातीची महिला किंवा मुलगी नाही ना मग गप्प बसा अशी भावना त्यामागे असते. त्याचप्रमाणे बलात्कारी ज्या जातीचा असेल त्याच्या जातीचे त्या बलात्कारी नराधमाला एकतर पाठीशी घालण्याचा प्रयत्न करतात किंवा मूग गिळून गप्प तरी बसतात. ह्याचाच अर्थ असा की,बलात्कारात सुद्धा आता जात पाहिली जाते. बलात्कारात जात शोधणाऱ्या ह्या गाढवांना एवढे कळत नसेल का की बलात्कारासारखे निर्घृण कृत्य जात पाहून होत नाहीत. ती एक विकृती असते आणि ती कोणत्याही जातीच्या महिला मुलीसोबत कोणत्याही जातीचा नराधम करू शकतो ?

मागे कोपर्डीच्या एका मराठा जातीच्या मुलीसोबत एका नराधमाने बलात्कार करून तिची हत्या केली तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रातून फक्त मराठा समाजाचा विशाल मोर्चा निघाला होता. अन्य जातीचे या मोर्चापासून दूरच होते. अलीकडे मालेगाव डोंगराळे गावातील यज्ञा दुसाने नामक ३ वर्षांच्या चिमुकल्या बालिकेवर नराधमाने बलात्कार करून तिची हत्या केली. त्या नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी ह्या मागणीसाठी विविध शहरांत सोनार समाजातील लोकांनी मोर्चे काढले. पण ह्या मोर्च्यांकडे अन्य जातीच्या लोकांनी फक्त बघ्याची भूमिका घेतली. असा प्रकार प्रत्येक जातीच्या बलात्कारपीडितेच्या वेळेस घडतो. बलात्कार करणाऱ्या नराधमाची तो गुन्हा करताना वासनेने वखवखलेला विकृत मनोवृत्तीचा पुरुष ही एकच जात असते. पण त्यात आपली सामाजिक जात शोधतात आणि पीडिता आपल्या जातीची नसेल तर त्या घटनेकडे सपशेल दुर्लक्ष करतात. त्यामुळे त्या घटनेचे गांभीर्य संपूर्ण स्त्रीजातीविषयक न राहता फक्त स्वजातीपुरते केंद्रित आणि मर्यादित होते. एखाद्या दलित मुलीवर बलात्कार झाला की तिची जात शोधून ती 'दलित' होती म्हणून तिच्यावर बलात्कार झाला असे चित्र रंगविण्यात येते.

प्रत्येक जातीच्या जातीय संघटना आहेत. बलात्कार कोणत्याही जातीच्या महिला मुलींवर होवोत, प्रत्येक जातीच्या संघटनांनी एकत्र येत ह्याविरुद्ध एकजुटीने आवाज उठवला पाहिजे. अमुक बलात्कारित पीडीता आपल्या जातीची नाही म्हणून तिकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. किंवा बलात्कारी आपल्या जातीचा म्हणून त्याला पाठीशी घालणे किंवा त्याच्याविरुद्ध सोईस्कर मौन बाळगणे सुद्धा चुकीचे आहे. त्यामुळेच पीडितेच्या जातीय संघटनेने आवाहन केल्यास अन्य जातींच्या संघटनांनीही त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन त्यांच्या मदतीला धावून गेले पाहिजे. त्यांना शक्य होईल ती आणि शक्य असेल तेवढी सांख्यिक, आर्थिक, प्रशासनिक आणि न्यायिक मदत केली पाहिजे. एवढेच नव्हे तर ह्या सर्वजातीय संघटनांनी एकत्र येत सोशल मीडियावर अश्लीलतेचा जो नंगा नाच सुरू आहे त्यावर बंदी आणण्याची एकमुखी मागणी सरकारजवळ केली पाहिजे. सतत पॉर्न साईट्स बघितल्याने कामुकता बळावून बलात्काराची पृष्ठभूमी तयार होत असते. त्यामुळे भारतात चालणाऱ्या ह्या पॉर्न साईट्सवर कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी सरकारजवळ केली पाहिजे. त्याशिवाय बलात्काराच्या घटना बंद होणार नाहीत. मुलींना सुद्धा बॉयफ्रेंडपासून दूर राहण्याचे घरातच संस्कार करण्यात आले पाहिजे. मुलींना अंगप्रदर्शन करणारी वेशभूषा करण्यापासून परावृत्त केले पाहिजे. मुलींना रात्रीबेरात्री मुलांसोबत एकटी बाहेर फिरण्याची बंदी घातली पाहिजे. मुलांवरही पालकांनी वचक ठेवणे आवश्यक आहे. मुलांना मुलींची छेडछाड करण्यापासून कठोरपणे दमदाटी करणे, मुलींना एकटी मोटरसायकलवर बसवून फिरायला नेणे, मुलींशी सातत्याने फोनवर बोलणे, सोशल मीडियावर सतत चॅटिंग करणे ह्यावर पालकांनी कठोर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. मुलगा ऐकत नसेल तर त्याला प्रसंगी चांगला चोप देण्यासही पालकांनी मागेपुढे पाहू नये.

जातीय संघटनांनी आपापल्या जातीच्या लोकांमध्ये ही जागृती आणण्याचे काम युद्धस्तरावर सुरू केले पाहिजे. जो जातीबांधव ह्या सुधारणांना विरोध करील त्याच्याशी जातीसंबंध न ठेवण्याचे आवाहन संघटनांनी करावे. ही सूचना भलेही बेकायदेशीर वाटत असली तरी सरकार, प्रशासन आणि न्याययंत्रणा जर महिला, मुली, बालिकांवरील बलात्कार रोखू शकत नसतील तर पालकांनीच, समाजानेच, जातीय संघटनांनीच पुढाकार घेऊन वरील उपाययोजना तातडीने अंमलात आणणे गरजेचे आहे. निव्वळ जातीय मोर्चे काढून काही होणारे नाही. फार फार तर गुन्हेगाराला शासन होईल. पण त्यामुळे बलात्काराच्या घटना थांबतीलच असे नाही. शिवाय जातीय मोर्च्यांमध्ये ज्या जाती अल्पसंख्य असतात त्यांचा आवाज पोलिस, प्रशासन, न्याययंत्रणा ह्यांच्यापर्यंत पोहोचतच नाही. अशा अत्याचारांविरुद्ध बहुसंख्य जनतेचा आणि सर्वजातीय समाजाचा एकत्र आवाज बुलंद झाला पाहिजे. बलात्कार ही मानवाला पशुतेच्या पातळीवर नेणारी एक विकृती आहे आणि त्याकडे त्याच दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. ही विकृती विज्ञानवादाने नव्हे तर संस्कृतीच्या पुनरोत्थानानेच नष्ट करता येईल. ह्या विकृतीविरुद्ध जात आणि पक्ष न बघता ही विकृती समाजातून नष्ट करण्यासाठी संपूर्ण समाजानेच एकजूट होत प्रयत्न केले पाहिजेत.

● **अतुल कावळे**
हुडकेश्वर, नागपूर
मो. क्र.९७३०५३५१९६
E-mail: atulskawale@yahoo.co.in

**महापरिनिर्वाण दिनानिमित**

# डॉ बाबासाहेब आंबेडकर समतेचे रसायन



बाबासाहेब भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत हे तर सर्वश्रृत आहेच पण त्यांनी आपल्या जीवनात सर्वात जास्त जर महत्त्व कशाला दिले असेल तर ते आहे समताधिष्ठित समाज रचनेला. समता जो पर्यंत नाही तोपर्यंत समानतेची व अधिकाराची संधी नाही हे तितकेच खरे आहे. ही बाब त्यांना अस्खलित ज्ञात होती. ते स्वतः एक सर्वांगी विचारवंत व तत्वज्ञ होते. जो व्यक्ती विचारवंत व तत्वज्ञ असतो तो व्यक्ती समतोल विचार करतो. अश्या व्यक्तीची विचारधारा समाजवादी व भेदाभेदाच्या तटभिंती तोडणारी असते. आम्हा भारतवासीयांना अभिमान आहे की बाबासाहेबासारख्या महापुरुषाने समतेचे तत्व संविधानातून आपल्याला दिले. बाबासाहेब ज्या समाजरचनेत वावरले त्यावेळी सार्वजनिक समाज रचनेत विषमता व भेदाभेदाच्या तटभिंती होत्या. हेच शल्य त्यांच्या मनात होते म्हणून भारताची समाज व्यवस्था समताधिष्ठित करण्यासाठी त्यांनी सर्व समाजव्यवस्थेचा सुक्ष्म व सखोल अभ्यास करून निष्कर्ष काढले. समतेला कायदेशीर अधिष्ठान त्यांनी मिळवून दिले म्हणून आजच्या समाजव्यवस्थेत समान अधिकार व समान न्याय अस्तित्वात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आणि त्यांचा महापरिनिर्वाण दिन ह्या दोन्ही गोष्टी आपल्या देशाची अस्मिता आहे कारण त्यांनी आपल्या जीवनात जे लोककल्याणाचे व देशहिताचे कार्य केले त्याचे स्मरण या दोन्ही दिवसाच्या निमित्याने होते. त्यांना देश घडवायचा होता पण त्या जडण-घडणीला कायदेशीर व सैंवेधानिक बैठक द्यायची होती आणि त्यांनी ती दिली सुध्दा. आज संविधान लागू होऊन भारताला तब्बल पंच्याहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत. एवढा प्रदिर्घ काळ उलटूनही बाबासाहेबांनी तयार केलेले कायदे कालबाह्य झालेले नाहीत हिच त्यांच्या विद्वत्तेची खरीखुरी पावती आहे. बाबासाहेबांच्या संविधानाचा जर संपूर्ण अभ्यास केला तर त्यातील एक एक प्रकरण, एक एक कलम फक्त आणि फक्त मानवहिताचे व प्रत्येक नागरिकाला अधिकारसंपन्न बनवणारे आहे. आपल्या देशाचा प्रत्येक नागरिक त्यांनी केवळ अधिकारसंपन्नच बनविला नाही तर त्याला सर्वतोपरी हक्क देऊन सक्षम केला आहे.

बाबासाहेबांचे व्यक्तित्व इतके श्रेष्ठ आहे की भारताच्या बाहेरील देशातही त्यांचे स्मारक आहे. ते केवळ भारतातीलच विद्वान नव्हते तर जागतिक पातळीवरील विद्वान होते. बाबासाहेब एकमेवाद्वितीय होते ज्यांनी आपल्या देशाचे सर्वांग, परिपूर्ण संविधान तयार होण्यासाठी जगातील १६५ संविधानाचा तुलनात्मक अभ्यास केला होता. आपले संपूर्ण बळ, शक्ती, परिश्रम व आपला वेळ आपल्या देशाच्या कल्याणासाठी खर्च केला व त्यातून बलाढ्य वेलफेअर स्टेट म्हणजे कल्याणकारी राज्य स्थापन केले.

देशाच्या अर्थव्यवस्थेचा त्यांचा मार्गदर्शक प्रबंध म्हणजे दि प्राब्लेम ऑफ रुपया हा सुक्ष्म अभ्यासकीय प्रबंध आज देश विदेशाच्या अर्थव्यवस्थेला मार्गदर्शक ठरला आहे. ते आंतरराष्ट्रीय पातळीवरील विद्वान, अभ्यासक व चिंतक होते. त्यांची स्मृती सर्वांना प्रेरणादायी ठरणारी आहे.देशहिताला बाधा पोहचवणा-या असामाजिक घटना आपल्या देशात कधीही घडता कामा नये असे त्यांचे रोखठोक प्रतिपादन होते. देशाचे सार्वभौमत्व केवळ लष्करी बळावर न होता सलोखा, बंधुता व समाजातील राष्ट्रीय एकात्मता या मुद्यावर टिकले पाहिजे असे बाबासाहेब नेहमी म्हणायचे. त्यांनी प्रत्येक विषयाचा अभ्यास करुन त्यावर आपले अनमोल मत व्यक्त केले आहे जे आजच्या शिक्षण पध्दतीला समृध्द करणारे आहे.त्यांना प्रज्ञासूर्य म्हटले जाते. कारण नभातील सूर्य जसा सहस्त्रावधी किरणांनी संपूर्ण सृष्टी प्रकाशमय करतो अगदी त्याचप्रमाणे त्यांच्या ज्ञानाची किरणे अज्ञानाचा अंधःकार दूर सारुन ज्ञानाचा प्रकाश देतो. असे बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व आपल्यातून आज निघून गेले आहे. त्यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित या महामानव भारतरत्न महापुरुषाला आदरपुर्वक आदरांजली!



● **रजनी आमले**
भूमिपुत्र कॉलना,अमरावती
मो.९४२०१२५६५२

## भविष्यात पैशाचे महत्त्व...

एआयच्या विस्तारामुळे एकीकडे नोक-यांवर टांगती तलवार उपस्थित झाली आहे तर दुसरीकडे एआयच्या वाढत्या जाळ्यामुळे भविष्यात नोकरी गरजेपेक्षा छंद म्हणून केली जाईल. लोक फक्त आवड म्हणून नोकरी करतील. हा बदल समाजाच्या रचनेत मूलभूतपणे बदल करेल आणि लोकांच्या भूमिका पूर्णपणे बदलेल. या बाबतीत जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती इलॉन मस्क यांनी धक्कादायक भविष्यवाणी करत एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्सद्वारे पूर्णपणे बदललेल्या भविष्यातील जगाचे व्यापक दृष्टिकोन सादर केले.

जग जसे पुढे चालले आहे, तसे जगाचे भविष्य एआयद्वारे ठरवले जाईल आणि त्या जगात 'पैसा' नाहीसा होईल. नोक-या पर्यायी छंद बनतील म्हणजेच लोकांना जीवन जगण्यासाठी काम करण्याची आवश्यकता राहणार नाही आणि गरिबी अस्तित्वात राहणार नाही. एआय आणि ह्युमनॉइड रोबोट्समध्ये पहिल्यांदाच ख-या अर्थाने गरिबी दूर करण्याची क्षमता आहे. कारण जेव्हा ह्युमनॉइड रोबोट्स उत्पादन स्वस्त आणि जलद करतील, तेव्हा मूलभूत वस्तू इतक्या परवडणा-या होतील की आर्थिक संकट येणार नाही. तसेच लोक कोणतेही उत्पादन आणि सेवा सहजपणे मिळवू शकतील. टेस्ला ही ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करणारी एकमेव कंपनी राहणार नाही. अनेक कंपन्या ह्युमनॉइड रोबोट्स विकसित करतील आणि तंत्रज्ञान जगाला श्रीमंत करेल. एआय आणि रोबोटिक्स तंत्रज्ञान जगातील प्रत्येकाला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा एकमेव मार्ग आहे.

**-सुनील शिरपुरे**
कमळवेल्ली,यवतमाळ
मो.-७०५७१८५४७९

# जंगल नाही, तर बिबट्या गावात!

मानवी-वन्यजीव संघर्षाची कहाणी निसर्गाने निर्माण केलेला प्रत्येक जीव त्याच्या विशिष्ट अधिवासात (Habitat) सुरक्षित असतो. बिबट्या (Leopard) किंवा वाघ (Tigê) यांसारख्या हिंस्त्र वन्यप्राण्यांचे नैसर्गिक निवासस्थान म्हणजे घनदाट जंगल. पण आजकाल महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये, विशेषतः जंगल परिसराच्या जवळच्या वस्त्यांमध्ये, बिबट्याचे दर्शन होणे ही दुर्मिळ गोष्ट राहिली नाही. 'जंगल नसेल, तर बिबट्या गावात येणार' हे कटू सत्य आता आपले वास्तव बनले आहे.

बिबट्या गावात येण्याची कारणे काय?बिबट्या स्वभावाने लाजाळू असतो आणि शक्यतो माणसांपासून दूर राहतो. पण जेव्हा त्याला नाईलाजाने मानवी वस्तीत यावे लागते, तेव्हा त्याची दोन प्रमुख कारणे आहेत:

जंगल हे बिबट्याचे घर आहे. वाढती लोकसंख्या, शेतीसाठी नवीन जागा मिळवणे, महामार्ग बांधणे आणि औद्योगिक विकासामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड होत आहे. बिबट्याचे क्षेत्रफळ लहान होते आणि त्याच्या जगण्यासाठी आवश्यक असलेली जागा कमी होते. त्याला नवीन, सुरक्षित ठिकाण शोधावे लागते आणि या शोधात तो थेट मानवी वस्तीजवळ येऊन पोहोचतो.

जंगलात बिबट्याचे मुख्य खाद्य म्हणजे हरिण, ससे, रानडुक्कर आणि इतर लहान वन्यजीव. जेव्हा जंगल तोडले जाते, तेव्हा केवळ बिबट्याचेच नाही, तर त्याच्या भक्ष्याचेही घर नष्ट होते. यामुळे जंगलात बिबट्याला नैसर्गिक शिकार मिळणे कठीण होते.

भुकेमुळे बिबट्या गावाकडे वळतो. त्याला मानवी वस्तीत सहज शिकार मिळते.उदा. रस्त्यांवर फिरणारी भटकी कुत्री, गोठ्यात बांधलेली लहान वासरे किंवा शेळ्या. ही शिकार जंगलातील शिकारीपेक्षा सोपी असते.यामुळे मानवी आणि वन्यजीव यांच्यात थेट संघर्ष सुरू होतो. या संघर्षाचे गंभीर परिणाम खालीलप्रमाणे दिसतात:

माणसांचे नुकसान: बिबट्याच्या हल्ल्याची भीती वाढते. लहान मुले, स्त्रिया आणि शेतीत काम करणारे लोक असुरक्षित होतात. काही दुर्दैवी घटनांमध्ये माणसे जखमी होतात किंवा जीवही गमावतात.पाळीव जनावरांचे नुकसान: शेतकऱ्यांचे पशुधन बिबट्याचे शिकार बनते, ज्यामुळे मोठे आर्थिक नुकसान होते.

**संघर्ष टाळण्यासाठी** -या समस्येवर कायमस्वरूपी उपाय बिबट्याला पकडून दूर सोडणे नाही, तर त्याचे नैसर्गिक घर सुरक्षित ठेवणे हा आहे. जंगल संवर्धन: सर्वात महत्त्वाचा उपाय म्हणजे जंगलतोड पूर्णपणे थांबवणे आणि पुनर्वनीकरण (Afforestation) करणे. बफर झोन (Buffer Zone): वनक्षेत्र आणि मानवी वस्ती यांच्यामध्ये नैसर्गिक बफर झोन तयार करणे, जेणेकरून वन्यप्राणी गावांपर्यंत पोहोचणार नाहीत. कचरा व्यवस्थापन: गावात किंवा वस्तीजवळ कचरा उघड्यावर फेकू नये. कारण कचऱ्यामुळे भटकी कुत्री वाढतात, जी बिबट्याचे सहज शिकार बनतात आणि त्यामुळे बिबट्या वस्तीकडे आकर्षित होतो. जनजागृती: रात्रीच्या



वेळी घराबाहेर न पडणे, मुलांना एकटे न सोडणे आणि बिबट्याचे दर्शन झाल्यास वन विभागाला त्वरित कळवणे, यांसारख्या गोष्टींची जनजागृती आवश्यक आहे.

बिबट्याचा गावात येणे हा निसर्गाचा इशारा आहे की आपण त्याच्या नैसर्गिक नियमांचे उल्लंघन करत आहोत. जोपर्यंत आपण जंगलांचे संरक्षण करत नाही आणि वन्यजीवांना त्यांच्या घरात सुरक्षित वाटेल अशी परिस्थिती निर्माण करत नाही, तोपर्यंत हा संघर्ष थांबणार नाही. आपल्या भविष्यासाठी आणि या सुंदर वन्यजीवांच्या अस्तित्वासाठी जंगल संवर्धन करणे ही काळाची गरज आहे.

● **विरेंद्र सोनवणे**
मो. ८८८८२४८८८३

# प्रेमाचा माईल स्टोन-'तेरे इश्क में'

गुलशन कुमार, टी-सीरीज आणि कलर येलो प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली बनलेला 'तेरे इश्क में' आनंद एल. राय दिग्दर्शित तर हिमांशू शर्मा आणि नीरज यादव लिखित ए.आर. रहमान यांचे संगीत इरशाद कामिल यांची गाणी असलेला हा चित्रपट हिंदी, तमिळ आणि तेलुगू भाषांमध्ये जगभरात रिलीज झाला आहे. 'तेरे इश्क में' हा चित्रपट प्रेमकथा नाही. तो प्रेमाची शक्ती, त्यातील जादू आणि त्यातून उभ्या राहणाऱ्या अव्यवस्थित भावनांविषयीचा भावनिक प्रयोग आहे. 'कदाचीत खरे आणि पवित्र प्रेम करणारी ही शेवटची पिढी असेल' हा चित्रपटातील संवादचे त्याचा आत्मा आहे.

कारण कालपरत्वे प्रेमाचे पॅरॅमिटर बदलत आहेत. असे वातावरण सध्या समाजात दिसत आहे.फार कमी चित्रपटात तु आय.ए.एस. (IAS) हो म्हणजे कलेक्टर हो तर मी लग्न करेल अशी अट घातलेली आपल्याला दिसेल मात्र प्रेमात अशी शक्ती आहे की, आपण ठरवले की काहीही करु शकतो. मग विघातकचे का? करायचे त्यापेक्षा विधायक कार्य कधीही चांगले नेमके हेच आव्हान नायक घेतो आणी तिसऱ्याच प्रयत्नात तो यशस्वी होतो. अभ्यासाचा सूतराम देखील संबंध नसतांना प्रेमासाठी नायक पूर्णपणे बदलतो रात्रंदिवस अभ्यास करतो आणी यश संपादन करतो. केवळ प्रेमासाठी..

हा आजचा नायक आहे. तो अश्रू गाळत नाही किंवा 'आग का दरिया है। डुब के जाना है।'वगैरे न म्हणता अत्यंत महत्वाची समजली जाणारी परीक्षा पास होतो. हेचे या सिनेमा चे वैशिष्ट्य आहे असे मी मानतो आणी आजच्या युवा पिढीसमोर हा चित्रपट एक आदर्श निर्माण करतो. 'तेरे इश्क में' हा फक्त प्रेमाचा नव्हे तर मनाच्या गाठी आणि नात्यातील गुंतागुंतींचा शोध घेणारा चित्रपट आहे. प्रेमकहाणी प्रेक्षकांना प्रेमाच्या जखमांपासून ते त्याच्या वेडापर्यंतची सफर घडवते.

'प्यार झुकता नहीं' सिनेमा मध्ये मिथुन ला एक खाली सुटकेस दिली जाते आणी ती भरुन पैसे कमव असा टास्क दिल्या जातो. मात्र जातांना तो बॅग भरुन पैसे घेवून गेला असे दाखवले जाते या चित्रपटामध्ये मात्र आयुष्याला कलाटणी देणारे टास्क दिल्या जाते. मी या गल ने या सिनेमा कडे बघतो. बऱ्याच तरुणांना वाटते युपीएससी हे क्षेत्र आपले नाहीचे आपल्याला झेपणार नाही म्हणून बरेचे विद्यार्थी या क्षेत्राकडे वळतचे नाहीत. परंतु शेवटी किंग खान चा डॉयलॉग आहेच 'किसी भी चीज को




अगर...'समोर तुम्हाला माहीतच आहे.

ध्येय मोठे ठेवले की ते मिळतेचे आणी समजा नाही मिळाले तर कुठलीही स्पर्धा परीक्षा तर आपण नक्कीचे पास होतो. म्हणजे झाला तर फायदाच होतो.या सिनेमा मध्ये नायिका हि पि.एच.डी. सारखी सर्वोच्च डिग्री घेण्याचा प्रयत्न करत आहे.

दिग्दर्शकाने कथानक आणी प्रसंग फार वास्तव दाखवले आहेत. साऊथ दिल्ली छ..नॉर्थ दिल्ली हा भेद दाखवला आहे. गरीब श्रीमंत दरी जी कधीही न मिटणारी आहे ती दाखवली आहे. लेखक हिमांशू शर्मा यांनी नायक-नायीका या दोघांच्या व्यक्तिमत्वाचा, त्यांच्या भोवतालच्या सामाजिक चौकटींचा आणि दोघांच्या सामाजिक वर्गांमधील दरीचा नाजूकपणे वेध घेतला आहे. मुक्तीसाठी वर्गभेद ओलांडणे कठीण असते, तर शंकरसाठी ती दरी पार करणे म्हणजे त्याच्या रागाला योग्य दिशा देण्याचा एक मार्ग ठरतो.नायीका हे सगळे समजते तिच्या मनाला वाटते परंतु तिच्या मनावर मेंदू मात करतो आणी ती लग्नाचा निर्णय घेते.

धनुषने साकारलेला शंकर हा चित्रपटाचा आत्मा आहे. त्याने प्रेमात हरवलेला, आतून तुटलेला पण बाहेरून कठोर दिसणारा मुलगा इतक्या भावनिक ताकदीने साकारला आहे की प्रेक्षक त्याच्या विचारांशी सहमत होतो.माणूस कितीही हिंसक असला तरी तो बदलू शकतो. माणसाच्या हिंसक स्वभावावरही प्रेमाने मात करता येऊ शकते.तुटलेले मन, स्वप्नांची राख आणि नव्या भावनांचा उदय हे सगळं चित्रपटात पाहायला मिळते. त्यामुळे हा चित्रपट एक भावनिक आणि गहन वळण घेतो.

'सिनेमॅटिक लिबर्टी'चा विचार केला,तरीही 'उत्कट प्रेमकथा' हा प्रकार प्रभावीपणे दिग्दर्शकाने दाखवण्याचा प्रयत्न केला आहे, जो प्रेक्षकांपर्यंत नक्की पोहोचतो. चित्रपटाचा पूर्वार्ध हा खरोखरच प्रेक्षकांना कथानकात गुंतवून ठेवतो. तसा 'उत्कट प्रेमकथा' मांडण्यात आनंद. एल. राय यांचा हातखंडा. 'तनु वेड्स मनु' आणि 'रांझना' नंतर या चित्रपटातही त्यांची जिद्दी, वेड लावणारी प्रेमकथेची छाप उमटलेली दिसते.

मधामधात कथानक एकदम जंप मारते परंतु ते धागे सुजान प्रेक्षक आपोआप जुळवतात किंवा समजुन घेतात. तेवढे माफ दिग्दर्शकाला परंतु सिनेमा माझ्या मते माईल स्टोन आहे..प्रेम सुंदर असते, पण त्याचवेळी ते वेदनादायकही असू शकते हे दाखवणारी ही कथा आजच्या तरुणांच्या हृदयाला भिडेल याबद्दल शंका नाही. ज्यांना इमोशनल लव्ह स्टोरी आवडतात, त्यांच्यासाठी 'तेरे इश्क में' नक्कीच एक पाहण्यासारखा अनुभव आहे.

**- प्रा. राहुल गोवर्धन माहुरे**
शांती नगर, जुने शहर, अकोला
मो.९८२२२७८९२५

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



## जागतिक मृदा दिन विशेष

# ‘शेतातील माती निरोगी राहिली तरच सुदृढ शहरे उभी राहतील’ - कुलगुरू डॉ. गडाख

■ प्रतिनिधी | अकोला ■

***जागतिक स्तरावर मातीचे वाढते ऱ्हास, धूप आणि खालावत चाललेले जमिनीचे आरोग्य हा गंभीर प्रश्न आज जगासमोर उभा ठाकला आहे. त्याचे थेट परिणाम शेती उत्पादन, उद्योगप्रक्रिया, अर्थकारण आणि रोजगारावर जाणवत आहेत, असे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. ‘निरोगी मातीशिवाय सुदृढ शहरे उभी राहू शकत नाहीत,’ असा ठाम संदेश देत त्यांनी ग्रामीण ते शहरी पातळीवर मृदा संवर्धनाची गरज अधोरेखित केली.***



जागतिक मृदा दिनानिमित्त दिलेल्या संदेशात डॉ. गडाख यांनी सांगितले की, भारतात उपलब्ध असलेल्या ३२९ दशलक्ष हेक्टर भूभागापैकी १४१ दशलक्ष हेक्टर जमीन लागवडीखाली असली तरी त्यातील तब्बल १२० दशलक्ष हेक्टर क्षेत्र समस्याग्रस्त आहे. नियोजनाअभावी दरवर्षी ५००० दशलक्ष टनांपेक्षा जास्त माती धूप होत असून हे शेतीसाठी अत्यंत धोकादायक चिन्ह आहे.

मातीचे आरोग्य झपाट्याने खालावत असल्याने तिच्यातील सेंद्रिय कर्ब, सूक्ष्मजीव, संतुलित अन्नद्रव्ये आणि पाणी धारणक्षमता कमी होत चालली आहे. हवामान बदलाचा प्रतिकूल परिणामही जमिनीतील जैविक घटकांवर होत असल्याने सुपीकता धोक्यात आली आहे. ‘मृदा संवर्धनासाठी अत्यंत काटेकोर नियोजन आणि आधुनिक तंत्रज्ञानाची गरज आहे,’ असे डॉ. गडाख यांनी सांगितले. विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा अवलंब—माती परीक्षण, सेंद्रिय निविष्ठा, पीक फेरपालट, जीवाणू खते, ह्युमिक ॲसिड, सूक्ष्म अन्नद्रव्ये, आंतरपिके—यांचा वापर करण्याचे त्यांनी आवाहन केले.

यंदाच्या जागतिक मृदा दिन २०२५ चे घोषवाक्य ‘स्वस्थ शहरासाठी सशक्त माती (पैंतूष्ठ एदग्त दैं पैंतूष्ठ एग्गे)’ असे आहे. शहरांमधील माती बहुधा दुर्लक्षित राहते, मात्र तिचे संवर्धन केल्यास शहरी तापमान नियंत्रण, पाणी शोषण व साठवण, कार्बन साठवण क्षमता आणि नगरी पर्यावरणाचा दर्जा लक्षणीयरीत्या सुधारू शकतो. सिमेंट व कॉंक्रिटमुळे माती झाकली गेल्यास पूर, उष्णता व प्रदूषण वाढण्याचा धोका अधिक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मृदा शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. श्याम जाधव यांनी जागतिक मृदा दिनाचा इतिहास सांगताना थायलंडचे राजा भूमिबोल अदुल्यादेज यांनी आयुष्यभर मृदा संवर्धनासाठी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस ५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो, असे नमूद केले. त्यांनी मातीच्या आरोग्याशी संबंधित प्रमुख समस्या—सेंद्रिय घटकांचा अभाव, असंतुलित खतांचा वापर, पीक अवशेषांचे जाळण, क्षारीकरण, सिंचनाच्या पाण्याची गुणवत्ता—यावरही प्रकाश टाकला.

डॉ. पं. कृ. वि., अकोला यांच्या ३७ वर्षांच्या संशोधनाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, रासायनिक व सेंद्रिय खतांचा समन्वित वापर हा सर्वात प्रभावी मार्ग असून तो मातीचे आरोग्य, सेंद्रिय कर्ब आणि दीर्घकालीन उत्पादनक्षमतेसाठी अत्यंत उपयुक्त आढळला आहे. शेतकरी व नागरिकांसाठी संदेश देताना डॉ. गडाख म्हणाले, ‘माती ही शेती आणि पर्यावरणाची खरी संपत्ती आहे. माती निरोगी ठेवल्यास उत्पादन, पर्यावरण आणि शहरे—तिन्ही शाश्वत होऊ शकतात.’

# खा. अनुप धोत्रे यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची घेतली भेट

■ प्रतिनिधी | अकोला ■

रिसोड–मालेगाव लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनुप धोत्रे व सौभाग्यवती समीक्षाताई धोत्रे यांनी नवी दिल्लीत लोकसभा अध्यक्ष ओम प्रकाश बिर्ला यांची सदिच्छा भेट घेऊन विविध सामाजिक, पारिवारिक तसेच राजकीय घडामोडींवर चर्चा केली. या भेटीवेळी लोकसभा अध्यक्षांनी खासदार धोत्रे यांना मार्गदर्शन करत त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेतली.



खासदार झाल्यानंतर संसदेतील शंभर टक्के उपस्थिती राखणाऱ्या मोजक्या खासदारांमध्ये अनुप धोत्रे यांची गणना होते. विविध विषयांचा सातत्याने अभ्यास, नवीन शिकण्याची वृत्ती तसेच प्रश्नांच्या माध्यमातून लोकप्रतिनिधी म्हणून सक्रिय भूमिका या उपक्रमांची प्रशंसा स्वतः लोकसभा अध्यक्षांनी केली. खासदार धोत्रे यांचे हिंदी व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वही त्यांनी विशेष कौतुकास्पद असल्याचे नमूद केले.

यावेळी अध्यक्ष ओम बिर्ला यांनी माजी केंद्रीय मंत्री आणि माजी खासदार संजय भाऊ धोत्रे यांच्या प्रकृतीची विचारपूस करत त्यांच्या सोबत केलेल्या कामाच्या आठवणींना उजाळा दिला. बिर्ला परिवाराने धोत्रे परिवाराचे आत्मीय स्वागत केले. अकोला लोकसभा मतदारसंघाच्या वतीने खासदार अनुप धोत्रे यांनी लोकसभा अध्यक्षांचे स्वागत करत त्यांच्या अध्यक्षतेत उभी राहिलेल्या नवीन लोकसभा इमारतीचा तसेच नव्या खासदारांना संसदेत मिळणाऱ्या संधींचा उल्लेख केला. यावेळी त्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वपक्षीय स्वीकारले गेलेले नेतृत्व कौतुकास्पद असल्याचेही सांगितले. या सदिच्छा भेटीमुळे दिल्लीच्या राजकीय वर्तुळात अकोल्याचे प्रतिनिधित्व पुन्हा एकदा ठळक झाले आहे.

# ‘ऑपरेशन आशा’ची यशस्वी कामगिरी



## समाजसेवकांनी केला एसपी चांडक यांचा सत्कार

■ प्रतिनिधी | अकोला ■

२१ दिवसांपासून हरवलेल्या १४ वर्षीय ऋषिकेशला सुरक्षित शोधून काढणाऱ्या ‘ऑपरेशन आशा’च्या यशानिमित्त आज पोलिस अधीक्षक अचिंत चांडक यांचा सत्कार करण्यात आला. शहरातील समाजसेवक आणि जनप्रतिनिधींनी एसपी चांडक तसेच त्यांच्या संपूर्ण पथकाचे अभिनंदन केले.

सत्कार करणाऱ्यांमध्ये माजी उपमहापौर रफीक सिद्दीकी, कच्छी मस्जिदचे अध्यक्ष व समाजसेवक जावेद जकरिया, समाजसेवक इरशाद हुसैन, दीपक भाऊ धडशे, रियाशू पहलवान आणि शाहिद सिद्दीकी यांचा समावेश होता. पुष्पगुच्छ देऊन एसपी अर्चित चांडक यांचा गौरव केला.

गणमान्य व्यक्तींनी सांगितले की, कठीण परिस्थिती असूनही अकोला पोलिसांनी चपळाई, निष्ठा आणि समर्पणाने ‘ऑपरेशन आशा’ यशस्वी करून एका कुटुंबाला पुन्हा आनंद दिला. ही कामगिरी पोलिसांची संवेदनशीलता आणि उत्कृष्ट कार्यपद्धतीचे उत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले.

**Change In Name**

I Have Change
My Name From
**SHYAMSINGH KANHAIYASINGH THAKUR**
--TO--
**SHYAM KANHAIYASINGH THAKUR**
PASSPORT NO :- K1732860 My Residential Address is :- Krushnashray - 27 Behind Akashwani Gully No .3 Infront Of Hanuman Mandir, Shastri Nagar Akola 444001

**Change In Name**

I Have Change My Name in My Passport No is :- (H7667203) OLD NAME
**AMIR ALI MOHSIN ALI SIDDIQUI**
--NEW NAME--
**AAMIR ALI MOHSIN ALI SIDDIQUI**
My Residential Address is :- Building No - 1710, Firdous Colony, Lakkad Ganj, Infront of Allah Masjid Akola 444001.

**Change In Name**

I Have Change
My Name From
**NEHA LOKCHAND VALECHHA**
--TO--
**NEHA LOKCHAND VALESHA**
My Residential Address is - Near Jhulelal Temple Gurunanak Nagar, Sindhi Colony Malkapur 443101

**Changed Of Name**

I have changed
my Name from
**MOHAMMAD AMIR MOHAMMAD NASIR**
-- To--
**MOHAMMAD AAMIR MOHAMAMD NASIR**
-Address-
OPPOSITE RAZA MASJID HAJI NAGAR AKOT FAIL AKOLA 444003

**Changed Of Name**

I have changed
my Name from
**SHERKHA**
(PASSPORT NO:- M7512472)
-- To--
**SHER KHAN ABDULLAH KHAN**
-Address-
ZIRA BAVDI ISLAM CHOWK KHADAN 444004

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २०७३/२०२५ — प्रोसेस नं.१८९६९/२०२५
चौ.ता. ०३/०१/२०२५ — दिनांक : १८/११/२०२५

**अर्जदार :** १. उमाबाई समाधान काकडे २. उमेश समाधान काकडे ३. निलेश समाधान काकडे ४. हरिष समाधान काकडे ५. रविकिरण समाधान काकडे सर्व रा. चोहोट्टा बाजार, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : समाधान तुळशीराम काकडे
**पत्ता :-** रा. चोहोट्टा बाजार, ता. अकोट, जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत समाधान तुळशीराम काकडे यांचे दि. १६/०९/२०२५ रोजी चोहोट्टा बाजार, ता. अकोट, जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०३/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/११/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१५१/२०२५ — प्रोसेस नं.१९५७९/२०२५
चौ.ता. ०७/०१/२०२६ — दिनांक : २९/११/२०२५

**अर्जदार :** १. जिजाबाई निवृत्ती इंगोले २. लताबाई सुदेश काशीदे रा. रेल्वे स्टेशन जवळ, हिंगोली, ता. जि. हिंगोली ३. रंजना संजय बलखंडे रा. कृषी नगर, शिवणी, खदान, अकोला, ता. जि. अकोला. ४. संजय निवृत्ती इंगोले ५. राजेंद्र निवृत्ती इंगोले अर्जदार क. १, ४ व ५ रा. गणपती मंदिर जवळ, खडकी बु, कोठारी वाटिका नं. ५, अकोला.
ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : निवृत्ती केरबा इंगोले
**पत्ता :-** रा. गणपती मंदिर जवळ, खडकी बु, कोठारी वाटिका नं. ५, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत निवृत्ती केरबा इंगोले यांचे दि. १२/१२/२०२३ रोजी गणपती मंदिर जवळ, खडकी बु. कोठारी वाटिका नं. ५, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/११/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे पूजा राहुल खडसे यांचे मालकीचे प्लॉट क्र. ३८ सर्वे क्र. १३/५ चे एकून क्षेत्रफळ १५२४ चौ. फुट., असून त्यास चतुर्सिमा पूर्वेस - बालाजी नगर, पश्चिमेस- ले आऊट रोड, उत्तरेस- सर्वे. क्र. १५, दक्षिण - प्लॉट क्र. ३९, मौजे शापूर खुर्द, ता. मंगरूळपीर जी. वाशीम, याचे साखळी चे मूळ रजी. खरेदी खत क्र. १९८१ दिनांक ०१/०९/२००२ या क्रमाकाचे मूळ खरेदी खत दि. ०१/१२/२०२५ रोजी मंगरूळपीर रोडने जात असताना कोठेतरी हरवले आहे त्याबाबत पूजा राहुल खडसे यांनी पोलीस स्टेशन मंगरूळपीर ता. मंगरूळपीर जी. वाशीम येथे दि. ०३/१२/२०२५ रोजी तक्रार दिली आहे त्याचे तक्रार क्र. २५४/२०२५ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ७ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी.तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :- ०५/१२/२०२५

**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५८३८२४२

**जाहीर सुचना**

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, मोहम्मद जफर मोहम्मद रहमान रा. अकोला, ता. व जि. अकोला यांनी खालील वर्णनाची मालमत्ता डीसीबी बँक लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे मलकापूर म.न.पा., अकोला ता. जि. अकोला च्या हद्दीतील शे. स. क्र. ६ चे वि. उपविभागीय अधिकारी अकोला यांच्या फाईला वरील मह. प्र. क्र. एन. ए.पी.-३४/मलकापूर/२०/१९९५-९६ आदेश दि. १८/०३/१९९६ नुसार पारित ले-आउट नकाशातील प्लॉट क्र. १०४ व १०५ ज्याचे एकूण क्षेत्र. ४०० चौ. मी. असून त्यावर बांधलेल्या बालाजी रेसिडेन्सी ईमारती मधील पहिल्या माळ्यावरील गाळा क्र. १०१ ज्याचे क्षेत्रफळ १९.२५ चौ. मी. जागेतील अविभाजित हिस्स्यासह, ज्यास चातुर्सिमा : पूर्वेस : लिफ्ट व लॉबी, पश्चिमेस : अथर्व रेसिडेन्सी, उत्तरेस : सर्विस लेन व प्लॉट क्र. ९२, ९३, दक्षिणेस : गाळा क्र. १०२.

येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे दस्त क्र. ११४० दि १३/०४/२०१६ रोजीचे मुळ खरेदीखत जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले / गहाळ झाले आहे. त्याकरीता पोलीस स्टेशन खदान, अकोला येथे दि. ०४/१२/२०२५ रोजी तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन डीसीबी बँक लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०५/१२/२०२५

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५३/२०२५ — प्रोसेस नं.२३८९/२०२५
चौ.ता. २४/१२/२०२५ — दिनांक : २५/११/२०२५

**अर्जदार :** १. गजानन नामदेव वानखडे वय ४७ वर्ष धंदा- मजुरी २. वसंता नामदेव वानखडे वय ४४ वर्ष धंदा- मजुरी रा. गुरूवार पेठ पातुर ता. पातुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. नामदेव चंद्रभान वानखडे २. शांताबाई नामदेव वानखडे
**पत्ता :-** रा. पातुर ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नामदेव चंद्रभान वानखडे यांचा मृत्यु दि. ०३/०४/१९९१ रोजी पातुर ता. पातुर जि. अकोला येथे झाला. तसेच अर्जदार क्र. १ व २ ची आई नामे शांताबाई नामदेव वानखडे हया दिनांक २५.११.२०२३ रोजी पातुर ता. पातुर जि. अकोला येथे मयत झाल्या. तसेच अर्जदारांच्या आजी नामे सखुबाई चंद्रभान वानखडे हया अर्जदार लहान असतांना बरेच वर्षाआधी मयत झालेल्या आहेत. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/११/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**पाणी पुरवठा विभाग**


**निविदा सुचना क्र. ०५, सन २०२५-२६**

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मार्फत प्रभाग क्र. १२ मध्ये एच.डी.पी.ई. पाईप लाईन टाकणे या कामाची अण्णाभाऊ साठे नागरीवस्ती सुधार निधी अंतर्गत एकुण एका कामाची ई-निविदा दि. ०४.१२.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(संपर्क- ७७०९०४९३५१)
Portal https://mahatenders.in

**-स्वा-**
**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापु/ ३७६/२०२५
पाणीपुरवठा विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला दिनांक : ०४/१२/२०२५




जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# स्ट्रॉग रूमवर लोखंडी सुरक्षा

## सीलबंद ईव्हीएमभोवती शस्त्रधारी जवानांचा अडगळीचा पहारा; प्रत्येक हालचाल सीसीटीव्हीत कैद

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यातील वर्धा, हिंगणघाट, आर्वी, पुलगाव आणि सिंदी रेल्वे अशा पाच नगरपालिकांसाठी २ डिसेंबरला पार पडलेल्या मतदानानंतर संपूर्ण राजकीय वातावरण तापले असतानाच स्ट्रॉग रूममध्ये ठेवलेल्या ईव्हीएमभोवती अत्युच्च सुरक्षेचे कवच उभारण्यात आले आहे. दरवाजाबाहेर शस्त्रधारी जवानांची उभी मांडणी, कॅमेऱ्यांचा २४ तासांचा टक लावलेला पहारा आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अचानक धडक तपासण्याष्ठ ईव्हीएमचा एकही श्वास चुकू नये, यासाठी प्रशासनाने अक्षरशः लोखंडी सुरक्षा उभारली आहे.




देवळी नगरपालिका तसेच वर्धा, हिंगणघाट आणि पुलगाव येथील काही प्रभागांतील निवडणुका आक्षेपांच्या अपिलीनिर्णयांमुळे पुढे ढकलण्यात आल्यानंतर उर्वरित पाच नगरपालिकांसाठी २ डिसेंबरला मतदान झाले. मतदारांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वर्ध्यात ५७.३३ टक्के, हिंगणघाटात ६२.२० टक्के, आर्वीत ६१.२७ टक्के, पुलगावात ५९.१९ टक्के तर सिंदी रेल्वे येथे तब्बल ७१.२२ टक्के मतदानाची नोंद झाली. मतदान संपताच पॉलिंग पार्टीनी ईव्हीएम सीलबंद करून संबंधित स्ट्रॉग रूमकडे मोर्चा वळवला आणि तिथून सुरू झाला कडेकोट सुरक्षा कवचाचा' नवा अध्याय. वर्ध्यातील क्रीडा संकूल, हिंगणघाट तहसील कार्यालय, आर्वीतील गांधी विद्यालय तर पुलगाव आणि सिंदी रेल्वे नगरपालिकेच्या आवारातील स्ट्रॉग रूममध्ये सर्व ईव्हीएम जमा आहेत. या स्ट्रॉग रूमच्या बाहेरील दृश्य म्हणजे अक्षरशः किल्ला, प्रवेशमार्गावर बॅरिकेटिंग, तैनात जवानांच्या रायफलांचा चमक, सततचा टेहळणीचा आवाजष्ठ एकूणच, कुठल्याही प्रकारचा थांगपत्ता लागू नये अशी पद्धतशीर सुरक्षा.याशिवाय, प्रत्येक स्ट्रॉग रूमला अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बसवून हालचालिचा पत्ता पत्ता टिपला जात आहे. कॅमेऱ्यांचा कंट्रोल पॅनेल स्थानिक पोलिसांच्या ताब्यात असून, फुटेजची दररोज पाहणी करण्याची जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांवर सोपवली आहे. स्ट्रॉग रूम परिसरात कोणत्याही नागरिकाला प्रवेशबंदी करण्यात आली असून, फक्त अधिकृत परवानाधारक अधिकारीच ठरावीक प्रक्रियेनुसार आत प्रवेश करू शकतात.अलार्म सिस्टीमही बसविण्यात आली असून, कुठल्याही संशयास्पद हालचालीवर तत्काळ सूचना मिळावी अशी व्यवस्था आहे. सुरक्षा रक्षक, पोलिस, एसआरपी जवान, स्थानिक अधिकारी अशा त्रिस्तरीय यंत्रणेद्वारे ईव्हीएमचा ताबा सांभाळला जात आहे. इतकेच नव्हे तर वरिष्ठ स्तरावरील अधिकारी स्वतः आकस्मिक भेटी देत सुरक्षा व्यवस्थेची शहानिशा करत आहेत. त्यामुळे कोणत्याही प्रकारची छेडछाड अशक्यच असल्याचा विश्वास प्रशासनाच्या वर्तुळांतून व्यक्त केला जात आहे.

### निवडणूक आयोगाचे आदेश आणि प्रशासनाची काटेकोर अंमलबजावणी

ईव्हीएम हाताळणी, वाहतूक, सीलबंदी, स्ट्रॉग रूम व्यवस्थापन, प्रवेश नियंत्रण, सुरक्षा मांडणी, सीसीटीव्ही कव्हरेज आणि अलार्म सिस्टीम या सर्व बाबींवर निवडणूक आयोगाने अत्यंत स्पष्ट व कडक निर्देश दिले आहेत. त्याच सूचनांचे पालन करत जिल्हा प्रशासनाने प्रत्येक स्ट्रॉग रूमला सुरक्षा कवचाचा अभेद्य फरक पडू नये, याची काळजी घेतल्याचे सांगितले जाते.पाचही नगरपालिकांच्या ईव्हीएम स्ट्रॉग रूममध्ये पूर्ण सुरक्षित आहेत. स्थानिक पोलिसांसह एसआरपीचे जवान तैनात असून, वरिष्ठ अधिकारी दररोज तपासणी करतात. आकस्मिक भेटीही घेतल्या जातात. सुरक्षेबाबत कुठल्याही शंकेला वाव नाही.

**अनुराग जैन,** पोलिस अधीक्षक, वर्धा

# राज्यातील प्रमुख शहरांमध्ये वर्किंग वुमेन्स होस्टेल व ओल्ड एज होम उभारणार

## राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांची संकल्पना

**वर्धा/ जनमाध्यम**

गृह निर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी काम कारणा-या महिला व ज्येष्ट नागरिकांनासाठी अभिनव अशा योजनेची मुहर्तमेढ रोवली आहे. म्हॉडाच्या माध्यमातून प्रमुख शहरांमध्ये वर्किंग वुमन होस्टेल व ओल्ड एज होम अभारण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प सुरू केला आहे. छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स होस्टेल व ओल्ड एज होम उभारण्यसंदर्भात आवश्यक जागा, सुविधा आणि निधी नियोजनाबाबत तातडीने शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.



गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या (म्हाडा), कामकाजाचा आढावा घेतला. बैठकीला मुख्य अधिकारी दत्तात्रय नवले, उप मुख्य अधिकारी जयकुमार नामेवार व कार्यकारी अभियंता सुधाकर बाहेगव्हाणकर यांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते. महिलांच्या सुरक्षेसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानपूर्वक जीवनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे ही शासनाची जबाबदारी असून छत्रपती संभाजीनगर शहरामध्ये वर्किंग वुमेन्स होस्टेल व ओल्ड एज होम उभारण्याचा निर्णय डॉ. पंकज भोयर यांनी घेतल आहे. गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामध्ये सद्यस्थितीमध्ये सुरू असलेल्या योजनांची तसेच मंडळास्तरावर अद्यापपर्यंत एकुण किती प्रकल्प पूर्ण झाले, पीएमएवाय व २० टक्के अंतर्गत सुरू प्रकल्प, पूर्ण झालेले प्रकल्प, प्रस्तावित प्रकल्प, गाळे, भुखंड,सदनिका, तसेच दुकाने व अनिवासी भुखंड किती शिल्लक आहेत तसेच पैकी शिल्लक गाळे,सदनिका,भुखंड तसेच दुकाने व अनिवासी भुखंड विक्रीचे नियोजन याबाबतही आढावा घेण्यात आला. विविध योजनांचा आढावा घेत काम पूर्ण न करणा-या कंत्राटदारांवर कारवाई करण्याचे निर्देश यावेळी मंत्री डॉ. भोयर यांनी दिले. जिल्ह्यातील शासनाच्या जागेपैकी किती जागा म्हाडाच्या प्रकल्पासांठी मिळू शकतात त्याची माहिती घेवून जास्तीत जास्त प्रकल्प राबवा. तसेच म्हाडा प्रकल्पांसाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले. यावेळी म्हाडाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# बरबडी परिसरात पट्टेदार वाघाचा संचार

## गाय-कालवड ठार; सात गावांना वनविभागाचा सतर्कतेचा इशारा

**वर्धा/ जनमाध्यम**

समुद्रपूर तालुक्यातील बरबडी परिसरात सध्या पट्टेदार वाघाचा मुक्त संचार सुरू असून एका गाय व कालवडीचा बळी घेतल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट निर्माण झाले आहे. वनाविभागाने बरबडीसह परिसरातील सात गावांना विशेष सतर्कतेचा इशारा देत जंगल परिसरात अनावश्यक हालचाल टाळा, वाघाचे फोटो काढण्याचा प्रयत्न करू नका असे स्पष्टपणे सांगितले आहे.

समुद्रपूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी नीलेश गावंडे यांनी नागरिकांना सावध करून सांगितले की, वाघाचे दर्शन झाल्यास त्वरित वनविभागाला माहिती द्या. मात्र जीव धोक्यात टाकून त्याचे व्हिडिओ किंवा फोटो काढू नयेत. असे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई होईल. गेल्या काही महिन्यांपासून समुद्रपूर तालुक्यात वाघिणीसह तिच्या छाव्यांचा वावर वाढला आहे.

काही महिन्यांपूर्वी समुद्रपूर-गिरड मार्गावरील खुर्सापार शिवारात एका छोट्या पट्टेदार वाघाचा रस्ता अपघातात मृत्यू झाला होता. त्यानंतर वाघिण आपल्या उर्वरित छाव्यांसह विविध भागात फिरत असून त्यांना स्वतंत्र शिकारीचे धडे देत आहे. त्यामुळे जंगल व शेती परिसरात त्यांच्या हालचाली वाढत असल्याचे वनविभागाचे निरीक्षण आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी वनविभागाने संबंधित परिसरात गस्त वाढवली असून जंगल पट्ट्यात ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले आहेत. गावांमध्ये जाऊन नागरिकांना 'काय करावे व काय करू नये' याबाबत मार्गदर्शनही केले जात आहे. अद्याप तालुक्यातील पट्टेदार वाघांनी मनुष्यांवर हल्ला केलेला नसला तरी खबरदारी म्हणून नियमित सूचना जारी केल्या जात आहेत.

दरम्यान, बरबडी शिवारात वाघाने गाय व कालवड ठार केल्याने शेतकरी नरेंद्र घोडे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पंचनामा प्रक्रिया सुरू असून त्यांना शासकीय मदतीची अपेक्षा आहे.वनविभागाने ग्रामस्थांना एकटे जंगलात न जाणे, जनावरे सुरक्षित बांधणे आणि कोणतीही हालचाल दिसताच त्वरित माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

# हिगणी-गोहदा रस्त्याचे भूमिपूजन होऊन ८ महिने तरीही काम बंद

## खोट्या आश्वासनांचा संताप उसळला मतपेटीत उत्तर देऊ

**सेलू /अभय बेदमोहता**

हिंगणी-गोहदा हा तालुक्यातील अत्यंत महत्त्वाचा मुख्य रस्ता. मात्र या रस्त्याची अवस्था आज अक्षरशः चाळण झाली आहे. खड्डे, धुळीचे ढग, चिखलाचे तळेष्ठ यामुळे येथून प्रवास करणे म्हणजे तारेवरची कसरत करावी लागते. या रस्त्याचे भूमिपूजन झाल्याला तब्बल आठ महिने झाले, तरीही कामाचा एकही दगड हललेला नाही. त्यामुळे नागरिकांत प्रचंड संताप उसळला आहे आणि आता त्यांनी थेट इशारा दिला आहे, काम सुरू करा, नाहीतर आगामी निवडणुकीत मतपेटीतून उत्तर देऊ,

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना टप्पा - २ अंतर्गत ३.३४ किमी लांबीच्या या रस्त्यासाठी ३०६.६१ लाख रुपये मंजूर झाले होते. दि. १३ एप्रिल २०२५ रोजी आमदार तथा सध्याचे राज्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते या रस्त्याचे भूमिपूजन अत्यंत दिमाखात पार पडले. मंचावर जिल्ह्यातील नामवंत नेते, लोकप्रतिनिधी, अधिकारी यांचा मोठा ताफा उपस्थित होता. एवढ्या मोठ्या थाटामाटात भूमिपूजन झाल्याने आता रस्ता झपाट्याने सुरू होईल, अशी नागरिकांना पक्की खात्री होती.मात्र, प्रत्यक्षात कामाला सुरुवातच झाली नाही.

आठ महिने उलटूनही रस्त्याचे साधे डागडुजीचे कामदेखील झालेले नाही. पावसाळ्यात या मार्गाने प्रवास करणे धोकादायक ठरत असून, सध्या दररोज वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या मनात भूमिपूजन हा निव्वळ राजकीय दिखावा होता का? असा संशय खोलवर रुजू लागला आहे.या रस्त्याचे काम लवकर सुरू न झाल्यास जनतेचा रोष थेट आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये उमटेईल, असा स्पष्ट इशारा नागरिकांनी दिला आहे. भूमिपूजनाच्या दिवशीचा आनंद आता निराशेत बदलला असून, खड्डे भरले नाहीत तर मतंही मिळणार नाहीत, असा संतप्त स्वर गावागावात उमटू लागला आहे.हिंगणी–गोहदा रस्त्याचे काम तातडीने सुरू करून नागरिकांच्या वाढत्या रोषाला आंदोलनात रूपांतर होण्यापासून थांबवावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.





# बसस्थानक जवळ व्यक्तीचा आढळला मृतदेह

**हिंगणघाट -** येथील बसस्थानक परिसरात असलेल्या चहा कॅन्टीन जवळ गुरुवार दिनांक ४ डिसेंबरला सकाळी एक मृतदेह आढळला. त्यामुळे सर्वत्र खळबळ माजली. या संबंधात बस स्थानक प्रशासनाने पोलीस स्टेशनला सूचना केल्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले. तेव्हा प्रेम श्रीराम काचाडे वय ५५ वर्ष रा. बु रड मोहल्ला संत चोखोबा वॉर्ड अशी मृतदेहाची ओळख करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावर पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदन करण्याकरिता उपजिल्हा रुग्णालय येथे पाठविले. या संबंधात पोलिसांनी मृतकाच्या कुटुंबीयांना सूचना सुद्धा केली. अति दारूच्या सेवनामुळे सदर व्यक्तीचा मृत्यू झाल्या असल्याचा अंदाज पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# राज्यात संगणक परिचालकांचा बेमुदत आंदोलन

## ग्रामपंचायत डिजिटल सेवा ठप्प

**सेलू/ जनमाध्यम**

गेल्या १४ वर्षांपासून ग्रामीण भागातील नागरिकांना विविध डिजिटल सेवा पुरवणाऱ्या संगणक परिचालकांनी शासनाच्या सातत्याने दुर्लक्ष व अद्याप थकीत असलेल्या मानधनामुळे राज्यभर बेमुदत कामबंद आंदोलनाला सुरुवात केली आहे.ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२५ या चार महिन्यांचे मानधन न मिळाल्यामुळे परिचालक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यातच कोरोना काळातील विमा संरक्षण योजना, प्रोत्साहन भत्ता आणि संपलेला सेवा करार याबाबत कोणतीही स्पष्टता नसल्याने आंदोलनास मोठा वेग लागला आहे.परिचालकांच्या बैठकीत मंजूर असलेली ३,३०० पगारवाढ तात्काळ लागू करण्याची, कोरोना काळात मृत्यू झालेले परिचालक यांना मदत देण्याची, थकीत मानधन त्वरित आटोपण्याची, तसेच 'ग्रामपंचायत सहाय्यक' असा शासकीय दर्जा द्यावा असा ठाम आग्रह केला आहे. तोपर्यंत किमान वेतन कायदा लागू करण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे.ग्रामपंचायतींच्या संपूर्ण डिजिटल कामकाजाच्या कणावर असलेल्या परिचालकांच्या कामबंद आंदोलनामुळे ग्रामपंचायतींचे ऑनलाइन-ऑफलाइन कामकाज ठप्प झाले असून यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.संघटनांचे व्यापक समर्थन असून, जर शासनाकडून मागण्यांकडे लवकर दखल न घेतली गेली, तर हा संघर्ष आणखी तीव्र करण्यात येईल, असे दिला आहे, तालुक्यातील कनिष्ठ प्रशासक अधिकारी जगदीश जंगम यांना निवेदन देण्यात आले.



# जुन्या कारणावरून जीवे मारण्याची धमकी

**हिंगणघाट-** येथील मुजुमदार वॉर्ड मधील किसान जीन जवळ राहणारा श्रीकृष्ण गौतम मेश्राम वय ५८ वर्ष याचा वार्डातीलच युवक राजेश खंगार व त्याच्या सोबत घर घेतल्याबद्दल जुनावाद सुरू आहे. त्या वादग्रस्त घराला आग लागल्याने ते पाहण्याकरिता फिर्यादी श्रीकृष्ण मेश्राम हे आपल्या पत्नीसोबत गेला होता. हे माहिती पडताच आरोपी राजेश खंगार व त्याच्या दोन साथीदारांनी फिर्यादीच्या घरी येऊन जोरा जोराने अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तसेच आरोपी राजेश खंगार याने आपल्या साथीदारासोबत कुराडी व राड घेऊन फिर्यादीला घराबाहेर येण्याचे म्हटले. तेव्हा फिर्यादी भीतीपोटी बाहेर आला नाही. आरोपी राजेश खंगार व अन्य दोन साथीदारांनी हातातील शस्त्राने फिर्यादीच्या घराच्या भिंतीवर ते मारून तू बाहेर निघ तुला जीवानिशी मारून टाकतो अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीस त्याच्या जीवितास ला धोका निर्माण झाला आहे. याबद्दल फिर्यादीने तक्रार दिली असता पोलिसांनी आरोपी राजेश खंगार व अन्य दोन साथीदाराविरुद्ध कलम ३५ एक, २९६ भारतीय न्याय संहिता ३,५ अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल स्थूल करीत आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर ´२२९२०७७ वरील माझे SHEKH EARSHAD असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील IRSHAD ILAHI BAKSH हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता-लहानुजी नगर सिव्हिल लाईन वर्धा ४४२००१**

**नावात बदल**

माझे पूर्वी RAJIK ALI IRFAN ALI असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील RAJIK ALI IRAFAN ALI SAIYYAD हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :- गौतम वॉर्ड हिंगणघाट, वर्धा ४४२३०१**

**नावात बदल**

माझे पूर्वी NAJAMA KHAN असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील NAJBUN BEE AKBAR KHAN हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : महादेवपुरा वर्धा ४४२००१**

**नावात बदल**

माझे पूर्वी AQUIB JAWED SARDAR KHAN असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील AQUIB JAVED KHAN SARDAR KHAN PATHAN हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : कोंढाळी ता. काटोल जिल्हा नागपूर ४४११०३**

# ढाब्यातून 'गांजा-दारू रॅकेट'चा पर्दाफाश

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई पाच जणांच्या टोळीचा भंडाफोड

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यात अंमली पदार्थ व दारूच्या अवैध व्यापारावर अंकुश आणण्यासाठी पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी दिलेल्या कडक आदेशांनंतर स्थानिक गुन्हे शाखेने बुधवारी मध्यरात्री सडेतोड कारवाई करत जय महाकाली ढाब्यातून सुरू असलेले गांजा–दारूचे अवैध रॅकेट उध्वस्त केले. सावंगी मेघे पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा धोत्रा (रेल्वे) परिसरात करण्यात आलेल्या या छाप्यात एकूण पाच आरोपींचा सहभाग उघड होत, लाखो रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

४ डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वर्धा-पुलगाव रोडवरील जय महाकाली ढाब्यावर अचानक छापा टाकला. छाप्याच्या वेळी आरोपी रत्नेश तिवारी व अजय आडे हे दोघेही घटनास्थळी आढळले. पंचासमक्ष तपासणीदरम्यान काउंटरखाली पिशवीत भरलेला गांजा (७०१ ग्रॅम) ॲक्सेस १२५ व पल्सर मोटरसायकलच्या डिक्कीत परदेशी व देशी दारूच्या शिशा काउंटरखाली दोन चुंगड्यांमध्ये विविध ब्रँडच्या सिलबंद बाटल्या असा अवैध साठा उघडकीस आला. ढाब्यातून सर्रासपणे गांजा व दारू विक्री होत असल्याचे प्रत्यक्ष स्पष्ट झाले.पोलिस तपासात या रॅकेटचे पुरवठादारही समोर आले. दारूचा माल आरोपी पप्पु सेवेकर (रा. सालोड) पुरवत होता, तर गांजा हमीद शेख (रा. पुलगाव) याच्याकडून मारुती ८०० कार (MH-३२/C-१३२०) ने आणला जात होता. ढाबा मालक अंकित जयस्वाल याने संपूर्ण ठिकाण आरोपींना उपलब्ध करून देत या अवैध धंद्याला आश्रय दिल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.सर्व आरोपी मिळून गांजा व दारूचा साठा ठेवणे, तस्करी करणे व विक्री करण्याचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असल्याचे पोलीस तपासात पुराव्यानिशी निष्पन्न झाले. छाप्यात पोलिसांनी गांजा : ७०१ ग्रॅम,देशी दारू १७० सिलबंद शिशा (रॉयल स्टॅग) देशी दारू २१ सिलबंद शिशा (गोवा संत्रा नं. ०१) मोबाईल २ वाहने ३ असा एकूण ४,०३,१२० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, त्यावरून सर्व आरोपींवर एनडीपीएस. कायदा व दारूबंदी कायद्यान्वये सावंगी मेघे पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. विशेष पथक पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, उपनिरीक्षक सलाम कुरेशी, अंमलदार अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवि पुरोहित, अक्षय राऊत, अभिषेक नाईक, अखिल इंगळे यांनी ही मोहीम राबवली.



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक ११**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# कुख्यात गुन्हेगार 'फिरोज काझी उर्फ बाली' थेट कारागृहात !

## अमरावती पोलिसांची कारवाई, एमपीडीएखाली स्थानबद्ध

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील कुख्यात आणि सतत गुन्ह्यात सक्रिय असलेला फिरोज काझी उर्फ 'बाली' (वय ३३, रा. इकबाल कॉलनी) याची अमरावती पोलिसांनी एम.पी.डी.ए. या कठोर कायद्यान्वये थेट मध्यवर्ती कारागृहात रवानगी केली आहे. शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

फिरोज काझी हा गेल्या चार वर्षांपासून अमरावतीत विविध गैरकृत्यांत सक्रिय आहे. नागपुरी गेट पोलिस ठाण्यात दुखापत, प्राणघातक धमकी, खंडणी, अवैध शस्त्र बाळगणे, अंमली पदार्थांचा साठा यांसह तब्बल ८ गंभीर गुन्ह्यांची नोंद त्याच्या विरोधात आहे. पूर्वी त्याच्यावर तडीपार, प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती, तरीही त्याची गुन्हेगारीची सवय कमी झाली नाही. फिरोजवरील प्रस्तावित स्थानबद्धतेची प्रक्रिया



पोलीस निरीक्षक हनमंत उरलागोंडावार आणि जनार्दन साळुंखे यांनी तयार केली. गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त शिवाजी बचाटे, तसेच पोलिस निरीक्षक सीमा दाताळकर व संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली एमपीडीए सेलने हा प्रस्ताव पूर्ण केला. कार्यवाहीदरम्यान एपीआय इम्रान नायकवडे, एएसआय अजय मिश्रा, चेतन कराडे, तसेच नागपुरी गेट पोलिस ठाण्याचे कर्मचारी आनंद ठाकुर व मंगेश बोरकर यांनी सहभाग घेतला. ३ डिसेंबर रोजी पोलीस आयुक्त अरविंद चावरीया यांनी स्थानबद्धतेचा आदेश जारी केला. त्याच दिवशी आदेशाची तामिली करून फिरोज काझीला मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दाखल करण्यात आले.

### गुन्हेगारांवर कडक नजर –

सण-उत्सव आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतमोजणीचा काळ जवळ आल्याने शहर पोलिसांनी सराईत गुन्हेगारांची विशेष यादी तयार केली आहे. पुढील दिवसांत अशा गुन्हेगारांवर एमपीडीए, तडीपार आणि कठोर प्रतिबंधक कारवाया होण्याची दाट शक्यता आहे. शहरातील कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून आणखी धडाकेबाज पावले उचलली जाण्याची चिन्हे दिसत आहेत.

# रब्बी हंगाम पिक स्पर्धेतील सहभागासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत

**अमरावती/प्रतिनिधीः-** रब्बी हंगाम पिक स्पर्धा २०२५ मध्ये शेतकऱ्यांना सहभागीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करावा लागणार आहे. पिक स्पर्धेमध्ये रब्बी पिके ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवस या पाच पिकांचा समावेश आहे. पिकासाठी ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. राज्यस्तरावर पिकस्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे विजेते निवडण्यात येणार आहे. तालुका पातळीसाठी पहिले बक्षिस रु. ५ हजार, दुसरे बक्षिस ३ हजार व तिसरे बक्षिस २ हजार रूपये आहे. जिल्हा पातळीसाठी पहिले बक्षिस १० हजार, दुसरे बक्षिस ७ हजार व तिसरे बक्षिस ५ हजार रूपये स्वरुप आहे. राज्य पातळीसाठी पहिले बक्षिस ५० हजार, दुसरे बक्षिस ४० हजार



व तिसरे बक्षिस ३० हजार रूपये आहे. स्पर्धेसाठी सर्वसाधारण आणि आदिवासी गट राहणार आहे.

प्रवेश शुल्क हे पिकनिहाय ३०० रुपये आणि आदिवासी गटासाठी १५० रूपये राहणार आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी krush.maharashtra.gov.in किंवा नजिकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

## ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत सन्मान योजनेच्या लाभार्थ्यांची अंतिम निवड यादी जाहीर

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांना मानधन योजना लागू करण्यात आली आहे.

या योजनेसाठी जिल्हा परिषद अंतर्गत एकूण ५७९ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले होते. जिल्हा निवड समितीमार्फत त्यापैकी एकूण ७७ लाभार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली आहे.

त्यापैकी जिल्हा परिषद व महानगरपालिका क्षेत्रातील ५७ लाभार्थ्यांची अंतिम निवड यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. नगरपालिका क्षेत्रातील २० लाभार्थ्यांची यादी आचारसंहितेनंतर जाहीर करण्यात येईल, अशी माहिती जिल्हास्तरीय निवड समितीचे सदस्य सचिव यांनी दिली आह

## ग्रामीण भागात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. १४ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे जिल्हादंडाधिकारी आशिष येरेकर यांनी कळविले आहे.

## नांदगाव पेठ येथील पंचशिल बुद्ध विहारात वर्षावास समाप्ती

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** येथील पंचशिल बुद्ध विहार येथे वर्षावास समाप्तीचा पारंपरिक, सांस्कृतिक आणि धार्मिक सोहळा मोठ्या श्रद्धाभावात पार पडला. दरवर्षीप्रमाणे यंदाही उपासक–उपासिकांची उपस्थिती, धम्मसेवेतील उत्साह आणि विहारातील शांत–पवित्र वातावरण यामुळे कार्यक्रमाला विशेष नावलौकिक प्राप्त झाला.

कार्यक्रमाची सुरुवात 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या पवित्र ग्रंथाच्या सामूहिक पठणाने झाली. आश्विन पौर्णिमेपासून आषाढी पौर्णिमेपर्यंत संपूर्ण कालावधीत धम्मसेवक दीपंकर रंगारी यांनी सातत्याने ग्रंथ पठण करून उपासक आणि उपासिका बांधवांना धम्म, नैतिकता, संयम आणि करुणेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या धम्मप्रवचनात्मक सेवेबाबत सर्व उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली.वर्षावास



समारोप प्रसंगी भदंत दीपंकर यांनी प्रभावी आणि चिंतनशील धम्मदेशना दिली. त्यांनी धम्माच्या मूलभूत तत्त्वांवर प्रकाश टाकत शील, समाधी आणि प्रज्ञेच्या त्रिसूत्रीचे दैनंदिन जीवनात पालन का आवश्यक आहे, यावर संदेशमय मार्गदर्शन केले. धम्माचा व्यवहारातील उपयोग, समाजातील मैत्रीपूर्ण सहअस्तित्व आणि दुःखनिवारणाचा मार्ग यावर त्यांनी सुस्पष्ट विचार मांडले.

या धार्मिक सोहळ्यास परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, उपासक–उपासिका आणि विविध बौद्ध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये अविनाश घोडेस्वार, प्रभाकर शेंडे, सुभाष खंडारे, दिनेश रामटेके, दिवाकर मेश्राम, रूपेश खंडारे, सुमेध गजभिये, हिमालय घोडेस्वार, संघटना पाटील,रेखाबाई घोडेस्वार, साधना गजभिये, रेखाबाई रामटेके, मीराबाई कठाने, रमाबाई रामटेके, छायाबाई मेश्राम यांचा विशेष सहभाग होता.बौद्ध महिला विकास महासंघ आणि बौद्ध विकास युवक मंडळ यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी मोठ्या शिस्तबद्ध पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन आणि व्यवस्थापन सांभाळले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी मैत्री, करुणा, प्रज्ञा, अहिंसा आणि धम्माच्या मूल्यांचा प्रसार करण्याचा संकल्प व्यक्त केला. समाजात सद्भावना, शांतता आणि जागरूकतेचा संदेश पोहोचवण्याच्या उद्देशाने वर्षावास समाप्तीचा हा धार्मिक सोहळा समाधानी आणि पवित्र वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

## पांदन रस्ता दुरुस्तीसाठी ग्रामस्थांनी घेतला पुढाकार

### -आदर्श ग्राम सांगवा येथील उपक्रम

**खल्लार/प्रतिनिधीः-** आदर्श गाव सांगवा बु येथील ग्रामस्थानी सांगवा उपराई पांदन रस्ता लोकसहभाग व श्रमदानातून दुरुस्त केला. गावातील नागरिक अनिल सगणे,आकाश कराळे यांनी माती आणण्यासाठी ट्रॅक्टर व डिझेल सेवा उपलब्ध करून दिली तसेच गावातील शेकडो नागरिक आणि महिलांनी यामध्ये सहभागी होऊन सक्रिय सहभाग घेतला. एकूण ५०० मिटर लांबीचा पांदण रस्ता दुरुस्ती करिता श्रमदान, लोकसहभागामधून पूर्ण करण्यात आला. यामुळे थेट शेतात बंडी तसेच ट्रॅक्टर शेतापर्यंत घेऊन जाणे नागरिकांना सोयीचे झाले आहे. या श्रमदानामध्ये गावचे सरपंच राजू पाटील कराळे,उपसरपंच विजय दा.सगणे,सर्व ग्रामपंचायत



सदस्य,ग्रामपंचायत अधिकारी सुरज भोपसे ,रोजगार सेवक उमेश दहे,ग्रामपंचायत कर्मचारी उमेश गोरे,अंगणवाडी सेविका,गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

## महिला प्राध्यापिकेच्या फ्लॅटवर चोरट्यांचा डल्ला

### -३ लाख २९ हजारांचे दागिने लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील बायपासवरील महनोर मंगल कार्यालयाजवळील श्री अपार्टमेंट मध्ये राहणाऱ्या महिला प्राध्यापिकेच्या फ्लॅटवर चोरट्यांनी धाड टाकत तब्बल ३ लाख २९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अचलपूर येथील शासकीय पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या आरती निरंजन गोंडाने (वय ४७) या आपल्या आजारी सासूच्या उपचारामुळे गेल्या काही दिवसांपासून नागपूर येथे वास्तव्यास होत्या. त्यांची आई श्री अपार्टमेंटमधील फ्लॅटमध्ये राहते. आरती गोंडाने गेल्या काही दिवसांपासून अमरावती–अचलपूर दरम्यान नियमित ये–जा करीत आहेत. बुधवारी सकाळी आरती गोंडाने यांनी आपल्या फ्लॅटला कुलूप लावून आईला बियानी हॉस्पिटलमध्ये घेऊन गेल्या. दुपारी परत आल्यानंतर त्यांनी पाहिले असता फ्लॅटचे कुलूप तोडलेल्या अवस्थेत आढळले. घरातील कपाटातून चोरट्यांनी सोन्याचे दागिने चोरून नेल्याचे उघडकीस आले. चोरट्यांनी २० ग्रॅमचा सोन्याचा हार, ३० ग्रॅमच्या सोन्याच्या चूडया, पाच जोड झुमके, मुलांसाठी दोन पेंडंट, मुलीच्या कानातील झुमके (१० ग्रॅम) आणि ४ ग्रॅमची नथ असा एकूण ३ लाख २९ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच घरातील लोकांनी आवाज दिल्याने नागरिक घटनास्थळी धावले. लगेचच पोलिसांना माहिती देण्यात आली. राजापेठ पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. ही चोरी दिवसाढवळ्या घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण असून चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

## माळी समाज वधू-वर परिचय मेळावा रविवारी

### -महात्मा फुले बहुउद्देशीय संस्थेचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** महात्मा फुले बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सर्व शाखीय माळी समाज उपवर वधू परिचय मेळाव्याचे आयोजन रविवार ७ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले आहे. संस्थेच्या या उपक्रमाला यंदा दहा वर्ष पूर्ण होत आहे. दशकपुर्ती निमित्य यावर्षी उपवर वधू युवतींची फोटो नोदंणी हजारोच्या वर झाली असल्याची माहिती आज शुक्रवारीं ५ डिसेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की मेळाव्यामध्ये विवाह बंधन या परिचय पुस्तिकेचेही मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात येणार आहे.



संस्थाअध्यक्ष प्रभाकर घाटोळ यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या मेळाव्याचे उद्घाटन राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून नीलकंठ यावलकर, खासदार डॉ.अनिल बोंडे ,बळवंत वानखडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार श्रीकांत भारतीय, संजय खोडके, सुलभा खोडके, उमेश यावलकर, दिलीप लोखंडे, संजय खडसे, प्रमोद कोरडे, राजेंद्र आंडे, प्रशांत लांडे, सुभाष बनसोड, संजय भेते, पुरुषोत्तम कळमकर, नाना आमले, डॉ. किरण बेलसरे, महेंद्र भातकुले, अश्विनी पेठकर, दिलीप लोखंडे, डॉ. राधा श्याम बहादुरे, संजय बेलोकार, सुधीर रसे, अतुल भिरडे आदि उपस्थित पस्थित राहणार आहे. उपवर वधू परिचय नोंदणीसाठी स्वतंत्र कक्ष, फोटो व्हिडिओ ग्राफी सादरीकरण, परस्पर संवाद सुविधा, पालकांच्या भेटी गाठी अशा सर्व सुविधा संस्थेमार्फत करण्यात आल्या आहे. दहा वर्षापासून संस्था शिक्षण, महिला सक्षमीकरण, आरोग्य विषयक जनजागृती करत आहे. समाज बांधवांनी मोठ्या संख्येने मेळाव्यामध्ये उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये प्रभाकर घाटोळ, प्रकाश लोखंडे, दिवाकर फरकाडे, प्रवीण पेठकर आदि उपस्थित होते.

## झेनिथ हॉस्पिटल अमरावती येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून रुग्णांना अत्याधुनिक उपचारांची सुविधा उपलब्ध

**अमरावती/प्रतिनिधीः-** झेनिथ हॉस्पिटल, अमरावती येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CM Relief Fund) अंतर्गत अनेक गरजू रुग्णांना उच्च दर्जाचे उपचार सहज उपलब्ध होत आहेत. या निधीमुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सुविधा मिळत आहेत. अलीकडेच झेनिथ हॉस्पिटलमध्ये या निधीच्या सहाय्याने दोन कॉम्प्लेक्स एंजिओप्लास्टी यशस्वीरीत्या पार पडल्या. अशा प्रकारच्या जटिल प्रक्रियांसाठी अनेक महागडी आणि अत्याधुनिक यंत्रणा आवश्यक असतात, ज्यात प्रमुख आहेत: इंट्राव्हॅस्क्युलर अल्ट्रासाऊंड (IVUS) , रोटाब्लेशन तंत्रज्ञान, इंट्राव्हॅस्क्युलर अल्ट्रासाऊंड (IVUS) ही एक आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पद्धत असून रक्तवाहिन्यांच्या आतील भागाचे GÛÛe-resolution प्रतिमांकन करते. यामुळे ब्लॉकेजची गंभीरता, धमन्यांची जाडी, प्लाकची रचना आणि उपचाराची अचूक योजना करण्यास मदत होते. रोटाब्लेशन तंत्रज्ञान हे विशेषतः कॅल्सिफाईड किंवा कठीण ब्लॉकेजमध्ये वापरले जाते. अतिशय वेगाने फिरणाऱ्या मायक्रो-डायमंड ड्रिलच्या साहाय्याने कठीण कॅल्शियम थर भेदून रक्तवाहिन्या पुन्हा उघडण्यास मदत होते, ज्यामुळे स्टेंट दीर्घकाळ टिकावा आणि पुनरावृत्तीची शक्यता कमी व्हावी.

रुग्णांसाठी विशेष सुविधा-

झेनिथ हॉस्पिटल फक्त उपचारच करत नाही तर सामाजिक संवेदनाही जपते. रुग्णालयात विधवा महिलांसाठी,माजी सैनिकांसाठी, कार्यरत सैनिकांसाठी OPD सेवांवर विशेष सवलती उपलब्ध आहेत. याशिवाय झेनिथ हॉस्पिटल बहुतांश विमा कंपन्यांशी संलग्न आहे. महाराष्ट्र पोलीस योजना, ECHS (Ex-servicemen Health Scheme) अंतर्गतही मान्यताप्राप्त असून अशा लाभार्थींना कॅशलेस उपचार सुविधा पुरवली जाते.

झेनिथ हॉस्पिटल हे अमरावतीतील एकमेव पूर्णतः NABH-ॲक्रेडिटेड मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल असून रुग्णांसाठी सुरक्षित, शास्त्रीय आणि उच्च गुणवत्ता उपचार देण्यास कटिबद्ध आहे. रुग्णालयात सर्व प्रकारच्या आधुनिक हृदयविकार उपचारांची सुविधा उपलब्ध असून त्यात:

कॉम्प्लेक्स एंजिओप्लास्टी, TAVR (Transcatheter Aortic Valve Replacement), बालरुग्णांतील congenital defects mee"er device closure, इमर्जन्सी व प्रगत इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजी यांचा समावेश आहे.

झेनिथ हॉस्पिटलचे इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. नीरज राघानी हे शहरातील कार्यासोबतच

डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयातही (PDMMC) गरीब आणि बालरुग्णांसाठी congenital heart disease device closure सेवा निःशुल्क किंवा कमी खर्चात पुरवत आहेत, जे समाजसेवेचा महत्त्वाचा भाग आहे.

झेनिथ हॉस्पिटलच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालय आणि सर्व अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

या उपक्रमामुळे अत्याधुनिक वैद्यकीय उपचार आता अधिक सुलभ झाले असून, योग्य उपचार प्रत्येक गरजू रुग्णापर्यंत पोहोचवण्याच्या दिशेने झेनिथ हॉस्पिटलने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे.


**CHANGE IN NAME**

**OLD NAME**
AMRITA KAUR
**NEW NAME**
AMRITAKAUR MOHINDERSINGH JAGGI
**ADDRESS**
GOVIND NAGAR
RAJAPETH, AMRAVATI
Mob.9860111777


## कुख्यात यश कडूच्या अटकेनंतर जेवड नगरात तांडव

### -समर्थक गुंडांनी केली १२ पेक्षा अधिक वाहनांची तोडफोड

**अमरावती/प्रतिनिधीः-** कुख्यात गुन्हेगार यश कडूला सोमवारी सायंकाळी एका जुन्या प्रकरणात अटक करण्यात आली होती.यश कडू ला जेरबंद केल्यानंतर त्याच्या ३० ते ३५ समर्थक गुंडांनी जेवड परिसरात तांडव केला. परिसरातील लोकांच्या घरासमोर उभ्या १२ पेक्षा अधिक वाहनांची तोडफोड केली. इलेक्ट्रिक पोल वरील मीटर फोडले.सुमारे ५.५० लाखाचे नुकसान केले. या घटनेने प्रचंड खळबळ माजली, परिसरात भय व्याप्त आहे. या संदर्भात शुभम गोकुळ जनबंधू यांनी पोलिसात तक्रार दिली आहे. शुभम जनबंधू





यांनी सांगितले की, ते दस्तूर नगर चौकात भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करतात आणि त्याची आई संगीता, वडील गोकुळदास, भाऊ गौरव, वहिनी कोमल, पत्नी पल्लवी, बहीण दीक्षा सोबत जेवड नगर परिसरात राहतात. सोमवारी दुपारी चार वाजता दस्तूर नगर चौकात मामेभाऊ विकी कांबळे सोबत उभे होते.त्याचवेळी यश सुनील कडू आणि त्याचा भाऊ जय कडू तेथे आले. यश कडू वर अनेक गुन्हे दाखल आहेत आणि गोलू चोपकर हत्याकांडाचा तो प्रमुख आरोपी आहे. ज्याच्या विरुद्ध कोर्टात शुभमने साक्ष दिली होती. तेव्हा पासून तो त्याचा राग करतो. यश कडू त्याच्या ठेल्या जवळ आला आणि शुभमला म्हटले की, तुला जर चौकात धंदा करायचा असेल तर दोनशे रुपये रोज द्यावे लागतील नाही तर तुला भाजीची गाडी लावू देणार नाही. त्याच प्रमाणे शुभमला जीवे मारण्याची धमकी देऊन निघून गेला. यामुळे घाबरलेल्या शुभमने फ्रेजरपुरा पोलिसात तक्रार केली. थोड्या वेळाने यश कडू पुन्हा दस्तूर नगर चौकात तलवार घेऊन आला, असता पोलिसांनी त्याला पकडले. त्याला पकडल्यानंतर त्याच्या गुंड समर्थकांनी रात्री ११.४० वाजता सुमारे वाजता जेवड नगर परिसरात तांडव केला. यश कडूचे साथीदार सोनू सामरे, मोनू सांमरे ,देवा मडावी, पियुष बुंदिले, साहिल मेश्राम ,आदेश उर्फ सूर्यवंशी, अक्षय राठोड, सिद्धांत ठाकरे असे जवळपास ३० ते ३५ जण विविध मोटरसायकलला तिथे पोहोचले. शुभमच्या घराच्या गेटवर तलवार मारून दगडफेक केली.त्याच प्रमाणे परिसरात राहणारे सागर राजू मोरे, सुरज मोरे, सचिन गोवर्धन गायकवाड, विशाल पांडे, आदित्य ढेरे, दिनेश जवंजाळ, प्रमोद रामटेके, कृष्णा परतेती,अंकुश सोनटक्के यांचे एकूण १३ वाहने व गल्ली क्रमांक १ व २ येथील इलेक्ट्रिक पोल वरील मीटर असलेले बॉक्स फोडून ५ लाख ५० हजाराचे नुकसान केले. पाच आरोपींना दुपारपर्यंत पोलिसांनी ताब्यात घेतले होते. या घटनेनेमुळे जेवड नगर परिसरात भीतीचे वातावरण तयार झाले आहे.इतर फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहे.


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ८९
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



**मा.सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

किरकोळ आर.एम.जे.सी.अर्ज क्र.३०५/२०२५ ने.ता.२०.१२.२०२५

**लिला +१ वि. निरंक**

**अर्जदार :** १. **लिला हरिचंद्र गणवीर**
रा.जनुना,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. **विजया विजय गजभिये**
रा.वनराई ऑफिस जवळ, किशोर नगर, रुख्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**// वि // निरंक**

ज्याअर्थी **मयत हरिचंद्र कृष्णाजी गणवीर यांचा मृत्यू दि.१५.०५.२०२० रोजी जनुना,**ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अ.क्र.१ ही पत्नी आहे व अर्जदार क्र.२ ही विवाहीत मुलगी आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज **दिनांक १८ नोव्हेंबर २०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर



**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७३५/२०२५
**श्रीमती शबा अशरफ अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०८.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Saba W/o Ashraf Hussain Syed Khatib, Age 45 Yrs. Occu.: Housewife
2. Zehra D/o Ashraf Hussain Syed Khatib, Age 17 Yrs. Occu.: Student
3. Azmat Hussain S/o Ashraf Hussain Syed Khatib, Age 09 Yrs. Occu.: Student
(Appli.No.2 & 3 being minors through natural guardian mother i.e. Appli.No.1)
All R/o Danish Colony, Camp, Amravati, Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अशर्फ हुसैन सय्यद खतिब** हे दिनांक 09.05.2025 रोजी **अचलपूर, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शबा अशरफ अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शबा अशरफ अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# तिवसा येथे सोयाबीन खरेदीचा मुद्दा पेटला

## नाफेड व वखार महामंडळाचा सोयाबीनचे पोते जाळत शेतकऱ्यांचा निषेध



**तिवसा/ वार्ताहर**

तालुक्यातील शेतकरी आधीच नैसर्गिक आपत्तीने हवालदील झालेला असताना त्या पाठोपाठ नाफेड सुद्धा शेतकऱ्यांच्या जीवावर उठले आहे. अशी विद्यमान परिस्थिती सोयाबीन खरेदी केंद्रावर सरकारी यंत्रणेने आणून ठेवली.सोयाबीन खरेदी करण्यासंदर्भात सुमारे ३७ प्रकारच्या जाचक अटी शेतकऱ्यांना घालून वखार महामंडळाने व नाफेडणे गेल्या आठवड्याभरात अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनला बाहेरचा रस्ता दाखविला आहे.त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकरी व तालुका कॉंग्रेस कमिटी ने सोयाबीनचे पोते जाळून निषेध व्यक्त केला.

यंदा पूरपरिस्थिती अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हातचे पीक गेले असून शेतकऱ्यांना जाहीर झालेली मदत सुद्धा अल्पशी असून ती सुद्धा पूर्णपणे शेतकऱ्यांना मिळालेली नाही.एफ ए क्यू दर्जाचा माल खरेदी होत असताना वखार महामंडळाने चांगल्या सोयाबीन वर सुद्धा आक्षेप घेत उत्पादन झालेल्या सोयाबीन मध्ये आणखी किती चांगले सोयाबीन विकावे किंवा आणावे हा प्रश्न शेतकऱ्यांना व केंद्राला पडलेला आहे.शेतकऱ्यांचे चक्कर वाया जात असून त्यांना गाडी भाडे सुद्धा जवळून भरावे लागत आहे आधीच कुठल्या शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. या जाचक अटी रद्द करून नोंदणी झालेल्या सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन काही प्रमाणात सवलत देऊन खरेदी करण्यात यावे ही मागणी आज तालुकास्तरीय समितीकडे उपस्थित शेतकऱ्यांनी व तालुका कॉंग्रेस कमिटीने लावून धरली.

यावेळी नाफेड,वखार महामंडळ, खरेदी-विक्री संघाचे अधिकारी पदाधिकारी, तहसीलदार तिवसा, कृषी अधिकारी, पोलीस निरीक्षक तिवसा, वखार महामंडळाचे गोडाऊन निरीक्षक आदी अधिकाऱ्यांचा लवाजमा कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात दाखल झाला होता.यावेळी त्यांना शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले,यावेळी त्यांनी सरकारच्या या नियोजनाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली .

एवढी खरेदी विक्री संघाने सुद्धा शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान बघता खरेदी बंद करण्याचा इशारा देत ही सर्व यंत्रणा नाफेड वखार महामंडळानेच राबवावी असा इशारा दिला.

नाफेडच्या व वखार महामंडळाच्या चुकीच्या नियोजनाबद्दल उपस्थित शेतकरी व तालुका कॉंग्रेस कमिटीने आपला रोष व्यक्त करत, यावेळी सोयाबीन चे पोते जाळून सरकारचे लक्ष अधिवेशनात वेदाव्य लोकप्रतिनिधींनी यावर प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांचे सोयाबीन तातडीने खरेदी करावे व त्यांना हमीभाव द्यावा यासाठी जोरदार निदर्शने करत उपस्थित अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

यावेळी ता. अध्यक्ष वैभव वानखडे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सुरेश मेटकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रवी राऊत,संचालक लोकेश केने, संचालक प्रविण साबळे, नगरसेवक योगेश वानखडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अजय सुरटकर, प्रणव गौरखेडे, अनिकेत तालन, अक्षय पवार, वैभव काकडे, वैभव ढवळे, प्रहार पक्षाचे प्रवीण केने, आकाश मकेश्वर, आधी पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या हिवाळी-२०२५ च्या लेखी परीक्षांच्या वेळापत्रकात बदल

### विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन



**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी - २०२५ लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. सदर वेळापत्रकातील काही परीक्षांच्या वेळापत्रकात दुरुस्ती/सुधारित/नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आले, असून विद्यार्थ्यांना याची नोंद घ्यावी, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात येत आहे.ज्या परीक्षांच्या वेळापत्रकांमध्ये बदल करण्यात आले आहेत, त्यामध्ये बी.ई. सेमि-१ व २ (एन.ई.पी.), बी.सी.ए. (ए.आय.एम.एल.)/बी.सी.ए. (डी.एस.) सेमि-३ (एन.ई.पी.), बी.एस्सी. (साय बर सेक्युरिटी)/बी.एस्सी. (डाटा सायन्स ॲन्ड ॲनॉलिटिक्स) सेमि-३ (एन.ई.पी.), बी.आच. सेमि-१ (सी.बी.सी.एस.) आणि बी.ए. (लिबरल आर्टस्) सेमि-१ (एन.ई.पी.) या परीक्षांचा समावेश आहे.यासंदर्भात सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, संबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून, संबंधितांनी याची सर्व विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

### 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान'

# अंतर्गत श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती



**नांदगाव पेठ/ वार्ताहर**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून गुरुवारी नांदगाव पेठ ग्रामपंचायतच्या वतीने लोकसहभाग आणि श्रमदानाच्या बळावर वनराई बंधारा बांधण्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

गटविकास अधिकारी तूपे आणि विस्तार अधिकारी सीडाम यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी उत्साहाने सहभाग नोंदवत लोकसहभागाचा आदर्श उभा केला.वनराई बंधाऱ्याच्या बांधकामामुळे गावातील जलसंधारण क्षमतेत वाढ होऊन शेतीसाठी आवश्यक पाण्याचा स्थिर स्रोत निर्माण होणार आहे.

या उपक्रमात ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, गावातील युवक, महिला मंडळे तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या एकजुटीने श्रमदान करून सरकारी योजना व लोकसहभाग यांची उत्कृष्ट सांगड घातली.

गटविकास अधिकारी तूपे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, 'पाण्यासारख्या अत्यावश्यक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्यासाठी लोकसहभाग हीच खरी ताकद आहे. नांदगाव पेठ ग्रामस्थांनी दाखवलेला उत्साह अनुकरणीय आहे.विस्तार अधिकारी सिडाम यांनी सुद्धा ग्रामस्थांचे प्रोत्साहन करत सांगितले की, 'अभियानाच्या उद्दिष्टांनुसार गावच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून नांदगाव पेठने त्यात पुढाकार घेतल्याने गाव विकासाचा आदर्श निर्माण झाला आहे.

यावेळी सरपंच कविता डांगे, उपसरपंच मझहर खा सफदर खा, ग्रामपंचायत अधिकारी हर्षदा बोंडे सर्वश्री सदस्य शिवराजसिंह राठोड, साहेबराव उर्फ छत्रपती पटके,मंदा कापडे, विभा देशमुख, जगदीश इंगोले, किशोर नागापुरे, श्रीधर राऊत, बलविर चव्हाण,मो.शाकिर परवेज मो साबीर, सलमा सुलताना हमीदशाह,आशा चंदेल, वृषाली इंगळे, उर्मिला गायगोले, वंदना भटकर ग्रामपंचायत कर्मचारी राहुल बोडखे,राहुल भोपळे, गोपाल शेळके यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

## गाविलगडावर गडप्रेमींची १४ डिसेंबरला चढाई

**चिखलदरा** - येथील ऐतिहासिक गाविलगड किल्ल्या वर बागलिंगा गावातून चढण्याचा थरारक अनुभव गडकिल्ले आणि जंगलप्रेमींना १४ डिसेंबरला मिळणार आहे. गाविलगड शौर्य दिनानिमित्त स्वराज्य सेवा प्रतिष्ठान च्यावतीने या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी सकाळी ७:३० वाजता गडकिल्लेप्रेमी बागलिंगा गावात जमणार आहेत. सकाळी ९ वाजता बागलिंगा येथून गाविल गडावर चढण्याच्या मोहिमेला सुरुवात होईल. गडकिल्ले आणि जंगलप्रेमींनी या विशेष मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन स्वराज्य सेवा प्रतिष्ठानने केले आहे.

### डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात

# आंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धा



**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती व डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने आंतर महाविद्यालयीन हँडबॉल स्पर्धेचे आयोजन डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती यांचे क्रीडांगणावर करण्यात आले होते.

स्पर्धेचा अंतिम सामना श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती व डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अमरावती यांचे मध्ये खेळला गेला. या रोमहर्षक सामन्यात श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाने एका गुणांनी विजय मिळवला.या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाकरिता अध्यक्ष म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख या होत्या. तसेच मुख्य अतिथी म्हणून श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे हे होते तसेच अतिथी म्हणून डॉ. उल्हास देशमुख,डॉ. केणेडी,डॉ. मडावी हे होते.प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख व प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे यांनी खेळाडूंना याप्रसंगी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उदय ठाकरे तसेच आभार प्रदर्शन प्रफुल घवळे यांनी केले.या बक्षीस वितरण कार्यक्रमाकरिता महाविद्यालयाचे प्रा. डॉ. मालवीय, प्रा. डॉ. रामटेके, प्रा. डॉ. लोखंडे, प्रा. डॉ. पाटील, प्रा. डॉ.काळे, प्रा. डॉ. इंगोले,प्रा. डॉ. घुगे तसेच विजय देशमुख,रणजीत देशमुख, प्रवीण गावंडे, प्रसाद पांडे, प्रवीण मिसाळ, मनोराव सुने, नरेंद्र जवंजाळ. प्रकाश अवझाड,उमेश पवार, सुनंदा चराटे, यांनी या स्पर्धा यशस्वी होण्याकरिता अथक परिश्रम घेतले.

या अंतिम सामन्याकरिता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद व कर्मचारी व डॉक्टर पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावतीचे विद्यार्थी उपस्थित होते.

# नरेशचंद्र पाटील यांचा सेवानिवृत्ती निरोप समारंभ



**अमरावती/ का.प्र.**

येथील श्री. शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत येणाऱ्या शिवाजी बहुउद्देशीय उच्माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय अमरावती शाळेतील शिक्षक नरेशचंद्र पाटील ,अध्यक्ष पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक तथा कार्यकारणी स्वीकृत सदस्य श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती. यांचा सेवानिवृत्ती निमित्त सेवा गौरव सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे भैय्यासाहेब पुसदेकर (उपाध्यक्ष श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती) उपस्थित होते . तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून दिलीप बाबू इंगोले (कोषाध्यक्ष श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती) व हेमंत काळमेघ (कार्यकारणी सदस्य श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती) उपस्थित होत. अध्यक्षीय भाषणात नरेश पाटील म्हणजे एक कर्तव्यनिष्ठ व विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून भैय्यासाहेबपुसदेकर यांनी त्यांचा गौरव करण्यात आ. तसेच संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले यांनी नरेशचंद्र पाटील सरांशी असलेला सुमारे पंचवीस वर्षापासूनचा असणारा स्नेहसंबंध आपल्या मनोगतातून व्यक्त केला .

याचप्रमाणे कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ यांनी पाटील यांच्या व्यक्तिगत आयुष्यावर प्रकाश टाकून कमी वयात त्यांनी आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या कशा समर्थपणे पार पाडल्या याचा आढावा घेतला. सत्काराला उत्तर देताना नरेशचंद्र पाटील यांनी शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षिका माझे सहकारी नसून कुटुंबच आहेत असे भावपूर्ण उद्गार काढले.

तसेच या कार्यक्रमाला श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय आजीव सभासद एन. बी. राठी, आर . बी. काळ, ए. एच. अर्डक, एकनाथराव बंड, ओंकारराव बंड, रमेशराव गावंडे व्ही . डी .विधाते तसेच शाळा निरीक्षक रोडे, मंगळे उपस्थित होतोाळेतील शिक्षक प्रसन्न मोहोड तसेच शिक्षिका वैशाली पाटील व वृषाली चौखंडे यांनी त्यांच्या मनोगतातून नरेशचंद्र पाटील यांच्या बद्दलच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे उपमुख्याध्यापक सुधीर माळवे यांनी केले, तर कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका ए.सी. देशमुख यांनी केले.

# तिवसा तालुक्यात संगणक परिचालकांचे कामबंद आंदोलन

## तुटपुंजे मानधन, थकीत वेतन व करार नुतनिकरणाची मागणी




**कुऱ्हा/ वार्ताहर**

गेल्या १४ वर्षापासून ग्रामपंचायत स्तरावर ग्रामीण नागरिकांना डिजिटल सेवा पुरवून शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या संगणक परिचालकांनी राज्यभर मंगळवारपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२५ पर्यतचे चार महिन्यांचे मानधन थकीत, कोरोनाकाळातील विमा संरक्षण व प्रोत्साहन भत्त्याचा अभाव, तसेच कंपनीचा १८ सप्टेंबर २०२५ रोजी संपलेला करार अद्याप नूतनीकरण न होणे या तातडीच्या मुद्द्यांवर शासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप यावेळी परिचालकांनी केला.ग्रामपंचायतीची जन्म-मृत्यू नोंदणी, विवाह प्रमाणपत्र, विविध ऑनलाइन सेवा, आयुष्मान भारत, स्वच्छ भारत मिशन, घरकुल, आवास योजना आदी कामांमध्ये संगणक परिचालक महत्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. मात्र या सर्व जबाबदारीच्या कामासाठी तुटपुंजे मानधन मिळते. वाढती महागाई आणि विलंबाने मिळणारे मानधन यामुळे अनेक परिचालक आर्थिक संकटात सापडले आहेत.शासनाने मान्य केलेली ३,३०० रुपयांची पगारवाढ तत्काळ लागू करावी, कोरोनाकाळात मृत्यूमुखी पडलेल्या परिचालकांच्या कुटुंबीयांना ५० लाखांचे विमा संरक्षण द्यावे, तसेच कोरोनाकाळात जीव धोक्यात घालून दिलेल्या सेवेसाठी २३ महिन्यांचा प्रोत्साहन भत्ता देण्याची मागणी संघटनेने केली आहे.याशिवाय संगणक परिचालकांना 'ग्रामपंचायत सहाय्यक' असा शासकीय/निमशासकीय दर्जा द्यावा, तोपर्यंत किमान वेतन कायदा लागू करावा, अशा मागण्यांचे निवेदन तिवसा पंचायत समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले.महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत संगणक परिचालक संघटनेचे राज्याध्यक्ष गुणवंत राठोड यांनी सांगितले की, 'आमच्या हक्कांसाठी येत्या दि. ११ डिसेंबरला नागपूर येथे शांततेत मोर्चा काढण्यात येणार आहे.या संघटनेचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने संगणक परिचालक उपस्थित होते.

# संक्षिप्त

## श्री स्वामी समर्थ संस्थान येथे श्री दत्त जयंती साजरी



**चांदूर रेल्वे - स्थानिक** चांदुर रेल्वे शहरातील स्वामी समर्थ नगर येथे नव्याने उभारण्यात आलेले श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक व बाल संस्कार केंद्र येथे श्री दत्त जयंतीचे औचित्य साधून श्रीगुरु चरित्र पारायण व अखंड नाम जप सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. ह्या संपूर्ण सप्ताहात दररोज सकाळी ८ वाजता भूपाळी आरती, ८:३० वाजता श्री गुरु चरित्राच्या ग्रंथाचे पारायण पाठ, १०:३० वाजता नैवद्य आरती, साय ५:००वा. श्रीविष्णू सहस्त्र नाम जप तसेच औदुंबर प्रदक्षिणा आणि सायंकाळी ६ वाजता नैवद्य आरती व प्रसाद असे दैनंदिन धार्मिक कार्यक्रमाचा उत्साहात झाले. कार्यापूर्तीसाठी स्वामी भक्तांनी सहकार्य करण्याचे देखील आवाहन संस्थांनाचे अध्यक्ष अतुल चांडक, प्रमोदराव देशमुख, प्राविण्य देशमुख, नितीन महल्ले,शाम जगताप,अनंत कडूकर, पिंटू डुबे, नामदेव सुरोशे,अनिल गावंडे,जितेंद्र गोरे, बिपीन देशमुख, सिद्धेश भैसे,केतन चव्हाण ह्या स्वामी सेवेकऱ्यांनी केले आहे.

## ओम खोडसाळ राज्यस्तरावर



**अमरावती -** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ द्वारा संचालित श्री रामकृष्ण क्रीडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा कुस्तीपटू ओम दिनेश खोडसाळ याने राज्यस्तरावर यशाची नोंद केली आहे. पुणे, इंदापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय कुराश स्पर्धेत ओमने १९ वर्षे वयोगटातील ६० किलो वजन गटात प्रभावी खेळांचे प्रदर्शन करीत रौप्य पदक (सिल्वर मेडल) पटकावले. श्री हव्याप्र मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव डॉ.माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव रवींद्र खांडेकर, मुख्याध्यापिका वाडेगावकर, उपमुख्याध्यापिका आडे, पर्यवेक्षक खोब्रागडे तसेच शाळेचे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजयी खेळाडूंचे व क्रीडा शिक्षक संजय मालवीय यांचे अभिनंदन केल.

## कुऱ्हा येथे आरोग्य शिबीर



**कुऱ्हा -** राजेंद्र गोडे आयुर्वेद कॉलेज अँड हॉस्पीटल अमरावती द्वारा मोफत रोगनिदान कुऱ्हा येथील मोठी देवी संस्थान येथे आयोजित करण्यात आले होते.या शिबिरात परिसरातील शेकडो रुग्णांनी मोफत तपासणी व औषधोपचाराचा लाभ घेतला. हे शिबीर डॉ उज्वला साखरकर,सिमा राठोड यांच्या मार्गदर्शनात व सहयोगात डॉ. आकांक्षा श्रीकृष्ण कडू,डॉ. उन्नती चंद्रशेखर रक्षे,डॉ सायली मोहन जैस्वाल,डॉ. आरती शरद बलखंडे, डॉ.आयशा खान व सहकारी, सिस्टर उज्वला मानकर, अटेंडन, देवेंद्र धारोकर व उमाकांत मुरायते आदींच्या उपस्थितीत मोफत रोगनिदान शिबिर पार पडले.

## तक्षशिला महाविद्यालयात संविधान दिन साजरा



**दारापूर –** तक्षशिला महाविद्यालय, दारापूर येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्य वक्ते डॉ. निलेश घोटकर यांनी संविधानाच्या निर्मितीची प्रक्रिया, त्यातील मूलभूत तत्त्वे, तसेच नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. सारिका दांडगे होत्या. प्रमुख अतिथी प्रा. खेमानंद फुलझेले यांनी डॉ. वर्गीस कुरियन यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानात त्यांचे कार्य, दुधाच्या क्रांतीतील योगदान आणि व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य मांडले. यासह डी.एड. कॉलेजचे प्राचार्य प्रा. दिलीप वानखेडे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. यशवंत हरणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. दिनेश धाकडे, विभागप्रमुख राज्यशास्त्र यांनी केले. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना , सहकार विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला.कार्यक्रमात डॉ. रजनी गेडाम, डॉ. कुंदन अलोने, डॉ. संदीप खंडारे, आदेश गावंडे, प्रा. पूजा चोरपगार, पंकज कीर्तकार यांसह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## नांदगाव पेठ येथे शिवसेनेचा मेळावा



**नांदगाव पेठ -** येथे शिवसेना अमरावती तालुक्याचा भव्य कार्यकर्ता मेळावा उत्साहात पार पडला. तालुकाप्रमुख नितीन हटवार यांनी आगामी जि.प. आणि पं.स. निवडणुकीत अमरावती तालुक्यातील सर्व पाचही मतदारसंघात उमेदवार उभे करण्याची घोषणा केली.मेळाव्यास माजी खासदार अनंतराव गुढे, जिल्हाप्रमुख पराग गुडदे यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. गुढे यांनी '८०% समाजकारण व २०% राजकारण' हा बाळासाहेबांचा मूलमंत्र आठवत एकदिलाने काम करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात सेवा सहकारी सोसायटीचे नवनियुक्त संचालकांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रहारचे योगेश राऊत यांनी शिवसेनेत प्रवेश करून पक्षाला नवी ऊर्जा दिली. मेळाव्यात शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर बंदी

**बडनेरा -** भुसावळ विभागातील नाशिक, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला आणि बडनेरा स्थानकांवर प्लॅटफॉर्म - तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदीचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकांवर होणारी गर्दी नियंत्रित करण्यासाठी भुसावळ विभागातील काही प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घातली आहे.

प्लॅटफॉर्मवर होणारी गर्दी नियंत्रित करणे आणि स्थानक परिसरात प्रवाशांची सुरळीत हालचाल सुनिश्चित करणे हा उद्देश आहे. प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवरील निर्बंध ५ ते ६ डिसेंबरपर्यंत प्रभावी असणार आहे.

# शिक्षकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## -टीईटी सक्ती विरोधात आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर संघटना समन्वय समितीच्या वतीने आज शुक्रवार ५ डिसेंबर रोजी विविध मागण्यांसाठी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर सामूहिक अवकाश आंदोलन करण्यात आले. राज्य सरकारनं आमच्या मागण्या मान्य कराव्या अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा यावेळी आंदोलकांकडून देण्यात आला. शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

टीईटी परीक्षे संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर पुनर्विचार याचिका दाखल करावी. तसंच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया तत्काळ सुरू करावी, शिक्षक सेवक योजना बंद करून पूर्ण वेतनावर नियमित शिक्षक भरती पूर्वलक्षी प्रभावाने सुरू करावी, पदवीधर शिक्षकांना भेदभाव न करता पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी, शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनास अडसर ठरणारी बीएलओ सह ऑनलाईन कामे बंद करावी, जिल्हा परिषदेच्या शिक्षकांसाठी मुख्यालयीं शासनाने निवासस्थाने बांधून द्यावी, अशा विविध प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयांवर आंदोलन केले. विविध मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला. आंदोलन करणाऱ्यांमध्ये अजयानंद पवार, ☞(पान २ वर)

# मौजे सारोळा पिर येथे बिबट मृतावस्थेत आढळला

## -वनविभागाची तत्काळ कारवाई, तपास सुरू



**मोताळा/प्रतिनिधीः-** रोहीणखेड वर्तुळातील रोहीणखेड नियतक्षेत्रात दि.०५ डिसेंबर रोजी मौजे सारोळा पिर येथे एक बिबट (नर) मृत अवस्थेत आढळून आला. हा मृतदेह केशरबाई शांताराम गवळी यांच्या मालकीच्या गट क्रमांक ८५ मधील शेतामध्ये आढळला. सदर घटनेची माहिती शेतकऱ्याने तात्काळ वनविभागाला दिली.

माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी तातडीने दाखल झाले. त्यांनी मोका पाहणी करून परिसरातील तपासणी केली. तसेच गावात दवंडी देऊन नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले.

मृत बिबट्याला नियमानुसार वनपरिक्षेत्र कार्यालय, मोताळा येथे आणण्यात आले. तेथे तज्ज्ञांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले व दहन विधी पार पाडण्यात आला. या घटनेची माहिती तहसीलदार मोताळा, वन्यजीव तज्ञ ई. एच. पठाण आणि संबंधित गावाच्या सरपंचांना देण्यात आली आहे.

ओ. व्ही. आपेट (सहाय्यक वनसंरक्षक – प्रादे. व कॅम्पा) यांच्या मार्गदर्शनाखाली अज्ञात आरोपींवर वनगुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी मोताळा (अति.कार्यभार) एन. एन. काळे, वनपाल पी. एम. नारखेडे, ओ. एन. सपकाळ, तसेच वनरक्षक आर. बी. सिरसाट, एल. डी. राठोड आणि के. एन. तराळ यांच्या पथकातर्फे सुरू आहे.

वनविभागाने नागरिकांना कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ कळविण्याचे आवाहन केले आहे.

# कुख्यात गुन्हेगार जेरबंद, चोरीची ॲक्टीव्हा मिळाली परत

## -फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई




**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलिसांनी मालमत्तेच्या गुन्ह्यांत सक्रिय असलेल्या एका कुख्यात गुन्हेगाराला अटक करत त्याच्याकडून चोरीची ॲक्टीव्हा जप्त केली. एकूण २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला असून या कारवाईचे शहरात कौतुक होत आहे. ही कारवाई फिर्यादी मकरंद मनोहर गोसावी (वय ६२, श्री कॉलनी, काँग्रेस नगर) यांच्या तक्रारीनंतर करण्यात आली.

फिर्यादींच्या घराच्या एका भागात 'ऋणानुबंध हॉस्पिटल' चालते. ३ डिसेंबरच्या पहाटे फिर्यादींच्या पत्नी घरी आल्या तेव्हा ॲक्टीव्हा कंपाऊंडमध्ये उभी होती. ☞(पान २ वर)

# अज्ञात वाहनाच्या धडकेत युवकाचा जागीच मृत्यू

## -दर्यापूर-अकोला मार्गावर लासूर जवळील



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर-अकोला मार्गावरील लासूर जवळील एका पोल्ट्री फॉर्म जवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत अकोला जुन्या शहरातील २७ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दि.५ डिसेंबरला रात्री आठ वाजताच्या सुमारास घडली.

श्रीकांत प्रभाकर बावनेर (रा. भांडपूरा चौक, जुने शहर अकोला) असे मृत युवकाचे नाव आहे. मृतक श्रीकांत बावनेर हा बुलेट क्र. एम. एच. ३०,बी झेड ८९५६ या वाहनाने अकोल्याकडे जात असतांना लासूर जवळील एका पोल्ट्री फॉर्म जवळच्या कॉर्नरवर अज्ञात वाहनाने त्याला धडक दिली. या धडकेत त्याचा जागीच मृत्यू झाला.ज्या ठिकाणी अपघात झाला ते अपघात प्रणव स्थळ असून कॉर्नर आहे. दर्यापूर व अकोला कडून येणारीं वाहने येथून भरधाव वेगाने धावतात. त्यामुळे या ठिकाणी दोन्ही बाजूला गतीरोधक बसविण्याची नितांत गरज आहे. सदर घटनेचा पुढील तपास येवदा पोलीस करीत आहेत.

# मतदार यादीबाबत व्हॉट्स ॲपवरील तो संदेश दिशाभूल करणारा

## -उपविभागीय अधिकाऱ्यांकडून खुलासा



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती तहसील कार्यालयात सन २००२ ची मतदार यादी उपलब्ध असल्याचा एक व्हॉट्स ॲप संदेश सध्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फिरत आहे. परंतु, हा संदेश पूर्णपणे चुकीचा आणि दिशाभूल करणारा असल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

माहितीनुसार, ४ डिसेंबर २०२५ रोजी व्हॉट्स ॲपवर एक संदेश प्रसारित झाला होता, ज्यात अमरावतीतील ज्या महिला परराज्यात स्थलांतरित आहेत, विशेषतः जिथे 'एसआयआर' प्रक्रिया सुरू आहे, त्यांच्या आई-वडिलांचे नाव सन २००२ च्या मतदार यादीत शोधण्यासाठी अमरावती तहसील कार्यालयात ती यादी उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला होता. तहसील कार्यालयाच्या निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कार्यालयात सन २००२ ची मतदार यादी उपलब्ध नाही. या कार्यालयात नागरिकांसाठी सन २००४ ची मतदार यादी उपलब्ध आहे.

उपविभागीय अधिकारी यांनी अमरावती अंतर्गतच्या सर्व मतदारांना कळविले आहे की, त्यांनी व्हॉट्स ॲपवरील या चुकीच्या संदेशावर विश्वास ठेवू नये. ज्यांना २००४ ची मतदार यादी हवी आहे, त्यांनी थेट तहसील कार्यालय, अमरावती येथील निवडणूक विभागात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बेंबळा शिवारखेडा रोडचे डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे

## तिनच दिवसात रोड उखडला





**खल्लार/प्रतिनिधीः-** बेंबळा बु. ते शिवारखेडा या रोडचे डांबरीकरणाचे काम अत्यंत बोगस व निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून तिनच दिवसात डांबरीकरण केलेला रोड उखडायला लागला आहे. डांबरीकरणाच्या या कामात संबंधित ठेकेदाराने काम निकृष्ट दर्जाचे करुन मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला आहे.

तत्कालीन खासदार नवनित राणा यांनी नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन हा रोड त्यांच्या निधीतून मंजूर करुन केला होता.रोड मंजूर झाल्यावर खडीकरण केले होते.खडीकरणाच्या कामातही संबंधित ठेकेदाराने मोठया प्रमाणात गैरव्यवहार केला होता.

तिन दिवसाआधी खडीकरण केलेल्या रोडवर फक्त सहा इंच एवढेच डांबरीकरण करण्यात आले. मात्र रोडचे डांबरीकरण हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून तिन दिवसातच डांबरीकरणाचा रोड उखडायला लागला आहे. बेंबळा, शिवारखेडा ☞(पान २ वर)

# दारू न दिल्याने तरुणावर चाकू हल्ला

## - छत्री चौकात मध्यरात्रीची धांदल, आरोपी फरार



**अमरावती/प्रतिनिधीः-** दारू न दिल्याने पेटलेल्या रागातून बडनेरातील छत्री चौकात एका तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना गुरुवारी उशिरा रात्री उघडकीस आली. या हल्ल्यात प्रशांत नारायण मोहोड (वय ३६, पंचशील नगर) गंभीर जखमी झाला आहे.

प्रशांत छत्री चौकात उभा असताना दीपक रमेश निंबाळकर (वय २३) हा परिसरात आला. त्याने प्रशांतकडे दारूची मागणी केली. मात्र प्रशांतने नकार दिल्याने चिडलेल्या दीपकने क्षणाचाही विलंब न करता चाकू काढला आणि प्रशांतच्या पोटात भोसकून घटनास्थळावरून पसार झाला. हल्ल्याची माहिती मिळताच बडनेरा पोलिस पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी गंभीर जखमी स्थितीत असलेल्या प्रशांत मोहोड याला तत्काळ इर्विन रुग्णालयात हलवले, जिथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत. प्रशांतच्या भाऊ सतीश मोहोड यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी दीपक निंबाळकर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस त्याच्या मागावर आहेत. या प्रकारामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मनपा मार्केटमध्ये तीन दुकानांवर धाडसी चोरीचा प्रयत्न

### ६४ हजारांचा मुद्देमाल लंपास



**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा शहरात चोरट्यांची दहशत वाढत असून गुरुवारी उशिरा रात्री मनपा कॉम्प्लेक्समधील तीन दुकाने फोडल्याची घटना उघडकीस आली. या चोरीत ६४ हजार रुपयांचा माल लंपास झाला आहे. सातत्याने घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे व्यापारी वर्गात तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जुनी वस्ती येथील संजय मेघराज तातेड (वय ५५) यांची मनपा कॉम्प्लेक्समध्ये स्टील फर्निचरची दुकान आहे. रात्री अज्ञात चोरट्यांनी तातेड यांच्या दुकानासह आणखी दोन दुकानांचे शटर वाकवून आत प्रवेश मिळवला. तपासात तातेड यांच्या दुकानातून ८ ग्रॅम वजनाची ६० हजारांची चांदीची अंगठी आणि चार हजारांच्या दोन चांदीच्या लक्ष्मी मूर्ती असा एकूण ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले. समीपच्या जयकुमार परलानी यांच्या फुटवेअर ☞(पान २ वर)

# स्वच्छता कंत्राटदार कोणार्क कंपनीला मुहूर्त मिळेना

## -वर्क ऑर्डर होऊनही कामकाजाचा पत्ता नाही

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या २४५ कोटी वार्षिक मूल्यांचा स्वच्छता कंत्राट मुंबईच्या कोणार्क कंपनीला देण्यात आला आहे. गेल्या सोमवारी कंपनीला महापालिका प्रशासना कडून वर्क ऑर्डर देखील देण्यात आली, तरी देखील कंपनीला अद्याप मुहूर्त गवसलेला नाही. कामकाजाचा ठावठिकाणा नसल्याने अस्वच्छता सर्वत्र जशीच्या तशी दिसून पडत आहे.

महापालिकेने जुन्या सर्व स्वच्छता कंत्राटदारांना निरोप देऊन, नवीन निविदा प्रक्रिया चालू केली. मुंबईच्या कोणार्क कंपनीला सर्वात कमी दर असल्याने मनपा स्वच्छता कंत्राट देण्यात आला. या कंपनीने ५४०० रुपये प्रति टन दर कोट केल्याने कंपनीला कंत्राट देण्यात आला. कंपनीला करार करताना अमरावती शहरातील कचरा संकलित करणे व अकोली तथा सुकळी कंपोस्ट डेपो मध्ये नेऊन टाकण्याचे काम सोपवण्यात आले आहे. विशेष म्हणजे गेल्या सोमवारी कंपनीला वर्क ऑर्डर देण्यात आली तरी देखील गेल्या पाच दिवसात शहरातील कुठल्याच परिसराचा कचरा उचलण्यात आला नाही. कचरा संकलित केला नाही. महापालिकेच्या परिसरात सुरू असलेल्या कुजबुजीनुसार मुंबईच्या कोणार्क कंपनीवर सत्ताधाऱ्यांचा आशीर्वाद आहे. त्यामुळे या कंपनीकडून काम करून घेणे महानगरपालिका आयुक्तांना फार जिकरीचे जाणार आहे. ही कंपनी महापालिकेची लाडकी जावई म्हणून काम करणार असल्याचे स्पष्ट संकेत आत्ताच ☞(पान २ वर)

# मनरेगा घोटाळयाचा तपास निर्णायक टप्प्यात

## -'एपीओ'-'जेएओ'वरही कारवाईची शक्यता वाढली

## - ७० लाखांच्या निधी अपहार प्रकरणाने पंचायत समितीत खळबळ

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी पंचायत समितीत घडलेल्या मनरेगा निधी गिळंकृत प्रकरणाचा तपास आता महत्त्वाच्या वळणावर पोहोचला आहे. तब्बल ७० लाखांहून अधिकचा शासकीय निधी अपहार केल्याचे प्राथमिक तपासातून उघड होत असून, या प्रकरणात बडतर्फ एपीओ प्रणाली कसर व गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांच्या अटकेनंतर आता कार्यरत एपीओ आणि कनिष्ठ लेखा अधिकाऱ्यांवरही अटकेची टांगती तलवार निर्माण झाली आहे. तपासी पथकाने 'वेट, वॉच अँड अटॅक' या भूमिकेत तपासाचा वेग वाढविल्याने पंचायत समिती आणि मनरेगा विभागात प्रचंड खळबळ माजली आहे.

शुक्रवार, ५ डिसेंबर रोजी आर्वी पंचायत समितीतील विद्यमान सहाय्यक कार्यक्रम अधिकारी आणि कनिष्ठ लेखा अधिकारी दिगंबर चव्हाण यांना पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले. मनरेगाअंतर्गत विविध कामांची प्रक्रिया, निधीचे वितरण, बिलांचे परीक्षण, नोंदींचा प्रवाह तसेच कामांवरील प्रत्यक्ष खर्च याबाबत तपशीलवार माहिती दोघांकडून घेण्यात आली. तपास अधिकाऱ्यांच्या मते, निधी अपहार नेमका कोणत्या टप्प्यावर आणि कोणी केला, याचा सखोल अंदाज मिळवण्यासाठी ☞(पान २ वर)

**मोबाईल कधी ऑन-कधी ऑफ, संशयितांची धावपळ सुरू**

'जनमाध्यम'ने वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर काही संशयितांची धडपड वाढली आहे. जिल्हा परिषद कार्यालयात घिरट्या घालत असलेल्या काही जणांनी तपासाबाबत माहिती मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले असून, त्यांचे मोबाईल कधी ऑन, कधी ऑफ होत असल्याचे पोलिसांना आढळले. तपासाची भीती वाढल्याची ही ठळक लक्षणे मानली जात आहेत.

**माळेगावात धाकधूक, अर्धे तुम्ही -अर्धे आम्ही फॉर्म्युला चर्चेत**

माळेगाव (ठेका) येथील मनरेगा कामांमध्येही गोंधळ झाल्याची तक्रार आधीच नोंदली आहे. कामे प्रत्यक्षात कमी, तर बिलं मात्र पूर्ण दाखविण्याची पद्धत वापरून 'अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही' असा फंडा राबविण्यात आल्याचे आरोप असून, आता मुख्य आरोपींच्या अटकेनंतर तपास यंत्रणेचे लक्ष माळेगावाकडेही वळण्याची भीती स्थानिकांमध्ये वाढली आहे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

## -स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी मोठी संधी

### जानेवारी ते डिसेंबर २०२६ पर्यंत विविध परीक्षांचे नियोजन




**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) सन २०२६ मध्ये होणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. आयोगाने प्रशासकीय सेवेतील महत्त्वाच्या परीक्षांसह गट-ब आणि गट-क सेवा परीक्षांचे सुध्दा अंदाजित वेळापत्रक जाहीर केले आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आवश्यक माहिती जाणून घ्यावी, असे आवाहन आयोगाचे अवर सचिव र. प्र. ओतारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

महत्त्वाच्या सन २०२६ मध्ये होणाऱ्या परीक्षांच्या प्रमुख तारखा पुढीलप्रमाणे आहे :

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित ☞(पान २ वर)

# दोन महाविद्यालयीन विद्यार्थिनीचे अपहरण

## पालकांमध्ये भीतीचे वातावरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाविद्यालयीन तरुणीना आमीष दाखवून पळून घेऊन जाण्याच्या घटना निरंतर समोर येत आहे. अशाच दोन घटना जिल्ह्यातील शिरखेड व वरूड पोलीस ठाणे हद्दीत समोर आली आहे. यामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दोन्ही प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

वरुड पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी नुसार महात्मा फुले महाविद्यालयामध्ये शिकणारी तरुणी गेल्या २० दिवसांपासून आपल्या आजी जवळ राहत होती. गुरुवारी सकाळी ७ वाजता ती कॉलेज जाण्यासाठी घरून निघाली पण परत आली नाही. कुटुंबीयांनी तिचा सर्वत्र शोध घेतला, नातेवाईकांकडे पण विचारपूस ☞(पान २ वर)

# सेस कायद्या विरोधात बाजार समिती बंद

## -कोट्यावधीचा व्यवहार ठप्प



**अमरावती/प्रतिनिधीः-** १९६३ च्या जुन्या कायद्याला विरोध करत व्यापारी वर्ग एकवटला आहे. यामुळे आज शुक्रवार ५ डिसेंबर रोजी अमरावती सह राज्यातील सर्व बाजार समित्या बंद ठेवण्यात आल्या. अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत या बंदला प्रतिसाद मिळाला आहे. तर जीवनावश्यक गोष्टी म्हणून फळ, भाजीपाला, कांदा बटाटा मार्केट मात्र सुरू ठेवण्यात आले. जरी हे मार्केट सुरू असले तरी व्यापाऱ्यांचा या बंदला पाठिंबा मिळाला. एकट्या अमरावती बाजार समिती मध्येच कोट्यावधीचा व्यवहार केला जाते. आज संपूर्ण व्यवहार ठप्प पडला आणि बाजार समितीमध्ये सन्नाटा दिसला. बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले कि, बंद संदर्भात शेतकरी अडते व्यापाऱ्यांना पूर्वी च सूचना देण्यात आली होती. यामुळे मंडी परिसरात ☞(पान २ वर)